
# महाभारत

## खंड २४ : भिष्मपर्व २

मराठी अनुवाद :

## श्री. अशोक कोठारे



# महाभारत

## खंड चोविसावा

## भिष्म पर्व भाग दुसरा

अशोक कोठारे

ई साहित्य प्रतिष्ठान

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2020

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जानेवारी २०२०**

## - अनुवादकाचे दोन शब्द -

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळया परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बऱ्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात

हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा चोविसावा खंड, भिष्म पर्व भाग दुसरा, आपण आता वाचणार अहात, त्यात पहिला दिवस, दुसरा दिवस, तिसरा दिवस, वासुदेव स्तुती पर्व चौथा दिवस पर्व, आपण पहाणार आहोत.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणाऱ्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राज्यांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ नाही असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई-साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे

माझा ई-मेल –

ashokkothare@gmail.com

ashokkothare@yahoo.co.in

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.



ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई-पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई-साहित्य करणार आहेत परंतु, हे ई-पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

**माझे ब्लॉग –**

Ashok Kothare, http://ashokkotharesblog.blogspot.com/ for stories

I reckon, http://kotharesviews.blogspot.com/ for philosophy

Ideas and tips on any subject, http://kotharay.blogspot.in/ for intelligent discussions.

Freedom of Expression, http://kothare-thinks.blogspot.in/

My Marathi Blog, http://kothare-marathi.blogspot.in/ मला असे वाटते

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग चाळीसावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, सगळया दोनही बाजूच्या सेना सज्ज झाल्यावर प्रथम कोणी हल्ला केला? पांडवांनी की, कौरवांनी?

संजय बोलतो, त्याच्या मोठ्या भावाची ती आज्ञा ऐकताच दुःशासन त्याची फौज घेऊन पुढे सरकतो. त्याच्या फ़ौजेच्या पुढे भिष्माचार्यांचा रथ असतो. ते पहातांच पांडवांचे सैन्यसुद्धा त्यांच्यावर चाल करून जाते. त्याच्या सैन्याची प्रमुख असतो भिम. सिंहगर्जना करत तो भिष्माच्या सैन्यावर हल्ला करतो. दोनही बाजूंची रणवाद्ये जोरांनी वाजू लागतात. एकच गदारोळ होतो. बैलांच्या शिंगांपासून बनवलेले क्रकचाट नांवाची छोटी तुतारी सैनिक वाजवू लागतात. सैनिकांच्या ओरड्यानी सगळे आसमंत दुमदुमून गेले. त्या सगळया आवाजाने कान किटले. त्यात शंख आणि घंटा वाजू लागल्या. त्या दोनही सैन्यातील राजे व त्यांचे सैन्य त्यांच्या हत्ती, घोडे अशा बरोबर एकमेकांवर तुटून पडले होते. त्या सगळया आवाजात भिमाची गर्जना जास्त मोठी होती. त्या भिमगर्जनेमुळे तुझ्या बाजूचे सैन्य घाबरून गेल्या सारखे दिसत होते. भिमगर्जने इंद्राच्या ढगांच्या गडगडाटासारखी होती. त्या भयंकर गर्जनेमुळे हत्ती व घोडे मुतू लागले होते. त्याच प्रमाणे अनेक कौरवसुद्धा घाबरल्या सारखे वाटत होते. ते पाहिल्यावर तुझी मुलं द्रोघन, दुर्मुख, दुःशासन, धर्मशल, विविंगसती चित्रसेन आणि विक्रांत, पुरूमित्र, जय व भोज, सोमदत्ताची मुलं ह्यांच्या हातातील धनुष्य धरलेले हात थरथरा कांपू लागले होते. तरी हिम्मत न हरता ते भिमावर त्यांच्या लांब पल्ल्याच्या बाणांने हल्ला करू लागतात. ते इतके बाण सोडतात कीं, सगळे आकाश त्या बाणाने भरून गेले होते. सूर्याचा प्रकाश त्यांनी जणूकाय अडवला होता. द्रौपदीची पांच मुलं त्यांच्या बरोबर महारथी सौभद्र, नकूल, सहदेव धृष्टद्युम्न असें सगळे कौरवांवर चाल करून गेले. त्यांच्या धारदार टोके असलेल्या बाणांमुळे तुझ्या सैनिकांचे ते बळी घेत होते. त्यांच्या धनुष्याच्या ठणत्काराने सगळे आसमंत दुमदुमत होते. तुझे सैन्यसुद्धा त्यांना जशासतसे अशाप्रकारे प्रतिकार करत होते. अहो राजे धृतराष्ट्र मला द्रोणांच्या सफाईची दाद द्यावा लागते कारण ते सर्वांना चांगलाच प्रतिकार करत होते. त्यांचा प्रत्येक बाण लक्ष्य गाढत होता बिनचुकपणे. आकाशात फेकलेले बाण धुम्रकेतू प्रमाणे खाली वेगांने येत असतांना चमकत होते. ते दृष्य तेथे असलेले राजे पहात होते. कोणावर ते बाण बडणार ते त्यांना समजत नव्हते. त्यामध्ये अनेक योद्धे मारले जात होते त्याचे दुःख व त्यातून उत्पन्न होणारा क्रोध त्यांच्या मुखावर दिसत होता. त्यांच्या मुखावरील भावावरून स्पष्ट दिसत होते कीं, ते शत्रूपक्षाचे आव्हान पेलण्याच्या तयारीत होते.

अरे राजा तो सगळा नजारा भयंकर पण सुंदर वाटत होता. रणधुमाळीमुळे जी धूळ वातावरणात उडत होती त्यामुळें कांहीं दिलत नव्हते त्या तशा परिस्थितीत ते तिरंदाज त्यांचे बाण अंदाजाने फेकत होते. ते एकमेकांवर आदळत होते. दुर्योधनाचे सैन्य आगेकूच करत होती. सैनिकांचे ओरडणे व जनावरांचे खिंकाळणे त्याशिवाय रणवाद्ये ह्यांने आसमंत भरून गेला होता. त्यात शस्त्रांचे एकमेकांवर आपटण्याचे आवाज सगळीकडून येत होते. समुद्राच्या लाटांच्या आवाजासारखा तो वाटत होता. युधिष्ठीराच्या बाजूचे अनेक राजे त्यांच्या फौजानिशी तुझ्या सैनिकांना घेराव घालत असल्याचे मी पहात आहे. ती लढाई भयंकर होती. दोनही बजूंचे शूरवीर तुल्यबळ वाटत होते. तरी त्यात भिष्म सगळयांमध्ये उठून दिसत होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग चाळिसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग एकेचाळीसावा

संजय पुढे सांगत असतो, त्या भयंकर दिवसाच्या दुपारपर्यंत अनेक राजे व त्यांचे सैन्य भयंकर रित्या मारले गेले होते. त्यावेळी कुरु आणि श्रींजय ह्या दोनही फौजा मोठ्या मोठ्याने ओरडत, किंकाळत एकमेकांवर तुटून पडत होते. दोन्ही फौजा युद्ध जिंकण्याच्या प्रेरीत होऊन लढत होत्या. त्यांच्या ओरडण्याने आकाशात आवाज जात होता. शंखनाद सारखा होत होता. एकमेकांना मारत ते शूर योद्धे त्वेषाने एकमेकांना आव्हान देत होते. त्या आवाजात धनुष्यांचे टणत्कार, घोड्यांचे खिंकाळणे, हत्तींचे चित्कार चालून होते. वाईक योद्धे काठ्या, कुर्हाडी, तलवारी, अशा विविध शस्त्रांनी लढत होते. हत्तींच्या अंगावरील घंटांचा त्यात आवाज एकू येत होता. त्यात रथांच्या चाकांचा आवाज भर घालत होता. त्या सगळया गोंधळामुळें पहाणाऱ्याच्या अंगावर कांटा उभा रहात होता. वाईट उद्देशाने प्रेरित असलेले कौरव त्यांचे ध्वज उंच करून पांडवांच्या सैन्यावर चालून जात होते. शंतनुचा मुलगा त्याचे धनुष्य घेऊन रणात उतरला होता. तो धनंजयावर चाल करून जाण्याच्या उद्देशाने पुढे सरकत होता. ते पाहून अर्जुन त्याचे गांडीव घेऊन सज्ज असा त्याच्या दिशेने जाऊ लागला. असें दिसत होते कीं, ते आता एकमेकांवर बाणांचा वर्षाव सुरू करणार. भिष्माने अर्जुनाला रोकण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्याला यश आले नाही. त्याच प्रमाणे अर्जुनालासुद्धा शंतनुच्या मुलाला रोकता आले नाही. त्याचवेळी महाबली सत्यकी कृतवर्मनवर चाल करून जातो असे मी पहात आहे. त्यांच्यातील युद्ध जोरदार होत होते. सत्यकी कृतवर्मनला इजा करण्यात यशस्वी होतो असे मी पाहीले. त्यावर तो जोरांने ओरडून त्याला पुन्हा आव्हान देतो. कृतवर्मन सुद्धा सत्यकीला इजा करतो. दोघे जोराजोराने ओरडत असतात. त्यांच्या अंगात सर्वत्र बाण शिरलेले होते व त्या स्थितीत ते लढत होते. त्याच सुमारास अभिमन्यू बृद्बलावर हल्ला करतो. त्याबरोबर कौसलचा राजा बृहद्बल अभिमन्यूच्या रथावरील ध्वज खाली पाडतो. ते पाहून सुभद्राचा मुलगा संतापतो व कोसलच्या राजावर जोरात मारा करतो आणि बृहद्बलाचा ध्वज खाली पाडतो. त्याच्या रथाचे संरक्षण करणाऱ्याला ठार मारतो. अशारितीने ते दोघे एकमेकांना बाणांच्या माऱ्याने थकवण्याचा प्रयत्न करत असतात. भिमसेनाचे लक्ष्य आहे तुझा मुलगा, दुर्योधन, त्याच्या दिशेने तो जाऊ लागतो. ते दोघेही मोठे बलाढ्य रथी आहेत. ते एकमेकांना पकडण्याचा प्रयत्न करत असतात. त्याचवेळी ते एकमेकांवर बाणांचा वर्षाव करत असतात. ते त्यांचे युद्ध सगळे आकाशातील देव, ऋषी पहात आहेत.

दुःशासन त्याचवेळी नकूलावर चाल करून जातो. त्याच्यावर बरेच तीक्ष्ण धार असलेले बाण मारतो. ते सगळे नकूल शिताफीने उलटवतो व त्याच्याकडे पहात हसतो. त्यामुळे तो कौरव आणखीन चिडून आणखीन वार करू लागतो. नकूल सहजपणे त्याच्यावर सव्वीस बाण असें मारतो

की, तो खाली पडावा पण त्याच वेळी दुःशासन नकूलाचा एक घोडा घायाळ करतो. दुर्मुख मोठ्या आवेशाने सहदेवावर हल्ला करतो त्याच्यावर बाणांचा वर्षाव करत असतो. त्यावेळी सहदेव असें बाण मारतो कीं दुर्मुखाचा रथ उलटतो व तो जमिनीवर कोसळतो. त्यांचे ते द्वंद्व फारच भयानक होते. कोणी मागे हटायला तयार नव्हते. युधिष्ठीर मद्र देशाच्या राजावर चाल करून जातो. मद्र देशाचा राजा एका झटक्यात युधिष्ठीराच्या धनुष्याची दोर तोडतो. त्याबरोबर तो कुंतीचा मुलगा ते धनुष्य टाकून दुसरे घेतो. तो ह्या जास्त मजबूत धनुष्याने मद्रच्या राजावर बाण मारतो असें कि, त्याची कोंडी होते.

धृष्टद्युम्न द्रोणांवर चाल करून जातो. द्रोण त्याच्या मजबूत धनुष्याचे तुकडे करतात. त्याचवेळी ते पांचालच्या राजपुत्रावर एक असा भारी बाण फेकतात कीं, तो त्याच्या अंगात घुसतो. त्याने न डगमगता तो द्रुपद द्रोणांवर जोराचा मारा करतो. ते दोघे एकमेकांत चांगलेच गुंतले होते. त्यांचे द्वंद्व भयंकर होते. त्याच वेळी शंख आणि सोमदत्ताचा मुलगा लढू लागले होते. तो त्याला बोलतो, अरे राजा, थांब थांब. सोमदत्ताचा मुलगा शंखाच्या अंगावर वार करतो. त्यांचे द्वंद्व देव आणि दानवांच्या द्वंद्वासारखे झाले. महारथी धृष्टकेतू मोठ्या वेगांने रणभूमीत शिरतो. तो वल्हिकावर चाल करून जातो. ते पाहून वल्हिक सिंहगर्जना करतो. त्याच्या त्या ओरडण्याने धृष्टकेतूचा धीर सुटतो. त्याच्यावर असंख्य बाण तो फेकत रहातो. छेड्डीचा राजा धृष्टकेतू त्याला वर्मी घाव घालतो व जखमी करतो. चिडलेल्या हत्तीसारखे त्याच वागणे होते. ते लढत असतांना जोरजोराने ओरडत होते भयंकर चिडलेले दिसत होते.

घटोत्कच राक्षस अलमवुशाशी अतिशय क्रूरपणे लढत होता. ते द्वंद्व शक्र आणि वल ह्याच्या द्वंद्वांसारखे भयंकर होते. घटोत्कच अलमवुशावर नव्वद धारदार भाले फेकतो. अलमवुश सुद्धा भिमाच्या मुलावर तसंच वार करत असतो. त्या जखमानी भरलेले ते दोघे दुसरे इंद्र आणि वली असें त्या रणभूमीवर शोभत होते. कांहीं वेळानंतर शिखंडी द्रोणाच्या मुलावर चाल करून गेला. तो संतापलेला शिखंडी त्या जखमानी भरलेल्या अवस्थेत अश्र्वत्थामाला आव्हान देतो. त्याच्यावर एक भाला मारतो ज्यामुळें अश्र्वत्थामा हादरतो. त्यांचे द्वंद्व त्या स्थितीत चालू रहाते.

भागादत्तावर विराट त्याच्या सैन्यानिशी  चालून जातो. विराट त्यांच्या धनुष्यातून असंख्य धारदार बाण भागादत्तावर मारतो. त्या दोघांची सैन्ये जोरात लढत होती. मेलेल्या माणसांचे ढीग रणभूमीत पडलेले होते. भागादत्ताचे बाण पावसासारखे विराटाच्या सैन्यावर येऊन पडत होते. शरद्वताचा मुलगा कृपाचार्य वृहदक्षत्रावर चालून जातो. तो केकयाचा राजा आहे. कृपाचार्यानी वृहदक्षत्राच्या रथाला चोहो बाजूने बाणांनी घेरले होते. वृहदक्षत्र कांहीं कमी नव्हता. तोसुद्धा कृपाचार्यांना बाणाने बेजार करतो. त्यांच्या बाणांनी त्यांचे घोडे घायाळ होतात.

ते एकमेकांचे धनुष्य मोडून टाकतात. त्यानंतर ते रथातून उतरून तलवारीने लढू लागतात. त्यांचे ते द्वंद्व पहाण्यासारखे होते.

राजा द्रुपद मोठ्या रागांने जयद्रथावर हल्ला करतो. जो सिंधचा राजा आहे व कौरवांच्या बहिणीचा नवरा. जयद्रथाच्या तीन बाणाने द्रुपद जखमी होतात. द्रुपदाना लांबपल्याचे भाले फेकून जयद्रथाला घायाल केले. ते द्वंद्व फारच भयंकर होते. युद्ध पहाणाऱ्यांना ते द्वंद्व समाधान देत होते. विकर्ण तुझा मुलगा, त्याची फौज घेऊन सुतसोमाच्या फौजेवर चाल करून गेला. जरी विकर्ण सुतसोमाला अनेक बाण मारतो पण त्याला हरवू शकत नाही. सुतसोम सुद्धा विकर्णाला हरवू शकत नाही. पांडवांसाठी चेकितन सुसर्मनावर हल्ला करतो. दोघे तुल्यबळ आहेत. सुसर्मन चेकितनाचा हल्ला परतवतो यशस्वीपणे. दोघे एकमेकांवर बाण मारून चांगले युद्ध करतात.

मोठी हिम्मत असलेला गांधारचा राजा, शकूनी प्रतिविंध्यावर चाल करून जातो. तो युधिष्ठीराचा मुलगा आहे. त्यांचे द्वंद्व असे होते जसे सिंह आणि हत्ती लढत आहेत. त्या चढाईत प्रतिविंध्य शकूनाला घायाळ करतो. प्रतिविंध्याचे धारदार बाण त्याच्या अंगात घुसले होते. ते युद्ध असें होते जसे इंद्र आणि दानव लढत आहेत. शकूनीनेसुद्धा प्रतिविंध्याला बाणांने जेरीस आणले होते.

श्रुतवर्मन, सहदेवाचा मुलगा तेथे घुसला सुदक्षिणाशी लढण्यासाठी. सुदक्षिणा कंबोजचा राजा आहे. सुदक्षिणाने त्याच्यावर जोरात मारा केला. परंतु तो श्रुतवर्मनला हटवू शकला नाही. रागावलेला श्रुतवर्मन सुदक्षिणावर बाणांचा मारा करून जबर जखमी करतो.

इर्वान श्रुतायुशावर चालून जातो. अर्जुनाचा तो मुलगा प्रतिस्पर्ध्याच्या रथाचे घोडे मारतो. त्यानंतर मोठ्याने गर्जना करतो. त्याची ते युद्ध पहाणारे कौतुक करतात. तो सुद्धा अर्जुनाच्या मुलाच्या रथाचे घोडे मारून टाकतो.

अवंतीचे दोन राजपुत्र विंद व अनुविंद कुंतीभोजाच्या रथाकडे जातात व त्याला आव्हान देतात. कुंतीभोजाबरोबर त्याचे पुत्र होते. त्यात त्या अवंतीच्या राजपुत्रांचे धाडस पहाण्यासारखे होते. ते त्यांची मोठी फौज घेऊन लढत होते. अनुविंद कुंतीभोजावर गदा फेकतो. परंतु, कुंतीभोज बाणांच्या मदतीने ती डावलतो. दोनही बाजूनी हाणामारी होते तुल्यबळ असल्यासारखे वाटते. ती लढाई पहाण्यासारखी होती. केकया बंधू गांधार राजपुत्रांशी लढतात. असंख्य वीर त्यात मारले जातात. तुमचा एक मुलगा, वीरबाहू विराटाच्या मुलाबरोबर उत्तरा, लढत होता. त्याने उत्तराला बरेच बाण मारले. उत्तरासुद्धा त्याला बाण मारतो. छेड्डीचा राजा, शकुनीच्या मुलावर, उलूकावर चालून जातो. दोघे एकमेकांना बाणाने जखमी करतात. त्यांचे द्वंद्व कमालीचे भीषण होते. पहाणाऱ्याला भिती वाटावी असे ते होते. परंतु, कोणीही कोणाला बाद करू शकले नाही. दोघे

जबर जखमी झाले होते. त्या दिवशी पुष्कळ द्वंद्व झाली. त्याशिवाय पाईक, घोडेस्वार हत्तीस्वार असें बरेच वीर लढले व त्यापैकी कांही यमाकडे गेले.

ते युद्ध अधिकच गुंतागुतीचे झाले कारण कोण कोणाविरुद्ध ते न समजता ते वीर लढत होते कारण ते सगळे एकमेकांचे आप्त सुद्धा होते. एकच गोंधळ झाला होता. स्वर्गीय सिद्ध, चरण ऋषी त्याचे साक्षीदार होते. ते देव आणि दानवांतील युद्ध होते असें ते जाणत होते. हजारो हत्ती, रथ त्यात गुंतले होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग एकेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग बेचाळीसावा

संजय पुढे सांगतो, अहो राजा, मी आता तुम्हाला त्या शेकडो वीरांच्या लढण्याचे वर्णन करून सांगतो. ते पाईक आहेत. लढतांना ते कोणाशी लढतात ते पहात नव्हते, राजालासुद्धा एक सामान्य पाईक आव्हान देत होता. काकाशी पुतण्या लढत होता, मामाला त्याचा भाचा मारत होता. मित्रावर मित्र हल्ला करत होता. जो प्रतिस्पर्धी म्हणून पुढे येईल त्याला मारावयाचे असें धोरण सगळे बाळगून होते. अशी होती युद्धनिती त्या समरात. पांडव आणि कौरव अशाप्रकारे एकमेकांवर तुटून पडत होते जसे काय त्यांना दैत्याने पछाडले आहे. अनेक योद्धे लढता लढता रथातून खाली पडून मरत होते. सगळयांच्या डोळयात खून दिसत होता. अनेकांच्या रथाखाली चिरडून चिंधड्या होत होत्या. रथांची चाकं एकमेकात अडकून कित्येक रथ उलटून पडत होते. कांहीं सैनिकांच्या टोळया प्रतिस्पर्ध्याच्या टोळीवर हल्ला करून त्याना मारत होते. सगळे शत्रूपक्षाच्या सैनिकांचा खून पिण्यासाठी जणू उतावीळ झाले होते. प्रचंड आकाराचे हत्ती एकमेकांवर आदळत होते त्यावेळी त्यावरील अंबाऱ्या कोसळून खाली पडत होत्या. त्यांच्यावर बसवलेले ध्वजाचे खांब मोडून पडत होते. लढण्याचे प्रशिक्षण दिलेले ते गज प्रतिस्पर्ध्याच्या हत्तीशी झुंजत होते. मदांध असलेले हत्ती मद नसलेल्या हत्तीवर जोराचा हल्ला करत होते. त्यांच्या भयंकर चित्काराने सगळे आसमंत दुमदुमून जात होते. हत्तींच्या पायाखाली कित्येक पाईक चिरडले जात होते त्यात कोणाच्या पायाखाली कोणता सैनिक मरत होता ते समजत सुद्धा नव्हते. कित्येक हत्तींवर सैनिक वार करत होते त्यामुळें ते जखमी होत होते व त्याने चिडलेले ते हत्ती सगळया रणभूमीत विध्वंस करत फिरत होते. त्यांच्या पायाखाली दोनही पक्षाचे सैनिक मारले जात होते. त्या हत्तींना सांभाळणाऱ्या सैनिकांची मोठीच पंचाईत होत होती. घाबरलेले सैनिक जीवाच्या भितीने सैरावैरा धावत होते. कांहींनी त्यांची शस्त्र फेकून रणभूमीतून पोबारा केला होता. त्यामुळें मेलेल्या व पळून गेलेल्या सैनिकांची शस्त्रं मातीत विखरून पडलेली होती. त्यात गदा, तलवारी, भाले, ढाली असे बरेच कांहीं होते. त्यात मेलेल्या सैनिकांची मुंडकी, हात, पाय त्या शस्त्रांत अडकून पडलेले दिसत होते. फक्त ठार मारावयाचे हे एकच ध्येय त्या सैनिकांत दिसत होते. कोण कोणाच्या सैनिकाला मारत आहे ते समजत नव्हते. शत्रूचा सैनिक ओळखणे दुरापास्त होते. हातात मिळेल ते शस्त्र घेऊन व जर त्याचे शस्त्र गेले असेल तर जमिनीवर पडलेले शस्त्र घेऊन तो सैनिक लढत होता. एकच गोंधळ झालेला होता. कोणाचे किती मेले ते समजत नव्हते.

तेथे लढणारा प्रत्येक सैनिक जखमांनी भरलेला दिसत होता. तरी ते लढत होते. हवेत सोडलेले बाण वेगांने खाली येत असत त्यांच्या टोकांना असलेल्या धारदार सुर्यामुळें ते सैनिकांच्या, घोड्यांच्या आणि हत्तींच्या अंगात घुसत होते. कित्येक त्यामुळे तात्काळ मरत होते.

सैनिकांच्या मरतांना होणाऱ्या किंकाळ्या ऐकवत नव्हत्या. त्या ऐकावयाला येऊ नयेत म्हणून रणवाद्ये आणखीन मोठ्या आवाजात वाजवली जात होती. कोणी बाणामुळें तर कोणी हत्तीच्या पायाखाली तर कोणी हत्तीच्या सुळयाने जखमी होऊन असें मरत होते. घोडेस्वार त्यांच्या दिमाखदार घोड्यांवरून प्रतिस्पर्ध्याला आव्हान देत होते. त्यांचे सोन्याचे बाण शत्रूच्या अंगात धुसत होते व कित्येक घोडेस्वार त्यामुळे त्यांच्या घोड्यावरून खाली कोसळत होते. कित्येक वेगांने धावणारे घोडे रथावरून उडी मारून जात होते. तशात कांहीं त्यांच्या तलवारीने रथाच्या चालकाचे मुंडके उडवत होते.

रथी त्यांच्या आवाक्यात येणाऱ्या शत्रूपक्षाच्या पायदळातील सैनिकांचा धुव्वा उडवत होते. तसे पाहिले तर ते युद्धाच्या नियमांविरुद्ध होते पण ते कोण पहात नव्हते. कोणाचेच कोणावर नियंत्रण नव्हते. पक्त ठार मारणे एवढे एकच काम तेथे घडत होते.

अनेक हत्ती त्या त्या माऊताच्या ताब्यात राहिले नव्हते. ते धुमाकूळ घालत होते. त्यातच कित्येक मारले जात होते. कांही हत्ती गोंधळल्यासारखे कांहीं काळ स्तब्ध उभे रहात व नंतर कोठेही चाल करून जात त्यांच्या पायाखाली कित्येक रथ व त्यातील योद्धे व सारथी मारले जात होते. त्यामध्ये कोणाचा हत्ती कोणाच्या सैनिकाला मारील ते सांगता येत नव्हते. पांडवांचे हत्ती कधी कौरवांच्या व कधी त्यांच्याच पक्षाच्या सैनिकांना त्यांच्या पायाखाली तुडवत जात होते. त्यांच्या माहूतांना कांहीं नियंत्रण करता येत नव्हते. हत्तीच्या पायाखाली चिरडलेले सैनिक जे ओरडत ते ऐकून अंगावर शहारं उठत होते. कांहीं हत्ती तोल गेल्यामुळे किंवा मारले गेल्यामुळें खाली कोसळत तेव्हां त्या खाली कित्येक सैनिक मारले जात होते. कित्येक घोडे व त्यावरील स्वार हत्तींच्या सुळयाने मारले जात होते. चमकदार धार असलेले भाले जेव्हां फेकले जात तेव्हां त्याच्या सुर्यांच्या चमकणाऱ्या डोळयांना अंधेरी येत होती. फेकलेले भाले घोड्यांना छेदत होते व त्यांमुळें त्या घोड्याबरोबर त्यावरील स्वारसुद्धा कोसळत होते. त्यानेंच तो मरत होता. कित्येक सैनिक जखमाने भरलेले असले तरी लढत होते.

कित्येक सैनिक त्यांच्या देवाची प्रार्थना करत देवाच्या कृपेची हाक मारत लढत होते. कित्येक त्यांच्या नातेवाईकांची आठवण करत लढत होते. अनेक पाईक घोड्याच्या पायाखाली येऊन जखमी होत होते. कित्येक त्यांची शस्त्रं घालवून बसले होते, कित्येक त्यांच्या मृत सहकाऱ्यांच्या प्रेतात बसलेले होते त्यांच्या जखमा पहात. कांहीं मरण्याची वाट पहात विव्हळत होते. कित्येक तहानेने व्याकूळ झालेले पाण्यासाठी कोठे मिळते कां म्हणून इकडे तिकडे पहात होते. कांहीं शेवटचे क्षण मोजत रणभूमीत शांतपणे पडलेले होते. कित्येक सैनिक खाली मरून पडलेल्या सैनिकांच्या अंगावर पाय देत पुढे जात होते, त्यांना माहित नव्हते तो शत्रूच्या प्रेतांवरून जात आहेत कां मित्रपक्षाच्या प्रेतावरून जात आहेत. सर्वकडे विव्हळण्याचा आवाज ऐकू येत होता.

कांहीं भागात प्रेतांचा ढीग पडलेला होता तेथे कोणी लढत नव्हते. कांहीं शूरयोद्धे क्षत्रिय त्यांना झालेल्या जखमामुळें नाउमेद न होता जमेल तसे लढत होते. ते त्यांच्या जखमामुळे विव्हळतसुद्धा नव्हते. कांहीं मर्द झालेल्या जखमांकडे पहात मोठ्याने हसत होते त्यांना त्या जखमा युद्धाच्या आठवणीच्या निशाण्या वाटत होत्या. कोणाच्याही चेहऱ्यावर दुःख नव्हते कीं, त्यांना लढतांना इजा झाल्या त्यांचे म्हणणे असें होते कीं, ह्या जखमाच आमच्या क्षत्रिय होण्याच्या खुणा आहेत. कांहींचे रथ, घोडे हरवले होते ते दुसऱ्याच्या रथातून घोड्यावरून लढण्याचा विचार करत होते. त्या लढाईत राजे सैनिकांना मारत होते व सैनिक राजांना मारत होते. सगळीकडे एकच आरडाओरड ऐकू येत होती. अशारितीने त्या कौरव पांडवांच्या लढाईत मोठा नरसंहार होतांना ऋषी, साध्य आणि चरण पहात होते आकाशातून. त्या भयंकर लढाईत ज्यात कोणी कोणाला दया दाखवत नव्हते, पांडवांची फळी भिष्मापुढे थोडी झुकल्यासारखे वाटत होते. भिष्म त्यांच्या पांढऱ्या शुभ्र चांदीने मढवलेल्या रथात उभा राहून लढत होते. त्यांच्या रथावरील स्तंभावर ध्वज झळकत होता त्यावर पांच ताऱ्यांचे निशाण होते. त्यांचे ध्वजस्तंभ ताडाच्या झाडाच्या खोडाचा होता.

युद्धाचा पहिला दिवस भाग बेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग त्रेचाळीसावा

संजय पुढे सांगत असतो, त्या पहिल्या दिवसाच्या दुपार आधी जे भयंकर युद्धा झाले त्यात मोठा विनाश झाला होता. त्यामध्ये दुर्मुख आणि कृतवर्मन, कृप आणि सल्य आणि विविंसती तुमच्या मुलाच्या, दुर्योधनाच्या आग्रहाखातर ठरवतात की, ते भिष्मांना संरक्षण देतील. अशारितीने संरक्षण मिळाल्यावर भिष्म पांडवांच्या सैन्यात घुसतात. भिष्मांचा ताडाचा स्तंभ त्यात लांबून दिसत होता. अरे राजा, पुढे असे दिसले कीं, छेड्डी, पांचाल, करुष व काशीकर ह्यांच्या मधून भिष्माचे लांबपल्ल्याचे बाण शत्रूचा नाश करत होते. त्याचे रथ व त्यावरील ध्वज खाली कोसळत होते. त्यात मिळालेल्या यशामुळें भिष्म रथातच नांचत होते. त्याच्या वाटेत येणाऱ्या हत्तीवर ते वार करत होते त्यांच्या नाजूक भागावर ज्यामुळें ते प्रचंड हत्ती मोठ्याने किंचाळत असतं. ते पाहून रागवलेला अभिमन्यू भिष्माच्या रथाकडे सरसावला. त्याचा ध्वज सोन्याचा होता व कर्निका सारखा दिसत होता. तो भिष्म आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या योद्ध्यांच्या जवळ गेला. त्याच्या धारदार बाणांने तो भिष्मांच्या ध्वजावर हल्ला करतो. अभिमन्यू भिष्म आणि त्यांना संरक्षण देणाऱ्या पांच योद्ध्याना आव्हान देतो. कृतवर्मनला बाण लागतो. सल्य व इतर पांचांनासुद्धा तो नऊ बाण मारतो. त्यानंतर एक बरोबर नेम धरून मारलेल्या बाणाने तो त्याच्या प्रतिस्पर्ध्या सोनेरी स्तंभ पाडतो. दुसऱ्या एका बाणाने तो दुर्मुखाचा सारथी मारतो. दुसऱ्या बाणांने तो कृपाचार्यांच्या धनुष्याचे टोक मोडून टाकतो. त्याशिवाय तो महायोद्धा अनेक बाण मारून सगळयांना बेजार करतो. त्याची तिरंदाजी पाहून देव प्रसन्न झाले होते. त्याची तिरंदाजी पाहून तेथे लढणारे सगळे योद्धे त्याची तारीफ करत बोलतात कीं, तो अर्जुनाचा पुत्र शोभतो. त्याच्या धनुष्याचा टणत्कार गांडीवा सारखाच वाटत होता. भिष्म ते पाहून त्याच्यावर चाल करून जातात. ते अभिमन्यूला नऊ बाण मारतात. त्यानंतर ते अभिमन्यूचा ध्वज पाडण्याचा प्रयत्न करतात. त्याशिवाय त्याच्या सारथ्यालासुद्धा इजा करतात. त्याच वेळी कृतवर्मन, कृप आणि सल्य अभिमन्यूवर हल्ला करतात. तरी ते अर्जुनाच्या मुलाचा पाडाव करू शकत नाहीत. मनैका पर्वतासारखा तो त्यांना तोंड देत होता. जरी त्या सहाजणानी त्याला घेरले होते तो न डगमगता त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करत होता. त्याच्या त्या भडिमारामुळें ते बेचैन झाले होते व त्याच वेळी अभिमन्यू जोरानी एक सिंहगर्जना करतो. ते त्याचे युद्ध कौशल्य पाहून सगळे प्रसन्न झाले होते. भिष्मसुद्धा त्याची तारिफ करत होते. भिष्म त्याच्यावर कांहीं बाण मारतात पण तो ते तोडून टाकतो. त्यानंतर तो नेमबाज नऊ बाण मारून भिष्माचा ध्वज खाली पाडतो. ते पाहून सगळे राजे टाळया वाजवून त्याचे कौतुक करतात. तो ताडाचा ध्वजस्तंभ जोराने आवाज करत जमिनीवर कोसळतो. ते पाहून भिष्माचा अभिमान दुखवला जातो. ते जोरांनी ओरडतात. त्यानंतर त्या दोघात मोठे घनघोर युद्ध होते. त्यात भिष्म त्यांच्याकडील दैवी शस्त्रे वापरतात.

त्याने भिष्म अभिमन्यूला बाणाच्या पिंजऱ्यात अडकवून ठेवतात. ते पाहून पांडवांचे महाबलशाली योद्धे अभिमन्यूच्या मदतीसाठी धावले. त्यात विराटाचा मुलगा, केकया बंधू, सत्यकी, धृष्टद्युम्न असें होते. त्यांच्या बरोबर त्याचा काका भिम सुद्धा तेथे वळला. ते सगळे भिष्मावर तुटून पडले. भिष्माने पांचालच्या राजपुत्राला तीन बाण मारले. भिष्म त्याचा दुधारी बाण मारून भिमाचा ध्वज खाली पाडतो. सत्यकीला तीन बाण मारतो. भिमाचा ध्वज पडल्यानंतर रागावलेला भिम भिष्मावर कांही बाण मारतो. तो कृपावरसुद्धा काहीं बाण फेकतो. कृतवर्मनावर आठ बाण मारतो. विराटाचा मुलगा हत्तीवर बसलेला होता. तो अभिमन्यूला मदत करण्यासाठी पुढे होतो. तो मद्र देशाच्या राजाला आवाज देतो. मद्र देशाचा राजा सल्य मात्र तो हल्ला चांगल्या प्रकारे परतवतो. विराटाचा हत्ती सल्याच्या रथाच्या दांड्यावरच पाय देतो. त्यात त्या रथाचे चार उत्तम घोडे मरतात. त्यामुळें संतापलेला सल्व एक लोखंडी शर (छोटा बाण) उत्तरावर असा फेकतो कीं, त्यामुळें उत्तरा मरावा. ते धारदार शर उत्तराच्या अंगरख्यातून घूसून आत देहाला लागतो व उत्तरा बेहोष होतो. तो हत्तीवरून खाली पडतो. त्याचा त्या हत्तीवरील ताबा रहात नाही. ते पाहून सल्य त्याची तलवार घेऊन त्याच्या मोडक्या रथातून उतरतो व विराटाच्या मुलाकडे जाऊ लागतो. उत्तराचा भाऊ पहातो कीं सल्याने त्याच्या भावाला मारले व स्वतः कृतवर्मनच्या रथातून पळत आहे तो संतापतो व त्याचे मोठे धनुष्य उचलून तो सल्यला मारण्यासाठी निघतो. ते त्याच्या धनुष्याने सल्यावर बाणांचा भडिमार करतो. ते पाहून कौरवांच्या बाजूचे सात रथी त्याला घेराव घालतात. ते सल्याला संरक्षण देण्याच्या उद्देशाने ते करतात. ते सात राजे होते, वृहद्बल, कोसालचा राजा, मगधाचा जयत्सेना, आणि रुकमराठा, जो सल्यचा मुलगा होता, विंद आणि अनुविंद, सिंधूचा राजा जयद्रथ आणि सुदक्षिण आणि बृहदक्षत्रचे सैनिक होते. ते सगळे उत्तराच्या भावावर, स्वेतावर तुटून पडले. त्यांच्या बाणांचा वर्षाव असा होता जसे मुसळधार पाऊस डोंगराच्या माथ्यावर कोसळतो. स्वेता त्या सगळयांना पुरून उरला होता. त्यांचे तिरकमटे मोडून गेले. तरी ताबडतोब ते नवीन तिरकमटे घेतात. त्यानंतर ते स्वेतावर सात बाण मारतात. त्यासरशी स्वेता ते नवीन घेतलेले तिरकमटेसुद्धा तोडून टाकतो. ते पाहून ते सगळे सात वीर जोरा जोरानो ओरडून स्वेतावर हल्ला करण्याचा प्रयत्न करतात. ते स्वेताच्या दिशेने शर फेकण्यास सुरूवात करतात. स्वेता तेसुद्धा उडवून लावतो. त्यानंतर स्वेता त्या प्रत्येकाला बाणाने जखमा करू लागतो. त्यातील एक रुकमराठाच्या अंगात घुसतो. त्याने रुकमराठा त्याच्या रथाच्या टपावर बेशुद्ध होऊन पडतो. त्याचा सारथी वेळ व्यर्थ न दवडता त्यांचा रथ तेथून बाहेर काढतो. स्वेता आता उरलेल्या सहा जणांना घेरतो. त्यांचे ध्वजाचे स्तंभ तो मोडून टाकतो. त्या सहाजणांचे रथ तो निकामी करतो व त्यांच्यावर सतत बाणांचा वर्षाव करत असतो. त्यांना पाडल्यावर स्वेता सल्याच्या मागे निघतो. ते पाहून कौरवांच्या सैन्यातून मोठ्याने ओरडा सुरू होतो. त्यानंतर दुर्योधन भिष्माबरोबर स्वेताच्या मागे पाठलाग करू लागतात. अशारितीने ते सल्याला मृत्यूच्या दाढेतून सोडवतात. त्यांच्यात मोठी लढाई प्रारंभ होते. ती लढाई पाहून कोणाच्याही अंगावर कांटा उभा राहील असें

होते ते युद्ध. रणभूमीत रथ, हत्ती असें विखुरलेले होते कीं,त्यातून वाट काढणे सोपे नव्हते. त्यानंतर भिष्म सगळया पांडवांच्या दोस्तांवर बाणांचा वर्षाव करू लागतात, त्यात अभिमन्यू, सत्यकी, केकया, भिमसेन, विराट, धृष्टद्युम्न, छेड्डी असे होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग त्रेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

# भाग चव्वेचाळीसावा

धृतराष्ट्र विचारतात, जसा तो महान योद्धा सल्याच्या रथाकडे जात होता, पांडव आणि कौरवांनी काय केले अरे संजया? त्यावेळी शंतनुच्या मुलाने काय केले मला सगळे सांग.

संजय सांगतो, अहो राजा, पांडवांच्या सरसेनानीला मदत करण्यासाठी सगळे पांडवांचे सेनानी स्वेताच्या पाठीशी उभे राहिले. त्यानंतर एक तुंबळ युद्ध झाले. ते सगळे भिष्माच्या रथावर तुटून पडले. त्या भयंकर युद्धाचा वृतांत मी आता तुम्हाला सांगतो. भिष्माने त्याच्या अधिकारात असलेल्या अनेक रथांचा वरचा भाग रिकामा केला. त्यानंतर तो प्रतिस्पर्ध्यांच्या रथावर बाणांचा वर्षाव करू लागला. त्यामुळें अनेकांची डोकी उडवली गेली. तो सूर्यासारखा चमकणारा आकाशात बाण सोडत होता त्यामुळें सारे आकाश अंधकारमय झाले होते. त्याच्या माऱ्यामुळें त्याच्या भोवती जमलेले त्याचे शत्रू दूर पळून गेले. त्या धमासान युद्धात बरेच वीर मारले गेले. त्यामध्ये चिलखत घातलेले प्रचंड हत्तीसुद्धा मारले गेले. अनेक रथांचा चुराडा झाला. रथावर रथ आणि घोड्यांवर घोडे पडलेले दिसत होते. क्षत्रियाला शोभेल असा मृत्यू त्यांना भिष्माने दिला होता. ते सगळे स्वर्गाला जात होते. त्या धुमश्चक्रीमुळें घाबरलेले हत्ती सैरावैरा धावत होते त्यांच्या पायाखाली कित्येक चुरडले जात होते. सारथी मारले गेल्यामुळें अनेर रथ वेडेवाकडे जात होते व त्यावरील योद्ध्याला त्यावरून लढणे शक्य होत नव्हते. त्या गोंधळामुळें माती हवेत उडून वातावरणात धुळीचे साम्राज्य पसरले होते. कोण कोणाला मारतोय तेसुद्धा त्यांना समजत नव्हते. असंख्य धनुष्यांचे टणत्कार आसमंत दणाणून सोडत होते. त्या काळोखीत योद्धे केवळ अंदाजाने बाण सोडत होते. नेमबाजीला वावच नव्हता. त्याच वेळी रणवाद्ये जोराने वाजवली जात होती त्यांच्या आवाजाने आणखीन गोंधळ उडवला होता. कोणी बोलले तर ते ऐकू येत नव्हते. रथ, घोडे अशी साधनं नष्ट झाल्यामुळें कित्येक योद्धे युद्धभूमी सोडून पळून जाताना दिसत होते. पळून जाणारे सुद्धा जबर जखमी होते. इजा झाली नाही असा एकही नव्हता. त्या लढाईत स्वेतांने अनेक कौरवांचा नाश केला होता. अनेक राजे व त्यांचे नातेवाईक त्यांने ठार मारले होते. शेकडो रथांचे सारथी त्यांची डोकी उडवली गेल्यामुळें त्यांचे रथ उलटून पडले होते व त्यातील वीर सुद्धा गारद झाले होते. स्वेतांने असंख्य योद्ध्यांना यमाकडे थेट पाठवलेले होते. स्वेताचा तो जोर पाहून भिष्माला संरक्षण देण्यासाठी गेलेले तेथून परतत होते, त्यांना त्यांच्या जीवाची जास्त काळजी वाटत होती. स्वेताच्या बाणाच्या आवाक्या बाहेर जे कौरव उभे होते ते अवाक् होऊन ते पहात होते. नरसंहार होतांना दिसत होता. त्या स्थितीत तो महारथी भिष्म धैर्याने तेथे रणभूमीत उभा राहून एकटा स्वेताशी लढत होता. भिष्माच्या माऱ्यांने घाबरलेले वीर त्याच्या आवाक्याबाहेर पळून जात होते. भिष्म पांडवांच्या अनेक फौजा नष्ट करत होता. स्वेताच्या मुखावरील हास्य

पाहून भिष्म चिडला व उत्स्फूर्तपणे त्याच्या अंगावर चाल करून गेला. भिष्माच्या विविध प्रकारच्या बाणांनी स्वेताला घेरले होते. ते दोघे एकमेकांवर चालून गेले जसें चिडलेले वाघ जातात. स्वेताने भिष्माला बाणांच्या पिंजऱ्यात कैद करण्याचा प्रयत्न केला. ते असें लढत होते जणू एकमेकांचा जीव घेणार आहेत. भिष्माची क्षमता अशी होती किं तो एका दिवसांत सगळे पांडवांचे सैन्य खतम करू शकत होता. परंतु, स्वेतामुळें ते शक्य नव्हते. ते पाहून पांडवांच्या बाजूचे सगळे खूष दिसत होते. ते पाहून संतापलेला दुर्योधन त्याची फौज घेऊन पांडवांच्या दिशेने निघाला. ते पाहिल्यावर स्वेता भिष्माला सोडतो व दुर्योधनाच्या मागे जातो. स्वेताचा राग इतका होता कीं, तो त्या दुर्योधनाचे सगळे सैन्य उध्वस्त करतो जसे वादाळांनी होते. वृत्र आणि वसवाच्या लढाईची आठवण ऋषींना झाले जे ते युद्ध पहात होते. स्वेतांने जोरात सात बाण मारले भिष्मावर. त्यामुळें विरश्रीने उत्मत्त झालेला भिष्म स्वेताला अडवतो. तो स्वेतावर दहा बाण मारतो. त्याच्या बदल्यात स्वेतांने बावीस बाण त्याच्यावर फेकले. ते पाहून सगळे आश्र्चर्य करू लगले. त्यानंतर मोठ्या आत्मविश्र्वासांने स्वेता भिष्माचे धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर एका मोठ्या धारदार बाणाने तो भिष्माचा ताडाचा ध्वजस्तंभ कापून टाकतो. तो उंच खांब कोसळतांना पाहून तुझे मुलगे समजले कीं, भिष्म त्याखाली अडकणार. तशी कल्पना पांडवांनी सुद्धा केली व ते पहात होते काय घडत आहे. त्यानंतर कौरवांचे लोक भिष्माला संरक्षण देण्यासाठी सरसावले. ती लढाई पहाणारे बोलत होते कीं, एक तर भिष्म मरेल किंवा स्वेता मरेल. ते ऐकल्यावर दुर्योधन भिष्माला संरक्षण देण्यासाठी आणखीन फौजा पाठवतो. त्यामध्ये वल्हिक, कृप, कृतवर्मन, सल्य होते. त्याशिवाय जरासंधाचा मुलगा, विकर्ण, चित्रसेन, विविंसती मोठ्या वेगांने त्या दिशेने निघाले. ते चहोबाजूने स्वेतावर बाण मारत होते. स्वेता कांहीं कमी नव्हता तो त्याच्या चलाखीने कांहीं बाण त्यांच्यावर असें मारतो कीं ते जखमी होऊन युद्ध करण्याच्या लायकीचे रहाणार नाहीत. त्यानंतर स्वेता भिष्माचे धनुष्य पुन्हा तोडून टाकतो. त्यानंतर भिष्म आणखीन एक धनुष्य घेतो व स्वेतावर बाण फेकतो. त्यामुळें चिडलेले पांडवांचा सरसेनापती भिष्मावर चाल करतो त्याला अनेक जागी जखमी करतो. ते सगळे पहात रहातात. अशारितीने भिष्माला शह देणारा योद्धा आहे हे पाहून सगळे ऋषी व देव आश्र्चर्य करत होते. ते पाहून दुर्योधन भलताच बेचैन दिसत होता. सगळयांना वाटले कीं, आता भिष्माला स्वेता ठार मारणार. त्यांनतर तुमचा आजोबा देवव्रत, रागावलेला दिसला. त्याचा ध्वज मोडणारा व कौरवांच्या सैन्याची धुळधाण उडवणारा स्वेता सगळयांच्या नजरेत भरला. भिष्माने पुन्हा त्याच्यावर बाण मारले पण ते सगळे बाण स्वेताने परतवले. भिष्म इतका चिडला कीं, तो त्याचे धनुष्य फेकून देतो. दुसरा मोठा तिरकमटा उचलतो व सात मोठे बाण मारून स्वेताचे घोडे मारून टाकतो. त्यानंतर स्वेताचा ध्वजस्तंभ मोडून टाकतो. स्वेताच्या सारथ्याचे डोके कापून टाकतो. ते झाल्यावर स्वेता महारथी योद्धा न डगमगता रथातूबन उडी मारून खाली उतरतो, त्याच्यावर भिष्म सतत बाणांचा वर्षाव करत असतो, स्वेता हाताने फेकावयाचे शर वापरू लागतो भिष्माच्या विरुद्ध लढण्यासाठी. त्यानंतर मोठ्या आवाजात तो

योद्धा भिष्माला बोलतो, "थांब थोडावेळ, पहा मी काय करतो", असें बोलून तो सापाचे विष असलेले शर भिष्मावर फेकतो. भिष्म न घाबरता ते शर त्याच्या बाणाने तोडून टाकतो. ते पाहून तुझे सगळे सैनिक आनंदाने ओरडू लागतात. त्याचे सगळे शर भिष्मांने तोडल्यामुळें तो क्षत्रिय संतापाने विवेकहीन होतो. तो तरी हसत हसत गदा घेतो व भिष्माला आव्हान देतो. तो गदाधारी साक्षात यम असावा असें वाटत होते. तो गदा घेऊन भिष्मावर चाल करून जातो. त्याचे फटके अडवत भिष्म रथातून उतरतो. स्वेता रागाच्या भरात त्याची गदा भिष्माच्या रथाच्या दिशेने फेकतो. भिष्माला मारण्यासाठी फेकलेली गदा रथावर आदळल्यामुळें त्या रथाचा नाश होतो. ती मंतरलेली असल्यामुळे त्याबरेबर तो रथ जळून खाक होतो त्यात भिष्माचा ध्वज आणि स्तंभ दोनही जळून जातात. भिष्म आता जमिनीवर युद्ध करण्यास सज्ज होतो. त्याला मदत करण्यासाठी सल्य आणि इतर योद्धे पुढे होतात. भिष्म त्यांच्या रथातून स्वेताच्या दिशेने जाऊ लागतो. त्यावेळी भिष्माला आकाशातून एक मोठा आवाज ऐकू येतो, तो स्वर्गीय आवाज त्याच्या भल्यासाठी होता. तो आवाज त्याला सांगतो कीं, "अरे भिष्मा वेळ न दवडता त्याला मार, ह्यावेळी मारलेस तर तुझा विजय होईल". ते ऐकल्यावर भिष्माला जोर येतो. आपण स्वेताला आता मारू शकतो ते तो समजतो. पांडवांपैकी कित्येक त्याच्या मदतीला धावले. त्यात सत्यकी, भिम, धृष्टद्युम्न, केकया बंधू, धृष्टकेतू,अभिमन्यू असे होते. त्यांना येतांना पाहून द्रोण, सल्य कृप पुढे सरसावले भिष्माला मदत करण्यासाठी. पांडवांच्या लोकांनी अशारितीने स्वेताला पूर्ण संरक्षण दिल्यामुळे स्वेता तलवार घेऊन भिष्माच्या धनुष्याला तोडतो. भिष्म समजतो कीं, ही वेळ गेली तर स्वेताला तो मारू शकणार नाही म्हणून तो दुसरा तिरकमटा घेऊन नेम धरून बाण मारतो स्वेताच्या दिशेने मारणार तों तो पहातो कीं, भिम त्याच्या दिशेने येत आहे. भिमसेन भिष्माला सहा बाण मारतो. त्याला उत्तर म्हणून देवव्रत त्यांच्यावर कांहीं बाण फेकतो. अभिमन्यू, सत्यकी, भिष्मावर बाण मारत असतात ज्यामुळें देवव्रताचे चित्त विचलीत होते. सत्यकीसुद्धा भिष्मावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्या सगळया योद्ध्यांना आवरत भिष्म स्वेताकडे सरकत होते. भिष्म ब्रह्मास्त्र असलेला तो बाण काढतो स्वेताला मारण्यासाठी. आकाशातील देव,ऋषी, उरुग, असें सगळे ते पहात असतात. पाताळातून पिशाच्च सुद्धा ते युद्ध पहात असतात. ते ब्रह्मास्त्र असलेला बाण स्वेताच्या चिलखतातून आरपार जाऊन जमिनीत घूसतो. त्यावेळी सूर्य मावळतीकडे झुकलेला होता. स्वेता मरतो. ते पाहून पांडवांच्या बाजूचे सगळे कष्टी होतात. दुसऱ्या बाजूला कौरवांच्या टोळीत आनंदीआनंद दिसतो. ते मोठ्या जोरांने आनंद व्यक्त करण्यासाठी ढोलकी वाजवू लागतात. त्याच्या मृत्यूने शिखंडी व इतर सगळे पांडव चिंता करू लागतात. त्यांचा सरसेनानी कामी आला म्हणून धनंजय व कृष्ण त्या दिवशीचे युद्ध थांबवण्याचा निर्णय घेतात. त्या दिवशीच्या लढाईवर सगळे चर्चा करू लागतात, आपापल्या तंबूत जाऊन.

युद्धाचा पहिल्या दिवसा भाग चव्वेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग पंचेचाळीसावा

धृतराष्ट्र विचारतो, "मला सांग संजया, स्वेता मेल्यावर ते पांडवांचे व पांचालांचे शूरवीर काय करतात"? "अरे संजया, आमच्या ह्या विजयामुळे मला फार हर्ष होत नाही, मला जे होत आहे त्याबद्दल लाज वाटत आहे. कुरू घराचे प्रमुख आमच्यावर फार प्रेम करतात. युधिष्ठीराच्या भितीने माझ्या मुलांने त्यांच्या कडून संरक्षण मागितले व ते देण्याचा शब्द त्यांने दिला. त्यानंतर ते सगळे घडत गेले, ती पंडुची मुलं अनेक प्रकारच्या त्रासातून गेली. त्यांनी किती त्रास विनाकारण सहन केले त्याच्या आठवणीने मला वाईट वाटते. त्याला कारण माझा नालायक मुलगा आहे. स्वेता युधिष्ठीराला प्रामाणिक होता म्हणून मेला, हे घडत आहे कारण माझा नालायक मुलगा आहे. तो मेल्यावर कोणत्या लोकांत जाईल कळत नाही. भिष्माला, कृपांना, द्रोणांना, मला, तुला, गांधारीला वासुदेवाला कोणा कोणाला हे युद्ध नको होते पण एका माणसाच्या हट्टाखातर किती माणसं मरत आहेत पहा. हे युद्ध भिमाला नको होते, अर्जुनाला नको होते, नकूल व सहदेवाला सुद्धा नको होते तरी ते दुर्योधनाच्या पापी प्रवृत्तीने होत आहे. विदूर, भार्गव, व्यास ह्यांपैकी कोणालाही ते नको होते. फक्त माझ्या कांहीं मूर्ख मुलांना पाहिजे होते. माझा मुलगा नेहमी त्या कर्णाचा व शकूनीचा सल्ला घेतो ते त्याच्या मनात पांडवांबद्दल विष भरत असतात. मला सांग, त्यानंतर पार्थ काय बोलला? त्याला कृष्णाची साथ अजून आहे कां? मला मात्र अर्जुनाची फार भिती वाटते. कुंती भाबीचा हा पुत्र सव्यसाची आहे. इंद्रासारखा शूर आहे. त्याच्याकडे सगळी दैवी शस्त्रं आहेत, जर तो रागावला तर सगळ्यांचा नाश करेल. त्याच्या नुसत्या आठवणीने मला भय वाटते. दुसरा मला भिववतो तो आहे पांचालांचा मुलगा यज्ञज धृष्टद्युम्न. आता मला सांग स्वेता गेल्यांनतर कोण सरसेनानी होत आहे पांडवांच्या बाजूला"? मला माहित आहे पांडवांचे चित्त कसे भडकलेले असेल. त्या कल्पनेने माझी शांती संपलेली आहे. मला पुढे काय होते ते सांग", संजय पुढे सांगतो, "अहो राजन, आपण सगळा दोष तुमच्या मुलावर टाकता हे योग्य नाही. जेव्हां कारवाई करावयाला पाहिजे तेव्हां तुम्ही मुलाचे ऐकत होता ते चुकला नाहीं कां"? आग लागल्यावर विहीर खोदण्यासारखे आहे हे आपले दुःख दाखवणे. दुपार उलटल्यावर त्या सुमारास स्वेताचा वध झाला. विराटाचा मुलगा शंख जो त्याच्या शौर्यासाठी प्रसिद्ध होता त्याने कृतवर्मन आणि सल्याला अडकवले होते. कारण सल्य कृतवर्मनाच्या रथात होता. त्याला पाहून शंख एक मोठे धनुष्य घेऊन कृतवर्मनाच्या दिशेने जाऊ लागतो. त्याचा संताप अनावर होता. मद्र देशाचा राजा सल्य त्याला मारावयाचा होता. तो सल्याकडे जात आहे ते पाहून तुमच्या सैन्याचे सात वीर त्याला घेराव टाकतात. ते पाहून युधिष्ठीराला फार काळजी वाटू लागते. अर्जुन शंखाला संरक्षण

देण्यासाठी पुढे सरसावतो. भिष्माच्या आवाक्यात तो येऊ नये असे केले जात होते. त्यानंतर भिष्म आणि अर्जुनात युद्ध सुरू होते. ते पाहून सगळे मोठ्या मोठ्यानो ओरडून त्यांचा उत्तेजन देत असतात. ते पहाण्यासाठी बाकीचे सगळे योद्धे त्यांच्या छोट्या लढाया बंद करून ते पहाण्यास पुढे होतात. दोनही बाजूचे वीर ते द्वंद्व पहाण्यासाठी उत्सुक असतात. ते होत असतांना सल्य गदा घेऊन रथातून उतरला व शंखाच्या घोड्यांना तो मारतो. शंख त्याचा रथ निकामी झाला म्हणून तलवार घेऊन रथातून उडी मारून खाली उतरतो. शंख त्वरित अर्जुनाच्या रथात शिरतो, त्यामुळे सल्य त्याला कांहीं करू शकत नाही. भिष्म त्याच्या धनुष्यातून असंख्य बाण फेकतो ज्यामुळे सगळे आकाश भरून जाते. त्या आकाशात फेकलेल्या बाणांमुळें पांचाल, केकया आणि मत्स्य देशाचे अनेक वीर मृत्यूमुखी पडतात. त्याबरोबर कौरवाचेसुद्धा तितकेच मरतात. द्रुपादाकडे भिष्म सरकतो, तेथे तो त्याच्याच नातेवाईकांना बाणाने मारत रहातो. त्या मारामुळें द्रौपदाचे सैन्य झपाट्याने कमी होत होते. भिष्म असा चमकत होता कीं, पांडवांचे सैन्य त्याला पाहू शकत नव्हते. पांडवांचे सैन्य पहाते कीं, त्यांना कोणी संरक्षण देत नाही भिष्माच्या हल्ल्यापासून ते सगळी कडे पहात असतात की कोणी त्यांना त्या बाणांच्या वर्षावापासून वाचवेल, पण कोणी नसते. भिष्माचे सत्र जोरात चालू होते. त्यांचा संहार होत होता. त्या मरणाऱ्या योद्ध्यांच्या किंकाळया ऐकवत नव्हत्या. भिष्माच्या कित्येक बाणात विष होते त्यामुळे सैनिक वेगांनी मरत होते. सगळीकडे पांडवांच्या फौजा मरून पडलेल्या दिसत होत्या. सूर्य मावळला होता व सगळीकडे अंधार झाला होता. भिष्म त्या रणात एकटाच उभा होता. अर्जुन त्या दिवसाची लढाई संपवतो व उरलेल्या सैन्याला छावणीकडे पाठवतो. युद्धाचा पहिला दिवस भाग पंचेचाळीसावा संपला.

## युद्धाचा पहिला दिवस

## भाग सेहेचाळासावा

संजय पुढे सांगतो. दोनही बाजूचे सैनिक आपापल्या छावण्यात गेले, दुर्योधन मात्र फारच खूष दिसत होता. भिष्म अजून त्याचा राग आवरू शकलेला नव्हता. अशावेळी युधिष्ठीर झप झप पावले टाकत वासुदेवाच्या तंबूकडे जात होता. तो फार चिंता करत असल्याचे दिसत होते. स्वेताच्या मृत्यूमुळे तो फारच व्यथित होता. भिष्माच्या हिम्मतीची त्याला कल्पना होती. कृष्णाच्या कडे गेल्यावर तो त्याला बोलतो. "अरे कृष्णा तो महारथी भिष्म त्याच्या बाणांने माझे सगळे सैन्य मारून टाकील, असे जर होणार असेल तर आपण काय करावयाचे"? "भिष्माशी वैर करून आपण मोठी चूक केली आहे असें मला वाटते. त्यापेक्षा मी वनात जाणे पसंत करतो. जसे किडे माकोडे मारावेत अशाप्रकारे तो माझे योद्धे यमाकडे पाठवत आहे. एका राज्यासाठी एवढा नरसंहार करणे कितपत रास्त आहे ते मला समजत नाही. माझे बंधूसुद्धा त्याच्या बाणांने जखमी झाले आहेत. त्याच्या माझ्यावरील प्रेमाची फार मोठी किंमत ते देत आहेत. अशा साठी जीव घालवणे कितपत योग्य आहे ते समजत नाही. त्यापेक्षा घोर तपस्या करणे मला जास्त योग्य वाटते. माझ्या खातर माझे लोक अशारितीने मारले जात आहेत हे मला अजिबात आवडत नाही. भिष्म त्याच्या स्वर्गीय शस्त्रांनी माझे शूर योद्धे ठार मारत आहे कारण ते त्याच्या तुलनेने फार छोटे आहेत. ही समतुल्यबळाची लढाई ठरत नाही. मला सांग माधवा, मी काय करावे म्हणजे हे थांबवता येईल. अर्जुन लढाईत मनापासून भाग घेत नाही हे मी पहात आहे. मला दिसते की एकटा भिष्म प्राणपणाने लढत आहे. भिमसुद्धा चांगला लढत आहे. ते दोघेसुद्धा क्षत्रियासारखे लढत आहेत. आपल्यामध्ये एकच धनंजय आहे जो भिष्म आणि द्रोणांना आवरू शकेल पण तो विशेष उत्साहाने लढत नाही असें मी पहात आहे. असेंच होत असणार तर लवकरच आपले सगळे सैन्य भिष्म व द्रोण नष्ट करतील मग कसले युद्ध आपण जिंकणार"?

असें बोलून तो पार्थ गप्प बसतो, कृष्णाच्या उत्तराची वाट पहात. युधिष्ठीराची ती अवस्था पाहून कृष्ण बोलतो. "असा दुःखी होऊ नकोस. तुझे सगळे भाऊ जबरदस्त योद्धे आहेत, त्याशिवाय सत्यकी, द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न असे वीर तुझ्याकडे असतांना अशाप्रकारे हात पाय गाळणे तुला शोभत नाही. त्याशिवाय अनेक उत्तम योद्धे तुझ्या बाजूने लढत आहेत त्यात शिखंडी आहे भिष्माचा काळ, मग तू असा घाबरून जातोस हे योग्य नाही".

ते ऐकल्यावर युधिष्ठीर बोलतो, "अरे प्रिशताच्या घराण्याच्या शूर योद्ध्या, धृष्टद्युम्ना, ह्यापुढे तू पांडवांच्या सेनेचा सरसेनापती असशील. पुरातन काळी जसे कार्तिकेयाने देवांचे सौन्य पुढे नेले तसे आता तू आपले सैन्य जिंकण्यासाठी पुढे नेणार आहेस. तुझ्या मागून आम्ही सगळे

म्हणजे मी स्वतः. भिम, अर्जुन आणि माद्रीचे नकूल व सहदेव त्यांच्या फौजानिशी लढणार आहोत. कौरवांचा पराभव करणे हे आपलं ब्रीद असेल".

ते ऐकून आनंदी झालेला धृष्टद्युम्न बोलतो, शंभूंनी दिलेल्या आदेशानुसार मी द्रोणाचा वध करणार आहे, त्यासाठी मी भिष्माला तोंड देणार आहेच. त्यांच्या बरोबर कृप, सल्य, जयद्रथ आणि द्रोण ह्यांना भिडणार आहे, माझ्या सौनिकांच्या सहाय्याने. त्या बरोबर आपले मर्द योद्धे माझ्यासह येणार आहेत. कौरवांचा पराभव करण्यासाठी आम्ही सगळे एकत्र आलो आहोत. त्याचे ते आवाहन ऐकल्यावर पांडवांच्या बाजूचे योद्धे एका सुरात ओरडून त्याला अनुमोदन दर्शवतात.

त्यानंतर युधिष्ठीर त्या नवोदीत सरसेनापतीला सांगतो, क्रौंचरुम नांवाचा व्युह रचावयाला पाहिजे. त्या रचनेमुळें आपल्या शत्रूचा आपण पाडाव करू शकू. प्राचीन काळी तो बृहस्पतीने इंद्राला शिकवला होता, दानवांचा पराभव करण्यासाठी.

धृष्टद्युम्न दुसऱ्या पहाटे धनंजयाला सैन्याच्या आघाडीला ठेवण्याचा निर्णय घेतो. अर्जुनाच्या रथावरील ध्वज व त्याचा स्तंभ दिमाखाने चमकत होते. ज्या रथाला तो स्तंभ जोडला होता त्याबरोबर तो तरंगत येत होता. त्याच बरोबर गांडीवधारी त्याच्या रथात शोभत होता. त्याच्या फौजे बरोबर कुंतीभोज आणि सैव्य त्याचे संरक्षक म्हणून तयार होते. त्याशिवाय देशर्नचा राजा, प्रयागचा राजा, अनुपक, दसेरक, किराट मोक्याच्या जागी योजलेले होते. युधिष्ठीर त्याच्या सह असलेले पतश्चर, हूण, पौरव, निषाध घेऊन मागची आघाडी धरून होते. त्यांच्या सह पिशाच्च, कुंडविश, मंदक, लडाख, तंगण आणि उद्र हे होते. अहो धृतराष्ट्र, त्याशिवाय शरव, तुंभूम, वत्स, नकुल त्यांच्यात होते. पांडवांपैकी नकूल, सहदेव अर्जुनाच्या डाव्या बाजूस होते. ते सगळे दहा हजार गाड्यात होते. त्याशिवाय मागून येणाऱ्या कित्येक हजार गाड्या होत्या. त्या सगळया आघाड्यांच्या बाजूनी हत्तीदल चालणार होते. ते असें दिसत होते जसे काय डोंगरच चालत आहेत. सौन्याची मागची बाजू विराट, काशीनरेश, छेड्डीचा राजा त्यांच्या कित्येक हजार सैनिकांसह सज्ज होते. अशा तयारीने पांडव सूर्य उगवण्याची वाट पहात होते. त्या सगळया सैन्याचे कपडे सुशोभित होते. त्यांच्या छत्र्या महागड्या होत्या. ते सगळे सूर्याच्या उगवत्या किरणांत चमकत होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग सेहेचाळीसावा संपला.

## युद्धाचा पहिला दिवस : भाग सत्तेचाळीसावा

संजय सांगत असतो, एक सशक्त व्युह रचना, जीला क्रौंच म्हणतात ती तयार झाली होती. आपला मुलगा कृपाचार्यांना बोलतो, सल्य, सोमदत्ताचे मुलगे आणि विकर्ण, अश्र्वत्थामा तसेंच बंधू दुःशासन तसेंच इतर त्यांच्या दोस्त राजांना उद्देशून, "आपण सर्व शस्त्र सज्ज आहोत, युद्ध विद्येत प्रवीण आहोत, धर्मशास्त्राचा चांगला अभ्यास आहे, आपण प्रत्येक महारथी आहोत, तुम्ही एक एक सगळया पांडवांच्या सैन्याचा खतमा करणारे अहात, अशात जेव्हां आपण एकत्र होऊन त्यांच्याशी लढणार असल्यावर विजय आपलाच होणार असें मी समजतो. त्यात पुनः भिष्मासारखे आपले सेनापती आहेत, त्याना तुम्ही संरक्षण द्यावयाचे आहे त्यासाठी मी नेमतो संस्थनेय, सुरसेना, वेनिक, कुकुर, शत्रूंजय, दुःशासन, विकर्ण, रुचिक, त्रिगर्त, मद्रक, यवन, नंद, उपनंद, चित्रसेन, मणिभद्रक हे ते संरक्षणाचे काम करतील. तुम्ही प्रत्येकजण तुमच्या फौजानिशी ते कराल. भिष्म व द्रोण पार्थाला अडवण्याचा प्रयत्न करणार आहेत. ते दोघे मोठी फौज घेऊन पांडवांनी रचलेला व्युह फोडण्याच्या तयारीला लागतात. द्रोणाचार्यांबरोबर कुंतल असतात. दशर्न आणि मगध त्यांना मदत करण्यासाठी असतात. त्यामध्ये विदर्भी, मेलक, करण, प्रवर्ण, आणि गांधारी, सिंधूसौवीर, सिवी, वस्तीस त्याच्या सैनिकांबरोबर असतात. ते भिष्माच्या मागोमाग असतात. शकूनी द्रोणांना संरक्षण देण्यासाठी नेमला जातो. त्या मागोमाग दुर्योधनाच्या सेनेत त्याचे सगळे बंधू, अश्र्वक, विकर्ण, वामन, कोसल, दर्दा, वृक, क्षूद्रक, मावला असे सगळे मोठ्या आनंदाने लढण्यासाठी तयार होतात. त्याशिवाय भुरिश्र्वर, साल, सल्य, भागादत्त, आणखीन विद व अनुविंद संरक्षणाच्या आणखीन आघाड्या सांभाळत होत्या. सोमदत्त, सुशर्मन, सुदाक्षिण कंबोजचा राजा, सतयुस, श्रृतयूस, हे उजवी बाजू पहात होते. अश्र्वत्थामा कृप कृतवर्मन, जे सतवत घराण्याचा आहे, एक फार मोठे सैन्य घेऊन सगळया सैन्याच्या मागे उभे झाले आहे. त्यांच्या मागे अनेक छोट्या मोठ्या राज्यांचे राजे जसे केतुमत व वसुदन काशीच्या राजाचा मुलगा, त्यांच्या फौजा सज्ज राखून होते. युद्ध सुरू होण्याकरता शंखू वाजवले जात होते. सैनिक मोठ्याने ओरडत होते. भिष्माने त्याचा शंख वाजवला. त्यानंतर कौरवांच्या सैन्याचे नगारे, ढोलकी वाजू लागली. त्या बरोबर पांडवांचे शंख वाजवू लागले. माधवाने त्यांचे पांञ्चजन्य, अर्जुनाने त्याचे देवदत्त वाजवावयाला सुरूवात केली. भिमाने त्याचे भलेमोठे पौंड्र वाजवावयाला सुरूवात केली. युधिष्ठीराने अनंतविजय वाजवले, नकूल व सहदेवांनी सुघोष व मणिपुष्प काढले. त्याप्रमाणे, काशीचा राजा, सैव्य, शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, सत्यकी, पांचालांचे पुत्र व द्रौपदीचे पुत्र असे सगळे आपापले शंख वाजवतात. त्या सगळया शंखांच्या आवाजाने आकाश फाटले. अशारितीने ते कुरु व पांडव एकमेकांवर चालून गेले.

युद्धाचा पहिला दिवस भाग सत्तेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग अठ्ठेचाळीसावा

धृतराष्ट्र विचारतात, "माझे व पंडुचे युद्धासाठी सज्ज झाले, कोणी पहिला वार केला"?

संजय सांगतो, सगळे सज्ज झाले होते तेव्हां योद्धे कांहीं काळ थांबलेले होते. त्यानंतर तुमचा मुलगा त्याच्या सैनिकांना आदेस देतो कीं जे सज्ज आहेत ते लढण्यास सुरूवात करतील. तो आदेश झाल्याबरोबर कौरवाच्या बाजूचे योद्धे पांडवांच्या सैन्यावर तुटून पडले. त्या दिवशीचे युद्ध सुरू झाले. त्यांनी हत्तींवर बाणांचा वर्षाव करण्यास प्रारंभ केला. भिष्माने पांडवांतील अभिमन्यू, अर्जुन, केकयाचा राजा, विराट, धृष्टद्युम्न, छेड्डीचा राजा, मत्स्य देशाचा राजा आणि इतर बलशाली योद्धे जे पांडवांसाठी लढत होते त्यांच्यावर बाणांचा पाऊस पाडण्यास सुरूवात केली. त्या माराने आघाडीचे बरेच सैनिक मेले. पांडवाची सेना पळून जाऊ लागली. ते पाहून धनंजयाला त्याच्या आजोबाचा रागवाला व तो कृष्णास सांगतो कीं, आपला रथ भिष्माच्या जवळ घेऊन जा. कृष्ण त्याप्रमाणें त्यांचा रथ त्या दिशेने नेतो. ते बोलणे झाल्यावर कृष्ण त्यांचा नावाजलेला तो रथ भिष्माच्या जवळ घेऊन जातो. त्याच्या ध्वजावर मारुतीचे चिन्ह तळपत होते. त्यातील मारुती मोठ्याने ओरडत होता व त्याशिवाय त्यातून इतर भयंकर मायावी प्राणी डोकावत होते. भिष्मापर्यंत जात असतांना ते कौरवांचे असंख्य सैनिक मारत जात होते. त्यात सुरसेनाची फौज जास्त मार खात होती. चवताळलेल्या हत्तीसारखा तो कौरवांच्या फळीत घुसत होता. भिष्माला संरक्षण देण्यासाठी सैंधव पूर्वेकडील राजा त्याशिवाय केकया, त्याला विरोध करत होते. द्रोण आणि विकर्ताचा मुलगा कर्ण अर्जुनाला सामोरी जाण्यास समर्थ होते पण इतर कोणीही त्या गांडीवापुढे टिकणे शक्य नव्हते. अखेरीस भिष्म अर्जुनवर बाण फेकू लागतात. ते एकाबत्तर बाण त्याच्यावर मारतात. द्रोण वीस, कृप पन्नास, दुर्योधन सेहेचाळीस आणि सल्य नऊ बाण मारतात. अश्र्वत्थामा साठ विकर्ण तीन, सैंधव नऊ, शकूनी पांच असें बाण अर्जुनाला मारले जातात. अर्तयानी पंडुच्या मुलाला तीन मोठे बाण मारतो. त्या सगळया बाणांमुळें अर्जुन सगळया बाजूने धरला गेला होता परंतु, तो त्याची हिम्मत हरत नाही. तो त्या सगळयांवर प्रतिहल्ला करत असतो. तो भिष्मावर पंचवीस जबरदस्त बाण फेकतो. कृपांवर नऊ फेकतो, द्रोणांवर साठ मारतो, विकर्णावर तून मारतो. अर्तयानीवर तीन मारतो, दुर्योधनावर पांच फेकतो, त्यावेळी पांडवांच्या बाजूचे सत्यकी, विराट, धृष्टद्युम्न द्रौपदीचे पांच, अभिमन्यू अर्जुनाला संरक्षण देण्यासाठी पुढे होतात. सोमकांच्या मदतीने पांचालचे राजपुत्र द्रोणावर हल्ला करतात. त्यावेळी द्रोण भिष्माला संरक्षण देण्यात अडकलेले होते. त्याच वेळी भिष्म पंडुच्या मुलावर ऐंशी जोरदार बाण फेकतो, ते पाहून तुझ्याकडचे फार आनंद व्यक्त करतात. त्यांचे उत्साह वर्धक ओरडणे ऐकून अर्जुन त्या विरोधकांच्या घेराव्यात घुसतो व बाणांचा वर्षाव त्यांच्यावर करण्यास सुरूवात करतो. ते पाहून

दुर्योधन भिष्माला बोलतो, कीं, त्यांच्या सैन्याचा अर्जुन फडशा पाडत आहे. असेंच जर होत गेले तर आपले सैन्यच उरणार नाही असे बोलून तो त्याची चिंता गंगापुत्राला सांगतो. जरी आपले मोठे योद्धे अजून जीवंत असले तरी अर्जुनाला मारल्याशिवाय हे थांबणार नाही.

ते ऐकल्यावर भिष्म त्याला सांगतो, क्षत्रियाला शोभेल असें बोल. असें बोलून तो पार्थाच्या रथावर चाल करतो. त्या दोघा लढवय्यांचे रथ एकमेकांसमोर उभे असतात. आता भयानक युद्ध होणार ते सगळे समजतात. ते भयंकर युद्ध सुरू होते. भिष्म अर्जुनावर नऊ बाण फेकतो. ते सगळे अर्जुनाच्या अंगात वर्मी घुसतात. त्याचवेळी अर्जुनाचे एक हजार बाण भिष्माच्या सर्वांगात घुसतात त्या बाणांच्या पिंजऱ्यात भिष्म फसलेला रहातो. ते दोघेही त्या प्रकारामुळें एकमेकांवर संतुष्ट झाल्यासारखे दिसते. भिष्माचे त्यानंतरचे सगळे बाण अर्जुन उडवून लावू लागतो. त्या दोघांनी फेकलेले व त्यानंतर मोडलेले असे सगळे त्या जागी विखुरलेले पडलेले दिसत होते. ते दोघे पुन्हा त्यांची तिरंदाजी चालू करतात. आतान ते त्यांच्या घोड्यांना बाण मारू लागतात. त्यानंतर ते त्यांच्या रथाच्या चाकांना बाण मारून ती मोडण्याचा प्रयत्न करू लागतात. अशारितीने तो त्या आजोबा नातवांचा एक प्रकारे खेळच सुरू होतो. कोणालाही दुसऱ्याला ठार मारावयाची इच्छी नाही हे स्पष्टपणे दिसत होते. त्यातील एक बाण वासुदेवाला लागतो. ते पाहून चिडलेला अर्जुन भिष्मावर तीन बाण असें मारतो कीं, भिष्माला त्याची आठवण राहील. बराच वेळ ते अशाप्रकारे खेळत होते पण कोणीही कोणाला हरवत नव्हते. त्यांचा तो खेळ इतर योद्धे पहात होते. त्यानंतर दोघेही त्यांची शंखवाद्ये वाजवू लागतात. त्या आवाजाने व त्यांच्या रथांच्या चाकांच्या आवाजामुळें सगळे आसमंत भरून गेले होते. ते दोघे योद्धे तुल्यबळ ठरले होते. त्यांच्या उंच ध्वजस्तंभामुळे ते कोठे आहेत ते समजत होते. त्यांने फेकलेल्या बाणांच्या पाठी ते अदृष्य होत होते. इतके बाण फेकले जात होते कीं, गंधर्, चरण, साध्य व ऋषीसुद्धा त्याना पाहू शकत नव्हते. ते सांगू लागतात कीं, असे द्वंद्व त्यांनी आधी कधी पाहीलेले नाही. कोणीही कोणाला हरवू शकत नव्हते. ते द्वंद्व चालू असतांना इतरत्र तुझे व पांडवांचे सैनिक विविध शस्त्रांच्या मदतीने एकमेकांना ठार मारण्यात गुंतलेले होते. त्यामध्ये द्रोण आणि पांचाल पुत्र धृष्टद्युम्न ह्यांचे द्वंद्व फार भयंकर होते. द्रोण धृष्टद्युम्नाला असंख्य बाणाने जेरीस आणत होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग एकोणपन्नासावा

धृतराष्ट्र पुढे विचारतात, अरे संजया, तू मला सांग द्रोण आणि धृष्टद्युम्नातील ते द्वंद्व कसे होत होते. मी समजतो कीं, नियती सर्वश्रेष्ठ असते. मला तुझे मत सांग भिष्माला त्याच्या अफाट ताकदीसह अर्जुनाला कां हरवता आले नाही"?

संजय बोलतो, ऐका राजे, त्या भयंकर द्वंद्वाची माहीती, अर्जुनाला इंद्रसुद्धा हरवू शकत नाही. धृष्टद्युम्नाच्या वर्मस्थानी बाण मारून द्रोण त्याचा रथ उलटवतो, ते संतापलेले द्रोण त्याचे घोडेसुद्धा जायबंद करतो. त्यानंतर तो त्याच्या बाणांनी पांचालच्या राजपुत्राला घेरून बंदिस्त करतात. त्यानंतर तो धृष्टद्युम्नाला मारून टाकण्यासाठी एक जालिम बाण काढतो. जो शक्राच्या बाणासारखा सामर्थ्यवान असतो. ते पाहून सगळी कडून बोंबाबोंब सुरू होते, थांब, थांब असे ते बोलू लागतात. धृष्टद्युम्न त्या परिस्थितीत खंबीरपणे उभा होता न डगमगता. तो द्रोणाने सोडलेला तो बलशाली बाण हवेतच तोडून टाकतो. त्यानंतर तो द्रोणांवर बाणांचा पाऊस पाडतो ज्यामुळे द्रोण भागद्वाजाचा पुत्र बावचळून जातो. धृष्टद्युम्नाचे ते शौर्य पाहून पांचाल व पांडवांच्या बाजूचे लोक आनंद व्यक्त करतात. त्यामुळें उत्तेजित झालेला राजपुत्र द्रोणावर एक प्रभावी शर फेकतो. तो पांचूचा बनवलेला होता. ते शर द्रोण हसत हसत तीन तुकड्यात मोडून टाकतो. ते पाहून नाउमेद न होता दृष्टद्युम्न त्यांच्यावर बाणांचा वर्षाव करू लागतो. अरे राजा, त्या बाणांच्या वर्षावामुळें न घाबरता भारद्वाजाचा मुलगा पांचालाच्या मुलाचा तिरकमटा तोडून टाकतो. ते होताच धृष्टद्युम्न द्रोणांच्या दिशेने गदा भिरकावतो. त्याबरोबर भारद्वाजाचा मुलगा त्याच्या चपळाईने त्याचा रथ दुसरीकडे असा वळवतो कीं, ती गदा जमिनीवर पडते. त्यानंतर तो धृष्टद्युम्नावर आणखीन बाण फेकतो. त्या बाणांना सोन्याची पंख होती. ते सोनेरी बाण धृष्टद्युम्नाच्या चिलखतातून जाऊन त्याच्या अंगात घुसतात. त्याच्या अंगातून भळभळा रक्त वाहू लागते, त्यानंतर तो पांच बाण द्रोणांवर सोडतो. ते दोघे वीर रक्ताने मांखलेले किंसुकीच्या रक्तवर्णी फुलासारखे शोभत होते. त्यांचे द्वंद्व चालूच होते. द्रोण पुन्हा एकदा त्याचा तिरकमटा तोडतो. त्याच्या धारदार बाणामुळें द्रोणांचा रथ तुटतो व ते जमिनीवर कोसळतात. ते पाहून सगळे पहाणारे एकच जल्लोष करतात. रथ तुटल्यामुळें धृष्टद्युम्न खाली उतरतो व हातात गदा घेऊन द्रोणांकडे जाऊ लागतो. ते पाहून द्रोण त्याच्या गदेवर बाण मारून ती त्याच्या हातातून खालू पाडतो. त्यामुळे ना उमेद न होता तो राजपुत्र एक भलीमोठी ढाल घेऊन देरोणाच्या दिशेने जाऊ लागतो. द्रोण त्याच्या बाणाने पांचाल पुत्राची चाल थाबवतो. द्रोणांनी फेकलेले बाण अडवण्यात तो ती ढाल वापरत असतो. ते होत असतांना महाबली भिम तेथे येतो. तो धृष्टद्युम्नाला मदत करण्यासाठी आला होता. तो एक बाण मारून द्रोणाला जखमी करतो. त्यानंतर भिम पांचल

पुत्रास त्याच्या रथावर घेतो. ते पाहून दुर्योधन कलिंगच्या राजाला सांगतो कीं, तो द्रोणाला मदत करील. ते भिमावर चाल करून जातात. आता द्रोण धृष्टद्युम्नाला सोडतो व राजा विराटाकडे व द्रुपदाकडे त्याचा मोर्चा वळवतो. ते पाहून धृष्टद्युम्नसुद्धा द्रोणाचा नाद सोडतो व युधिष्ठीराला मदत करण्यासाठी तेथे जातो. आता भिम व कलिगचा राजा ह्यांच्यात युद्ध सुरू होते. ते फारच भयंकर होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग एकोणपन्नासावा संपला.

## युद्धाचा पहिला दिवस

## भाग पन्नासावा

धृतराष्ट्र विचारतात संजयाला, मला सांग तो कलिंगचा महाबली राजा व भिम ह्यांच्यातील युद्ध कसे झाले. मला भिमाच्या कमालीच्या गोष्टी ऐकावयाला आवडते. तो त्याच्या गदेने काय कमाल करतो ते मला सांग.

संजय सांगू लागतो, तुमच्या मुलाच्या आदेशानुसार तो महाबली कलिंगचा राजा त्याची मोठी सेना घेऊन भिमाच्या दिशेने जाऊ लागतो. छेड्डी भिमाला मदत करण्यासाठी कलिगच्या सेनेवर चाल करतो. त्यावेळी केतुमत, निशाधचा राजपुत्र आणि श्रृतायू त्याला मदत करण्यासाठी पोहोचतात. ते भिमाच्या आमनेसामने येतात. केतुमत त्याची हत्तीदल घेऊन आलेला असतो. त्यावेळी छेड्डी, मत्स्य आणि कुरुष भिमाच्या नेतृत्वाखाली निशाधांवर हल्ला करतात. त्या युद्धात सैनिक एकमेकांचा जीव घेण्यासाठी उतावीळ होते असें दिसत होते. भि व त्याचे शत्रू ह्याच्यातील ती लढाई कमालीची होती. छेड्डीचे सैनिक कमी होते व कलिंगचे खूप जास्त होते परंतु, ती लढाई जोरात होत होती. छेड्डीचे संख्येने कमी असलेले सैनिक निशाधाना भारी जात होते. कांहींवेळांनी छेड्डीचे सैनिक भिमाचा आधार देणे थांबवतात तेव्हां भिम स्वतः कलिंगशी लढू लागतो. तो त्याच्या रथावरील माळ्यावरून कलिंगच्या सैन्यावर बाणांचा मारा करू लागतो. त्यात ते सैनिक मोठ्या प्रमाणात मारले जातात. त्यावेळी कलिंगचा राजा व त्याचा मुलगा शक्रदेव भिमावर तुटून पडतात. शक्रदेव त्याच्या नेमबाजीने भिमाचे घोडे निकामी करतो. त्यामुळें भिमाचा रथ निरुपयोगी होतो, ते पाहून शक्रदेव भिमावर धावून जातो. पावसासारखे शक्रदेवाते बाण भिमावर पडत होते. ते पाहून भिम त्याची भलिमोठी पोलादी गदा शक्रदेवावर फेकतो. त्या फटक्याने तो राजपुत्र तात्काळ मरतो. आपला मुलगा मेला आहे ते पाहून कलिंगचा राजा त्याची पलटण घेऊन भिमावर चाल करून जातो. भिम खाली उतरतो व हातात एक अजस्त्र तलवार घेऊन त्या सैन्याशी दोन हात करण्यासाठी तयार होतो. तेथे मोठे युद्ध सुरू होते. कलिंगचा राजा रागानें एक विषारी बाण भिमावर फेकतो. भिम त्याच्या भल्यामोठ्या समशेरीने त्या बाणाचे तुकडे करत व जोराने ओरडतो. त्यानंतर भिम त्याच्या भात्यातून एकवीस बाण राजावर मारतो. त्यानंतर भानुमत भिमावर हल्ला करतो. त्याच्या असंख्य बाणाने तो भिमाला त्यात अडकवतो. भिमाप्रमाणे भानुमताचा आवाज मोठा होता. तो सुद्धा ओरडून भिमाला आव्हान देत असतो. भिम भानुमताच्या हत्तीवर चढतो. भिमाला भानुमताचे जोराने ओरडणे आवडले नव्हते. तेथे चढल्यावर भिम भानुमताचे दोन तुकडे त्याच्या समशेरीने करतो. भानुमताचे तुकडे खाली पडतात. त्यानंतर भिम त्या हत्तीवरून उतरतो आणि त्या मेलेल्या राजाच्या प्रेताकडे पहात रहातो. त्यानंतर तो भिम त्या सैन्याचे हत्ती मारत जातो. त्याबरोबर अनेक सैनिक, घोडे व रथ

तो नष्ट करत जातो. यम असावा असा तो कलिंगच्या सैन्याचा संहार करत असतो. त्या तेथे त्याचे तांडव सुरू होते. ते अनेक योद्धे त्याच्या तलवारीने मारून टाकतो. त्याशिवाय कित्येक घोडे, हत्ती तो त्याच्या सलवारीने कापून काढत पुढे जात असतो. त्याचे ते रुद्ररुप पाहून सैनिक त्याच्यापासून पळून जातात. त्या धुमश्र्चक्रीत त्या हत्तींवरील अंबाऱ्या व इतर सामुग्री जमिनीवर कोसळत होती. ते रणांगण हत्तींच्या प्रेतांनी भरलेले होते. त्यातून चालत जाणे अशक्य होते. हत्ती मारल्यानंतर तो रथाचे घोडे मारू लागतो. त्याशिवाय तो ते रथ उचलून उंच फेकू लागतो व ते खाली येतांना कित्येक माणसे मरत होती. त्याच्या वाटेत येणाऱ्या वाईक सैनिकांचासुद्धा तो धुव्वा उडवत असतो. तेथे रणभूमीवर त्यांच्या प्रेताचा खच पडलेला असतो. सगळे रणांगण रक्ताने माखलेले होते. कित्येकांना तो त्याच्या तलवारीने मारत होता. कित्येक त्याला घाबरून पळून गेले जीवाच्या भितीने. अशारितीने भिम त्या कलिंगच्या मोठ्या सैन्याचा विध्वंश करतो. अशारितीने त्या प्रचंड सेन्याचा खतमा करत तो एका ठिकाणी येतो जेथे तो कलिगच्या श्रृताशूस पहातो. त्याला पहाताच तो रागाने त्याच्याक़े जाऊ लागतो. भिमाला येतांना पाहून तो बाण मारतो व भिमाला जखमी करतो. त्या हल्ल्यामुळे भिम आणखीन रागावतो. त्याच वेळी अशोक भिमाचा सारथी त्यांचा रथ त्याच्याकडे घेऊन जातो, भिम त्यावर चढतो. ते कलिंगच्या राजाकडे कुच करतात. भिम त्या राजाला थांब थांब असे  सांगतो. श्रृतायूश त्याच्यावर सपासप धारदार बाणांचा वर्षाव करत असतो. भिम त्याच्या लोखंडी धनुष्यातून लोखंडी बाण फेकतो सात, त्यामुळें श्रृतायूश मरतो. आणखीव दोन बाण तो त्याच्या संरक्षकांना मारतो व तेसुद्धा मरतात. त्याच प्रमाणे तो केतुमलाला बाण मारतो व तोसुद्धा यमाकडे जातो. त्यानंतर कलिंगचे असंख्य योद्धे त्यांची शस्त्र घेऊन भिमावर चाल करून जातात. भिम त्याच्या रथातून उतरतो व त्या सैनिकांवर तुटून पडतो. कलिंगचे सैनिक त्याला पाहून पळून  जातात. कलिंगचे हत्ती त्यांच्यावरील माहूत मेल्यामुळें सैरावैरा धावू लागतात. त्यांच्या पायाखाली त्यांचेच सैनिक चिरडून मरत असतात. एवढा मोठा संहार केल्यानंतर खुषीत तो त्याचे पौंड्र वाजवू लागतो. ते ऐकून उरलेले कलिंगचे सैनिक रणांगण सोडून पळू लागतात. त्या गोंढळात कित्येकजण एकमेकांवर आपटून त्यांचीच हत्त्यारे लागल्यामुळें मरतात. ते समजल्यावर युधिष्ठीर धृष्टद्युम्नाला सांगतो कीं, भिम एकटा लढ्रत आहे त्याला मदत करण्यासाठी सैन्याला आज्ञा कर त्याप्रमाणे तो पांडवांच्या सैन्याला भिमाला मदत करण्यासाठी आदेश देतो. तोपर्यंत भिमाने बहुतेक कलिंगचे सैनिक मारलेले असतात. तरी जे उरलेले असतात त्यांच्यावर पांडवांची सेना आक्रमण करते. त्यात भिमाला मदत करण्यासाठी सत्यकी जातो. त्यात शिखंडीसुद्धा असतो. भिम त्यांचे स्वागत करतो व धृष्टद्युम्नाचा लाल रंगाचा ध्वज उचलून घेतो. सत्यकी, सिनीच्या मुलगा त्यांना मदत करण्यासाठी जातो. त्यामुळें जो संहार होतो त्यामुळें रक्ताचे पाट वहात असतात. त्यात माणसांचे हत्तीचे व घोड्यांच्या शरीराचे तुकडे वहात असतात. त्यातून ओलांडून जाणे मुष्कित होते.

भिष्माला तो संहार समजतो. तो भिमाच्या दिशेने त्याचा रथ वळवतो. त्याबरोबर सत्यकी, धृष्टद्युम्न आणि भिमसेन स्वतः भिष्माला भिडण्यासाठी तयार होतात. ते चहोबाजूने त्याच्यावर बाणांचा वर्षाव करतात. भिष्म त्याना प्रत्यूत्तर देण्यासाठी बाणांचा असा वर्षाव भिमाच्या रथावर करतो कीं त्याचे घोडे मरतात. तसाच रथात बसून तो भिष्मावर कांही शर फेकतो पण भिष्म ते मोडून टाकतो. ते तुकडे होऊन जमिनीवर पडतात. भिम त्याची लोखंडी गदा घेऊन धृष्टद्युम्नाच्या रथात चढतो व ते दोघे निघतात. भिमासा वंदन करण्याच्या उद्देशाने सत्यकी भिष्माचा ताडाचा ध्वजस्तंभ मोडून टाकतो. भिष्माचा सारथी मेला होता भिमाच्या बाणांमुळें तेव्हां तो भिष्माचा रथ त्याचे घोडे त्या जागेतून पळ काढतात. कलिंगांचा संहार केल्यानंतर भिमाच्या अंगात विशेष जोर येतो. सगळे त्याची वहाव्वा करत असतात. त्यात मत्स्य व पांचाल असतात. भिम धृष्टद्युम्नाला मिठी मारतो व नंतर सत्यकीला आलिंगन देतो, सगळे फार खूषीत असतात. यदू कुळाचा सत्यकी बोलतो, त्या कलिंगच्या सैनिकांचे मोठे भाग्य कीं ते सगळे ह्या युद्धात वीरगती प्राप्त करून राहीले, कारण, त्यांना स्वर्गात प्रवेश मिळाला आहे. ते हत्ती व घोडेसुद्धा उर्ध्व दिशेने गेले आहेत. अशारितीने त्यांनी एकमेकांचे कौतुक केल्यानंतर ते आपापल्या रथात जाऊन तुझ्या सैन्याचा पराभव करण्यात गुंतले होते.

युद्धाचा पहिला दिवस भाग पन्नासावा संपला.

# युद्धाचा पहिला दिवस

## भाग एकावन्नावा

संजय पुढे सांगत असतो, दुपारची मध्य तोपर्यंत झालेली असते. सगळीकडे रथांचा, घोड्यांचा व हत्तींचा चुराडा झालेला होता त्या परिस्थितीत धृष्टद्युम्न त्याचा मोर्चा द्रोणाकडे वळवतो कारण त्याला मारणे हा त्याच्या जन्माचा उद्देश होता हे तो जाणून होता. तो प्रथम द्रोणाचा मुलगा अश्वत्थामा, सल्य, कृप ह्यांच्याकडे निघतो. तो बलाढ्य राजपुत्र द्रोणाच्या मुलाचे घोडे मारून टाकतो. त्याबरोबर अश्वत्थामा सल्याच्या रथात चढतो. धृष्टद्युम्न अश्वत्थामा बरोबर लढत आहे ते पाहिल्यावर अभिमन्यू सल्यावर बाणांचा वर्षाव करत पुढे येतो. अश्वत्थामा अभिमन्यूच्या अंगावर कांहीं पंख असलेले बाण मारतो. सल्यसुद्धे त्याला बाण मारतो, त्याचप्रमाणे कृपसुद्धा त्याच्यावर बाणांचा मारा करतात. अशारितीने अभिमन्यूवर सगळे मारा करत आहेत ते पाहून दुर्योधनाचा मुलगा त्याच्या वर वार करण्यासाठी सरसावतो. त्यांच्यात लढाई जोरात सुरू होते. अभिमन्यू त्याच्या चुलत भावाला पांचशे बाण मारतो. त्याच वेळी दुर्योधनाचा मुलगा लक्ष्मण अभिमन्यूचे धनुष्य तोडतो. अभिमन्यू ताबडतोब दुसरे आणखीन चांगले धनुष्य घेतो व लढाई चालू रहाते. आपल्या मुलाला अभिमन्यू मारत आहे ते पाहून तुझा मुलगा त्या ठिकाणी जातो. त्यानंतर सगळे कौरवांचे अभिमन्यूवर तुटून पडतात. त्याच्यावर बाणांचा वर्षाव होऊ लागतो. एवढ्या सगळयाने त्याला घेरले तरी तो अजिबात डगमगला नाही. अर्जुनाला ते समजते तसा तो त्याच्या मुलाच्या संरक्षणासाठी तेथे जातो. अर्जुन तेथे गेल्यामुळें त्या लढाईला विशे, महत्व प्राप्त होते व भिष्म त्याच्या संरक्षकांसह तेथे जाऊन अर्जुनाला आव्हान देतो. त्या सगळया सैनिकांच्या रथाच्या चाकांमुळें हवेत माती उडून कांहीं दिसेनासे होते. ते जसे अर्जुनाच्या बाणाच्या पल्ल्यात येतात त्यांचा फडशा पडतो. कोणालाही कांहीं दिसत नव्हते. तो अशुभ शकून ते समजतात. अर्जुनाच्या बाणाने कित्येकांचे ध्वजस्तंभ कोसळत होते. कित्येकांचे घोडे मरत होते व त्यामुळें रथ निकामी होत होते. एकच गोंधळ उडाला होता. त्या भयंकर माराने घाबरलेले राजे व त्यांचे सैन्य इतस्ततः पळत होते. अर्जुनाच्या बाणापुढे कोणी थांबू शकत नव्हते. सर्व रणांगणात अनेक शस्त्र विखरून पडलेली होती, त्यात मृत सैनिकांची शंव होती त्यांच्या अंगावरील सोन्याचे दागिने मावळतीच्या सूर्याच्या प्रकाशात चमकत होते. मोडून पडलेले रथ, त्यांच्यावरील छत्र्या, ध्वज स्तंभ सगळे असें पडलेल होते कीं, त्यातून मार्ग काढणे दुरापास्त होते. जे कोणी अर्जुनाच्या पुढे आले ते सगळे संपले. बाकीचे पळत होते. त्यानंतर धनंजय व वासुदेव त्यांची शंख वाजवू लागतात. ते पहात भिष्म हसत हसत द्रोणाचार्यांना बोलतो कीं, हा एकटा अर्जुन ह्या सगळया कौरवसेनेला पुरेसा आहे. त्या दोघांच्या मुखावर समाधानाचे हास्य होते. सूर्य अस्ताकडे सरकत होता. ते पाहून भिष्म द्रोणाला बोलतो कीं, आता युद्ध आजच्या दिवसासाठी थांबवले पाहिजे. तो

तसे आदेश देतो. दोनही बाजूच्या सेना आवरत्या घेतात. सगळे सैनिक एकतर थकले होते किंवा घाबरले होते. त्याना विश्रांती मिळाली पाहिजे.

सूर्य मावळला. त्या दिवसाची लढाई संपली होती.

युद्धाचा पहिला दिवस भाग एकावन्नावा संपला.

# युद्धाचा दुसरा दिवस

## भाग बावन्नावा

संजय सांगतो, रात्र संपली व दुसऱ्या दिवसाची झूंजुमुंजू झाली, भिष्म त्याच्या सैन्याला युद्धाच्या तयारीला लागण्याचे आदेश देतो. त्यानंतर तो कौरवांना जिंकवण्यासाठी एक व्युहरचना करतो त्याच्या सैन्याची. त्या रचनेला गरुड असें नांव आहे. त्या रचनेत गरुडाच्या चोंचीच्या जागी स्वतः देवव्रत रहाणार होते. डोळयांच्या जागी अश्वत्थामा आणि कृतवर्मन नेमले जातात. अश्वत्थामाला व कृपांना मदत करण्यासाठी त्रिगर्त, मत्स्य, केकया आणि वटधन नेमले जातात. भुरिश्रव, साल, सल्य आणि भागादत्त आणि मद्रक, सिंधसौवर, त्यांच्या बरोबर पंचनोदी नेमले जातात. त्याना साथ देणार असतात जयद्रथ, जो त्या गरुडाच्या रचनेत मानेच्या जागी असतात. त्या गरुडाच्या रचनेत पाठीच्या जागी दुर्योधन त्याच्या फौजेसह असणार असे ठरते. त्याला मदत म्हणून अवंतीचे विंद आणि अनुविंद नेमले जातात. त्यांच्यासह कंबोज, सुरसेन व शक हे नेमले जातात. गरुडाची शेपुट आहे मगध, कलिंग. दसेरक लोकांच्या टोळया त्यांच्या चिलखतानिशी सज्ज होतात उजवे पंख म्हणून. करुष, विकूंज, मुंड, कौंडीवृष, वृथद्वल हे डावे पंख असतात. ती रचना कौरवांनी केली आहे ते पाहिल्यावर सव्यसाची धृष्टद्युम्नाला घेऊन त्यांची रचना तयार करतो. त्यांची व्युहरचना फारच जबरदस्त होती. त्या रचनेचे नांव आहे अर्धचंद्र रचना. त्या रचनेत भिम उजव्या टोकाला रहाणार असतो, त्याच्या बरोबर सहाय्यक म्हणून बरेच छोटेमोठे राजे असतात. मधल्या भागात महावली विराट आणि द्रुपद नेमले जातात. त्यांच्या बाजूला नील असतो ज्याची विषारी शस्त्र प्रसिद्ध आहेत. त्याच्या बाजूला धृष्टकेतू, छेड्डी, काशिस, करुष, पौरव आणि धृष्टद्युम्न नेमले जातात. शिखंडी पांचालांच्या फौजेनी सज्ज असतो. त्याला मदत करण्यासाठी प्रभाद्रक व इतर सैन्य योजलेले होते. ते अर्धचंद्राच्या मधल्या भागात उभे राहिलेले होते. त्याठिकाणी युधिष्ठीर सत्यकी सह त्याच्या हत्तीदलासह सज्ज होता. द्रौपदीची पांच मुलं त्यांच्या मदतीला होती. त्याच्या जवळ इर्वान आणि भिमसेनाचा मुलगा घटोत्कच होता. त्यांच्या बरोबर शक्तिमान केकया ह्यांची फौज होती. त्या अर्धचंद्राच्या डाव्या टोकाला अर्जुन व श्रीकृष्ण सज्ज होते. अशारितीने एक मजबूत व्युहरचना पांडवांनी तुझ्या मुलांच्या पराभवासाठी योजलेली होती. त्यानंतर सूर्य उगवला व लढाई सुरू झाली. त्यात रथ आणि हत्ती ह्यांची झुंबड उठली होती. कित्येक रथ हत्ती उडवत होते. एकच गोंधळ उडाला होता. पुन्हा नरसंहार सुरू झाला दुसऱ्या दिवशीचा. रणवाद्ये त्यान गोंधळात भर घालत होती. तो आवाज स्वर्गापर्यंत गेला होता. ते देव, अप्सरा, ऋषी पुन्हा ते पहायला आले होते.

युद्धाचा दुसरा दिवस भाग बावन्नावा संपला.

# युद्धाचा दुसरा दिवस : भाग त्रेपन्नावा

संजय सांगत असतो, युद्ध सुरू झाल्यावर तुमच्या सैन्याचा मोठ्याप्रमाणात धनंजयाने संहार केला. तरीसुद्धा जे उरलेले होते ते तुमचे सैनिक धीर न घालवता पांडवांशी लढत राहिले होते. त्या युद्धात मृत्यू मिळावा ह्या एकमेव उद्देशाने ते तुमचे क्षत्रिय लढत होते जेणेकरुन त्यांना स्वर्ग प्राप्ती होईल. त्या त्यांच्या जोरामुळें पांडवांचेसुद्धा भारी नुकसान झाले. दोनही बाजूच्या फौजा इतस्ततः पसरलेल्या होत्या. हवेत धुळ पसरलेली असल्याने कोणालाही कांहीं पहाता येत नव्हते. युद्धाला तुफान जोर आला होता. योद्धे ध्वजस्तंभ, सैनिकांचे कपडे व बोलण्याची भाषा ह्यावरून शत्रूपक्ष अजमावून त्यानुसार लढत होते. कौरवांने जो व्यूह रचसा होता तो पांडव तोडू शकत नव्हते. त्याच प्रमाणे पांडवांचा गरूडसुद्धा तसांच अवघड होता कौरवांसाठी. कारण त्याचे संरक्षण सव्यसाची आणि भिम करत होते. हत्ती आणि रथ यांची दल एकमेकांवर हल्ला करत होते. त्याचा लढाई भाले आणि बाण ह्याने होत होती. ते भाले सोन्याची टोके असलेले होते. रथदलाचे वीर हत्तीवर सुद्धा हल्ला करत होते. त्याच प्रमाणे हत्तीचे योद्धे रथदलावर आक्रमण करत होते व त्यात रथांचा चुराडा होत हता. त्यात अनेक सारथी व रथी मारले जात होते. त्यांच्या धारदार शस्त्रांनी योद्धे, घोडे आणि हत्ती असें सगळे जबर जखमी होत होते. लांबून फेकलेल्या भाल्यांमुळें जखमी झालेले हत्तीवरील स्वार खाली कोसळत होते. कित्येकांच्या मजबूत चिलखतांमुळें त्यांना मारलेले भाले व बाण त्यांना इजा न करता खाली पडत होते. काटेरी गदा, लोखंडी गदा अशा प्रकारच्या आयुधाने ते जोरात लढत होते. एकच उद्देश होता, प्रतिस्पर्ध्याला ठार मारणे. त्यात कित्येक घोडे तलवारीच्या घावांमुळें जखमी होऊन धारातीर्थी पडलेले दिसत आहेत. कित्येक सैनिक जीवाच्या भितीने घाबरून पळून जातांना दिसत होते. तुझ्या बाजूचे भिष्म,द्रोण आणि जयद्रथ त्याशिवाय पुरुमित्र, विकर्ण, गांदारचा राजा शकूनी, असें महायोद्धे पांडवांची फळी तोडण्यात कांहीं प्रमाणात यशस्वी झालेले दिसत होते. पांडवांच्या बाजूचे भिमसेन त्याचा राक्षस पुत्र घटोत्कच, सत्यकी, चेकीतन, द्रौपदीची मुलं, त्यांच्या मदतनीस राजांच्या सहाय्याने तुमची फळी तोडत होते. ते युद्ध दोव आणि दानवांचे आहे असें आकाशातून पहाणारे ऋषी बोलत होते. रक्ताने माखलेले ते शूर वीर तांबड्या कंसुकीच्या फुलासारखे भासत होते. त्यासुमारास तुझा मुलगा दुर्योधन मोठी सेना घेऊन पांडवांच्या फौजांवर चाल करून जातो. त्याला अडवण्यासाठी सगळे पांडव त्याला बाद करण्यासाठी त्या बाजूला जातात. भिष्म व द्रोण अर्जुनावर चालून गेले, अभिमन्यू सत्यकी शकूनीवर चालून गेले. त्यांच्या एक महाभयंकर युद्ध सुरू झाले. ते युद्ध पहाणाऱ्याच्या अंगावर कांटा उभा रहात होता. कोणालाही कोणाची दयामाया नाही असें ते एकमेकांवर वार करत होते.

युद्धाचा दुसरा दिवस भाग त्रेपन्नावा संपला.

# युद्धाचा दुसरा दिवस

## भाग च्योपन्नावा

संजय सांगत असतो, तुझ्या बाजूचे राजे फाल्गुनीला घेरा घालतात. त्यांची संख्या भरपूर होती. ते समशेर, गदा भाले अशा हत्याराने त्याच्याशी लढणार होते. कांहींच्या हातात सोटे व काटेरी गदा होत्या. ते त्याचा रथ मोडून टाकण्याच्या इराद्याने त्याच्यावर हल्ला करतात. ते युद्द पाहून स्वर्गातील दानव, राक्षस, पिशाच्च, गंधर्व, उरुग, असें प्रजातीतील अर्जुनाची स्तुती करू लागतात. ते त्याचा उत्तेजन देऊ लागतात. शकूनीचे योद्धे तो कृष्णाचा रथ मोडण्यास सुरूवात करतात. ते पाहून सत्यकी त्याचा रथ सोडतो व अभिमन्यूच्या रथात चढतो व त्याकडे जातो. तो त्या योद्ध्यांचा संहार करण्यास प्रारंभ करतो. दुसरीकडे भिष्म व द्रोण युधिष्ठीराचे सैन्य मारून टाकत असतात. त्याचवेळी प्रतिविंध्य, नकूल सहदेव द्रोणांची सेना कापून काढत असतात. ती सगळी लढाई रक्तरंजित होती. प्राचीन काळी होऊन गेलेल्या देव दैत्य ह्यांच्या लढाईची आठवण त्या पहाणाऱ्या ऋषींना होत होती. भिमसेन आणि त्याचा मुलगा घटोत्कच त्यांचे काम उत्तम करत होते. घटोत्कच एक बाण मारून दुर्योधनाच्या छातीत मोठी जखम करतो. त्या जखमेमुळें दुर्योधन त्याच्या रथात बेशुद्ध होऊन पडतो. त्याचा सारथी ते पाहून तो रथ घेऊन रणांगण सोडून जातो. ते पाहून दुर्योधनाचे सैन्यसुद्धा युद्ध सोडून निघून जाते. त्यामुळे उत्साह पांडवांचा वाढतो व भिमसेन जोरांने तुझ्या सैन्यावर हल्ला करतो. दुर्योधन व त्याची फौज पळून गेल्यामुळें कौरवांचा उत्साह कमी होतो व त्याचा फायदा घेत धृष्टद्युम्न आणि युधिष्ठीराचे सैन्य तुझ्या फौजांची मोठ्या प्रमाणात कत्तल करतात. ते पाहू तुझे मुलगे युद्धभूमी सोडून पळू लागतात. त्यांना वाटते कीं, दुर्योधन मेला असावा. त्या पळणाऱ्या सौन्याला भिष्म आणि द्रोण आवरू शकत नाहीत. त्या पळणाऱ्या सैन्यावर अभिमन्यू व इतर पांडवांचे वीर जोरांने हल्ला करतात. त्यात बरेच सैन्य मारले जाते. त्यावेळी सूर्य मावळतीकडे झुकत होता. तो दिवस पांडवांचा होता कारण त्या दिवशी तुझ्या सैन्याची फार मोठ्या प्रमाणात हानि पांडवांनी केली आहे. तेवढ्यात दुर्योधन शुद्धीवर आला व त्याला समजले कीं, काय होत आहे. ते पाहून तो पुन्हा युद्धभूमीत आला व त्याच्या सैनिकांना धीर देऊ लागला. त्याला पाहून तुझ्या सैन्याला धीर आला व ते पळायचे थांबतात. दुर्योधन मेलेला नाही हे समजल्यावर ते पुन्हा लढण्यासाठी सज्ज होतात. दुर्योधन त्यानंतर भिष्म, द्रोण, कृप ह्यांना उद्देशून बोलतो कीं, जरी मी मेलो तरी हे युद्ध अंता पर्यंत नेऊन पांडवांचा पराभव करणे हे आपले काम आहे हे लक्षात असू द्या कारण आपण धृतराष्ट्रासाठी लढत अहात. पांडवांचा त्यामुळें फायदा होईल हे मला अजिबात आवडणार नाही. असेंचजर तुम्ही करणार असाल तर मला तुमच्या जागी कर्णाला सरसेनापती म्हणून नेमावे लागेल. अशी तंबी तो भिष्माला देतो. ते दुर्योधनाचे बोलणे ऐकून भिष्म सारखे हसून लागले. ते फार रागावलेले दिसत होते. ते रागावून तुमच्या मुलाला बोलतात, "अरे मुला, मी तुला फार पूर्वीपासून सांगत आहे कीं, हे असेंच एक वेळ होणार आहे.

अरे मूर्खा, पांडवांना हरवणे इंद्राला सुद्धा शक्य नाही तरी तू हे युद्ध चालू ठेवत आहेस ह्याला काय म्हणावयाचे"? त्यानंतर भिष्म तुझ्या मुलाला आश्र्वासन देतात कीं, ते त्यांना जमेल इतके करतील. ते ऐकून दुर्योधन खूष झाला. त्यानंतर भिष्म पांडवांच्या फौजा आवरण्यासाठी काय करावयाचे त्याच्या सुचना देऊ लागतात. कौरवांच्या बाजूची रणवाद्ये वाजू लागतात व सैनिक शंखनाद करतात.

युद्धाचा दुसरा दिवस भाग च्यौपन्नावा संपला.

# युद्धाचा दुसरा दिवस

## भाग पंचावन्नावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, भिष्माने तसे आश्वासन दिल्यानंतर तो पांडवांच्या विरुद्ध कोणती चाल घेतो ते मला सांग.

संजय सांगू लागतो, भिष्म तुझ्या मुलांना व त्यांचे सैन्य घेऊन जेते पांडव ठाण मांडून हसले होते त्या ठिकाणी कूच करतो. तुमच्या पाप कारक धोरणामुळें पुन्हां ते युद्ध सुरू होते. धनुष्यांचे टणत्कार सर्वकडे ऐकू येऊ लागतात. ते योद्धे एकमेकांना कसे लढावयाचे त्याबद्दल सल्ला देऊ लागतात. त्या युद्धात क्षत्रिय मारले जाऊ लागले. ते जमिनीवर कोसळत असलेले दिसत होते. कित्येकांची मुंडकी खाली पडत असतांना धडं शस्त्रं हातात धरलेले असें उभे दिसत होते. रक्ताचे पाट वाहू लागले होते पुन्हा एकदा. माणसाच्या अंगाचे भाग व त्याबरोबर घोडे व हत्ती ह्यांचे अवयव त्या धारातीर्थी सर्वदूर पडलेले दिसत होते. त्या मधून रथ चालवणे व माणसांने सुद्धा चालणे अशक्य झाले होते. मेलेल्या सैनिकांचे अंगरखे, त्यांचे सोन्याचे मौल्यवान दागिने व शस्त्रं असें सगळे विखरून पडलेले होते. सूर्य सावकाशपणे पश्चिमेकडे झुकत होता. जखमानी भरलेले मरणोन्मुख असें पडलेले सैनिक ओरडत होते, त्यांच्या प्रिय जनांच्या नांवाने आवाज देत होते. परिस्थिती केवळ केविलवाणी वाटत होती. ते कोणासाठी व कां मरत होते ते त्यांनासुद्धा माहित नव्हते. कोणालीही भिती वाटावी असे ते दृष्य होते. त्याचवेळी शंतनुपुत्र त्याच्या मोठ्या तिरकमट्यातून लांबपल्ल्याचे बाण फेकत होता, आणखीन माणसे मारत होता. त्याच्या चौफेर बाणांच्या वर्षावामुळें पांडवांच्या पुढे सरकणाऱ्या फौजा रोकल्या गेल्या होत्या. भिष्माची ती कसब अशी होती कीं, जरी तो एकच होता अनेक सैनिकांसारखा ते एकटा लढत होता. भडकलेल्या अग्नीमध्ये जसें काजवे येऊन पडतात व तडफडत मरतात तसे पांडवांचे सैन्य भिष्माच्या बाणांच्या वर्षावात मरत होते. भिष्म एका बाणात एक हत्ती मारत होता. त्याचे बाण नेम चुकत नव्हते. दोन तीन क्षत्रिय एका रेषेत उभे होते ते एकाच बाणात तो मारत असे. एक बाण त्यांच्या उरातून आरपार जात असें. त्या बाणांच्या वर्षावामुळें पांडवांचे सैन्य धीर खचून जाभ लागले ते कृष्णाच्या समक्ष होत होते. भिष्माला थांबवणे शक्य नव्हते. इतके क्षत्रिय भिष्माने मारले कीं, पांडवांची बाजू रिकामी झाल्यासारखे वाटू लागले. पांडवांचे योद्धे मोठ्यामोठ्याने ओरडू लागले होते. त्यांना समजत नव्हते अशा माऱ्यापासून त्यांनी स्वताला कसे वाचवावयाचे. पांडवांच्या बाजूचे राजे रणभूमी सोडून जाऊ लागले. सगळीकडे एकच आकांत सुरू झाला होता. ते कृष्ण पहात होता थोड्या वेळानंतर तो पार्थाला सांगतो, "आता वेळ आली आहे, तुला जी संधी हवी होती ती आता तुला मिळत आहे अरे पार्था, आता भिष्मावर वार कर, तुला आठवते कां की, तू शपथ घेतली होतीस कीं, कौरवांचा नास करणार आहेस म्हणून"? आता तू भिष्माला मारून ते खरे कर. तुझे

सैन्य हा नष्ट करत आहे, भिष्म साक्षात यम बनून आला आहे असें दिसते. ते ऐकल्यावर अर्जुन बोलतो, "वासुदेवा, ह्या सैन्याच्या महासागराला ओलांडून माझे बाण भिष्माला वेधतील". त्यानंतर माधव त्याला बोलतो, मी रथ भिष्माच्या जवळ नेत आहे. अर्जुनाचा रथ भिष्माकडे जात आहे ते पाहून युधिष्ठीराच्या सैन्याला जोर येतो. भिष्मसुद्धा ते पाहून जोर जोरांने ओरडत अर्जुनावर बाणांचा वर्षाव करू लागतो. ते होत असतांना अर्जुनाचा रथ त्या बाणांच्या वर्षावामुळे एकदम अदृष्य होतो. त्यानंतर अर्जुन त्याच्या गांडीवाने एकच बाण मारून भिष्माचे धनुष्य तोडून टाकतो. तो वृद्ध योद्धा नवीन धनुष्य उचलतो. अर्जुन ते धनुष्य सुद्धा तोडतो. ते पाहून भिष्म अर्जुनाच्या कौशल्याचे कौतुक करतो. त्याला बोलतो कीं, त्याला अर्जुनाचा अभिमान वाटतो. तो आणखीन एक धनुष्य घेतो व अर्जुनाच्या रथावर नेम धरतो. परंतु, वासुदेव मोठ्या चलाखीने रथ असा हलवतो कीं त्यांचे बाण नेम चुकतात. त्यानंतर तो पुन्हा अनेक बाण मारून त्या दोघांना बाणांने घेरून टाकतो. त्यांच्या शरीरावर त्या असंख्य बाणांच्या खूणा दिसतात. त्या बाणांच्या नजखमांमुळें कृष्णाच्या अंगाला कांपरे भरते. भिष्माचा तो अवतार पाहून कृष्ण समजतो कीं, असेंच जर होत गेले तर आजच पांडवांचे सगळे सैन्य एकटा भिष्म मारून टाकून देईल. कृष्णाला ते सहन होत नाही. कृष्ण व अर्जुन दोघे जखमी झाले आहेत हे पाहून युधिष्ठीराचे सैन्य पुन्हा पळून जाऊ लागले. कौरवांचे सैन्य ते पाहून मोठ्या उत्साहाने लढण्यासाठी पुन्हा सज्ज होते. त्याच्या बाणाने सगळे आसमंत भरलेले होते. कोणालाही कांहीं दिसत नव्हते. अर्जुनाची ती अवस्था झालेली पाहून भिष्म त्यांच्या राजांना आदेश देतो त्यात द्रोण, कृप, विकर्ण, जयद्रथ,भूरिश्रव, श्रृतायूश, अमवस्थ, विंद, अनुविंद, सुदक्षिण, विविध जमातीचे राजे, सौविर, वसत, क्षुद्रक, मालव असें सगळे अर्जुनाच्या बाणाने भरलेल्या रथाला घेराव घालतात. सिनीचा नातू सत्यकी ते पाहिल्यावर त्या घेराव्याला बाहेरून त्याच्या सैन्यानिशी घेरावा घालतो व त्या कौरवाच्या सैन्याला वेढा देतो. जसें विष्णू इंद्राच्या मदतीस आला होता तो वृत्राशी लढताना तसे ते अर्जुनाला मदत करण्यासाठी गेले होते. तो युधिष्ठीराच्या सैनिकांना आवाहन करतो, "अहो क्षत्रियानो, आपण असें पळून कोठे जात अहात? अशाप्रकारे क्षत्रिय कधी नरणाच्या भयाने पळून जात नाहीत. आपण आपला दिलेला शब्द विसरू शकत नाही. भिष्म जर त्याची कमाल दाखवत आहे तर आपण आपली कमाल कां नाही दाखवत" ? ते ऐकून दशर्हांचा राजा (कृष्ण) त्याचे कौतुक करून बोलतो, "अरे सिनीच्या वंशजा, तू योग्यतेच बोलत आहेस. ज्यांना जावयाचे आहे त्यांना जाऊ दे. मी भिष्मावर हल्ला करतो. त्याला त्याच्या रथातून बाहेर फेकून देतो कसा ते पहा. त्या कुरु लोकांत मला तोंड देऊ शकतील असा एकही नाही. त्या दोघा वीरांचा म्हणजे भिष्म आणि द्रोण, नाश करून आपण कौरवांचा पराभव सहजपणे करू शकतो. मी तसे करून धनंजय, नकूल, सहदेव आणि भिमाकडून शाब्बासकी मिळवू इच्छितो. त्या सगळया दुर्योधनाच्या दोस्तांचा पराभव करून मी अजातशत्रूला त्याचे राज्य मिळवून देणार आहे. असें बोलून तो वासुदेव रथातून उडी मारून उतरतो व त्याचे सुदर्शन चक्र काढतो. ते भिष्माच्या दिशेने तो फेकणार त्या वेळी सगळी

पृथ्वी हादरून जाते, सगळे प्राणी ओरडू लागतात. कौरवांचा नाश समीप आला आहे असे ते दाखवतात त्यांच्या ओरडण्याने. ते सुदरेशनचक्र हातात घेतलेला जनार्दन समवर्त अग्नीसारखा तळपत होता. जगबुडीचे लक्षण त्यात होते. परंतु, भिष्म ते पाहून अजिबात डगमगला नाही, तो त्याला आवाहन करतो कीं, "ये कृष्णा ये देवांच्या देवा ये, मी तुला नमन करतो. तू शस्त्र घेऊन येत आहेस ह्यातच माझी विजय सिद्ध होत आहे. तुझ्या हातून मरण्यातच माझे भले होणार आहे ह्या आणि नंतरच्या जन्मात, माझी किर्ती होईल तिन्ही जगात त्यामुळे". शंतनुच्या मुलाचे ते उद्गार ऐकून कृष्ण भिष्मावर वेगांनी चालून गेला. कृष्ण बोलतो, ह्या नरसंहाराच्या मागे तू आहेस. तू दुर्योधनाचा मृत्यू आज पहाणार आहेस. तुझ्या सारख्या शहाण्याने त्या मूर्खाची साथ देण्याचे वचन  दिले त्यातच तुझा गुन्हा सिद्ध होतो. नियतीच्या चक्रात अडकलेला तो पापी चुका करत आहे व तू त्याला साथ देत आहेस ह्यासाठी तुला शासन होणे क्रमप्राप्त आहे. ते ऐकून भिष्म बोलतो कृष्णाला नियती सर्वश्रेष्ठ असते. तिला कोणीही बदलू शकत नाही. यादव त्यांच्या भल्यासाठी कंसाला सोडतात, त्याप्रमाणे, मी धृतराष्ट्राला सांगितले होते पण त्याने माझे ऐकले नाही. नि.तीने त्याची बुद्धी भ्रष्ट केली होती. विवेक संपला होता. ते बोलणे होत असतांना पार्थ स्वतः रथातून उतरतो व कृष्णाकडे जातो. तो कृष्णाचे दोनही हात धरतो. कृष्ण मात्र संतापलेला होता. तो अर्जुनाला जोरांने बाजूला फेकतो. ते दोघे त्या अवस्थेत भिष्मापर्यंत जातात. अखेरीस अर्जुन कृष्णाला आवरण्यात यशस्वी होतो. तो कृष्णाला बोलतो "अरे, जनार्दना, तू पांडवांचा त्राता आहेस. मी तुला वचन देतो कीं, मी माझे क्षत्रिय कर्तव्य तुझ्या सांगण्या प्रमाणे पार पाडीन, तू हातात शस्त्र घेऊ नकोस. तुझ्या आज्ञेनुसार मी माझे सगळे चुलत भाऊ मारून टाकीन पण तू आता आवर. मी तुला शब्द देतो. कीं हा संहार माझी जबाबदारी आहे".

ते ऐकल्यावर कृष्णाच्या मुखावर समाधानाचे हास्य उमटले. तो त्याच्या प्रिय मित्राबरोबर त्यांच्या रथाकडे वळतो. तो पुन्हा रथाचे सारथ्य घेतो. तो त्याचे शंख पांचजन्य वाजवू लागतो. त्या आवाजाने सगळे आकाश भरून जाते. तो आवाज ऐकून कौरव मोठ्याने ओरडतात एकच जल्लोश होतो. पुन्हा रणवाद्ये वाजू लागतात. पुन्हा युद्ध सुरू झाले. अर्जुन त्याचे गांडीव घेऊन कौरवांचा खत्मा करण्यासाठी सज्ज होतो. तो त्याच्या त्या अद्भूत धनुष्याने चौफेर बाणांचा वर्षाव करू लागतो. भिष्मासह सगळे कौरव अर्जुनावर चाल करतात. त्यात भुरिश्रव अर्जुनावर भाला फेकतो. दुर्योधन त्याच्या तलवारीने वेगात वार करतो. सल्य त्याची गदा घेऊन अर्जुनावर चालून जातात. परंतु. अर्जुन त्या सगळयांचे वार बाणांच्या माऱ्याने उलटवतो. अर्जुन त्याचे गांडीव घेऊन कांहींमंत्र उच्चारून महेंद्र अस्त्र फेकतो. ते थेट आकाशात जाते. त्यातून मुसळधार पावसाप्रमाणे बाणांचा वर्षाव होऊ लागतो. त्या बाणांच्या न थांबणाऱ्या वर्षावामुळें कौरवांचे सगळे अंदाज चुकतात. ते स्वताच्या संरक्षणार्थ धावू लागतात. भिष्मसुद्धा कांहीं करू शकत नाही. कोणाला कांहीं हालचाल करता येत नव्हती. त्या मारामुळें असंख्य हत्ती, घोडे व सैनिक मृत्यूमुखी

पडतात. कौरवांची सगळी रणवाद्ये वाजावयाची थांबतात. फक्त गांडीवाचा आवाज सगळीकडे ऐकू येत असतो. महेंद्र अस्त्राचे विशेष असें कीं त्यामुळे फक्त कौरवांचेच लोक मारले जात होते. पांडवांच्या कोणालाही त्याचा त्रास होत नव्हता. कौरवांची सगळी यंत्र व त्यांचे जादूचे इंद्रजाल निकामी झाले होते. इंद्राच्या नांवाच्या त्या अस्त्रामुळें त्या रणभूमीत रक्ताचे पाट वाहू लागतात. मृतांच्या फाटलेल्या शरीरातून जे भाग बाहेर आले होते त्यांमुळे च्यांचा चिखल झाला होता ज्यात अनेक मृत राजे, त्यांचे सैनिक कण्हत पडलेले होते. मृतांची चिलखतं मातीत पडलेली होती. त्या सगळया वरून रक्त व पाणी जोरांने वहात होते. जणू दुसरी वेतरणा नदी असें दिसत होते. ते रक्त चाखण्यासाठी कोल्हे लांडगे जमा व्हावयाला सुरूवात झाली होती. सूर्य थोडा मावळतीकडे झुकलेला होता त्यावेळी. त्या हत्त्याकांडात पुष्कळ कौरव, धृतराष्ट्राचे मुलगे मारले गेले होते. त्यामुळें पांडवांच्या बाजूचे छेड्डी, पांचाल, मत्स्य, कुरुष, खुषीत दिसत होते. कौरवांना घाबरवण्यासाठी तो जोराने ओरडू लागतात. विजयाचा आनंद ते व्यक्त करत असतात. कौरवांच्या सैन्याचे अनेक सेनापती मारले गेले होते. त्यामुळें ह्यापुढे त्यांच्या सैन्याचे नेतृत्व करण्यासाठी कोणी राहिले नव्हते. त्या एका हल्ल्याने भिष्म, द्रोण, कृप हवालदील झालेले दिसत होते. सूर्य मावळतीला जात होता त्याकरता त्या दिवसाची लढाई बंद करण्याचा निर्णय ते घेतात. त्या एका महेंद्रने दहाहजार सैनिक कौरवांचे कामी आले होते. जसे रात्र वाढू लागली, त्या कौरवांच्या छावण्यांतून जोराने रडण्याचे आवाज ऐकू येऊ लागतात. अनेकांचे आप्त त्यात मेले होते. अनेक कौरव मेले होते त्यामुळे दुर्योधन सुद्धा गप्प दिसत होता. त्या महेंद्र अस्त्राने सात हजार हत्ती, सगळे सौविर, क्षुद्रक, मालव मारले गेले होते. अर्जुनाने ओक मोठे काम केलेले होते त्या दिवशी. कौरवांच्या तळावर श्रृतायुष, चित्रसेन, द्रोण, कृप, अमवश्त, सल्य, साल, असें सगळे राजे एकत्र जमून पुढे काय करावयाचे त्यावर खलबत करू लागतात. त्यांच्या चांगल्या प्रकारे सजवलेल्या छावण्यात ते उद्या काय करावे ते ठरवत असतात.

युद्धाचा दुसरा दिवस भाग पंचावन्नावा संपला.

# युद्धाचा तिसरा दिवस :भाग छप्पन्नावा

संजय पुढे सांगत असतो. ती रात्र संपल्यावर युद्धाचा तिसरा दिवस सुरू होतो. त्याबरोबर संतापलेला भिष्म त्याचे मुख्य सेनानी त्यात द्रोण, जयद्रथ, कृप, वल्हीक, दुर्मर्शन, चित्रसेन आणि इतर महत्वाचे राजे घेऊन लढण्यासाठी सज्ज होतो. त्या फौजेतील हत्तींच्या पाठीवर ध्यज धारण केलेले स्तंभ होते विविध रंगाचे जसे, लाल, पिवळे, काळे, तांबडे, राखाडी वगैरे. कौरवांचे सैन्य मोठे दिमाखदार दिसत होते. ते सैन्य भिष्माच्या नेतृत्वाखाली अर्जुनावर चाल करून जाते. त्यामध्ये हत्ती, घोडे, पाईक असें सगळे होते. तुझा मुलगा तो कपीधारक रथ पहातो. तो पाहून सगळे कौरव एकदम खिन्न होतात. त्याचा लढण्याचा उत्साह संपुष्टात येतो. अर्जुनाच्या नव्या रचनेनुसार चार टोकांना प्रत्येकी चार हजार हत्ती ठेवलेले होते. अशा व्युह आधी कोणी केलेला नव्हता. आज पांडवांची रणवाद्ये जोरात वाजत होती. शंखनाद जोराने होत होते. सैनिक ओरडत होते मोठ्या उत्साहाने. आकाशात सूर्याची किरणं पसरल्यामुळे सगळे नभ एकाद्या छतासारखे उजळून निघाले होते. त्या बरोबर सैनिक लढण्यासाठी सज्ज झाले होते.

हत्तीबरोबर हत्ती, घोडेस्वारा बरोबर घोडेस्वार, पाईका बरोबर पाईक अशी लढाई सुरू झाली. अनेक योद्धे लढतांना खाली पडत होते त्याना तसेंच ठार मारले जात होते. तलवारी, ढाली, भाले असें जमिनीवर विखरून पडत होते त्या त्या लढवय्याच्ये शस्त्र जसा तो मरत असें. हत्तीच्या धुमाकुळीमुळें रथ, घोडेस्वार उलचून पडत होते. हत्तीचे सुळे कोणाच्या अंगात केव्हा धुसत ते सांगता येत नव्हते. अशा गोष्टी ही नित्याची बाब झाली होती. खाली कोसळणाऱ्या हत्तीच्या खाली किती मरत होते त्याची गणती नव्हती. घोडेस्वार खाली पडला कीं त्याचा घोडा पळून जात असें त्याच्या स्वाराकडे पहावयाला कोणी नव्हते. त्यादिवशी भिष्माच्या रथावर पांच माडाचे स्तंभ उभारलेले होते. तो मोठ्या वेगांने अर्जुनाच्या रथावर चाल करून जातो. त्याचवेळी इतर अनेक राजे त्याच्यावर चाल करून जात असतात. त्यामध्ये सल्य, द्रोण, कृप, विविंसती, दुर्योधन सोमदत्त असें होते. त्यावेळी शूर योद्धा अभिमन्यू त्या सगळया योद्ध्यांवर तुटून पडतो. त्या मध्ये अर्जुन अग्नीसारखा चमकत होता. भिष्म त्या दिवशी रक्ताची नदी वाहवणार होता असें वाटत होते. अभिमन्यूला बगल देऊन भिष्म अर्जुनाला भिडण्यासाठी जात असतो. अर्जुन त्याच्या गांडीवातून बाणांचा वर्षाव करत चालला होता. भिष्माच्या बाणाच्या वर्षावाला न डगमगता तो त्याच्यावर बाणाचा पाऊस टाकू लागतो. अर्जुनाच्या गांडीवातून इतर कौरवांच्या सौन्यावरसुद्धा बाणांचा बर्षाव होत असतो. आता सगळे दोनही बाजूचे शूरवीर त्या दोघांचे द्वंद्व पहात बसतात. त्या दोघांच्या धनुष्टाचे टणत्कार सर्वदूर ऐकू येत असतात.

युद्धाचा तिसरा दिवस भाग छप्पन्नावा संपला.

# युद्धाचा तिसरा दिवस : भाग सत्तावन्नावा

संजय पुढे सांगत असतो. द्रोणाचा मुलगा, भुरिश्रव, चित्रसेन, सल्य आणि साम्यमणी सुभद्रेच्या मुलाबरोबर लढतात. त्या पांच वीरांबरोबर लढणाऱ्या अभिमन्यूची सगळे तारिफ करत असतात. कोणीही त्या शूरवीरांपैकी त्याला हरवू शकत नाहीत. तो त्याचा मुलगा तुझ्या योद्ध्याने घेरला आहे असें पहातो, त्या सुमारास पार्थ सिंहगर्जना करतो. सुभद्रेचा मुलगा त्याच्या हिम्मतीची परिसीमी गाठत असतो. त्याच्या धनुष्याचे ठणत्कार सगळे आसमंत दणाणून सोडत होते. अश्वत्थामासा तो जखमी करतो. त्यानंतर अभिमन्यू साम्यमणीचे ध्वजस्तंभ मोडतो. त्यानमतर एक सोन्याचा बाण तो सोमदत्ताच्या मुलाच्या दिशेने सोडतो. तो अर्जुनाची पुत्र सगळयांना गोंधळात टाकत असतो. त्याच्या एका हल्ल्यात सल्याचे घोडे मारून टाकतो. त्याच्या त्या जोरदार बचावामुढे ते पांच नमते घेतात. त्याचा नाद सोडतात. तुझ्या मुलाच्या आज्ञेने त्रिगर्त, मद्रदेशी, केकया ह्यांच्या पंचवीस हजार सेनिकांची फौज पांडवांवर चाल करून जाते. ते सगळे किर्तीनच्या ञोवती गराडा घालतात. पांडवांच्या सेनेचा सरसेनापती पांचालचा राजपुत्र ते पहातो कीं, अर्जुन व अभिमन्यू ह्यांना कौरवांच्या सैन्याने वेढा दिला आहे. हजार हत्ती व घोडस्वार घेऊन तो धृष्टद्युम्न त्याचे धनुष्य ताणून त्या वेढ्याकडे सरकावतो. तो मद्रदेशी व केकयांच्या फौजांवर हल्ला करतो, त्यांच्यात युद्ध सुरू होते. त्यावेळी धृष्टद्युम्न अश्वत्थामाच्या खांद्यावर बाणांचा वार करून त्याला जखमी करतो. तो मद्रकांना जबर जखमी करतो. कृतवर्मनच्या संरक्षकाला, दमनाला ठार मारतो. जो पौरवांचा वारस होता. त्यावेळी साम्यमणीचा मुलगा पांचाल पुत्राचा जखमी करतो. त्याच्या सारथ्याला सुद्धा जखमी करतो. धृष्टद्युम्न एका बाणाने प्रतिस्पर्ध्याचे धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर तो त्याचे घोडे मारतो. साम्यमणीचा मुलगा त्याचा रथ निकामी झाल्यामुळें त्यातून उतरतो व हातात पोलादी समशेर घेऊन चालत धृष्टद्युम्नाच्या दिशेने चालत जातो. पांडवांचे सैनिक व स्वतः धृष्टद्युम्न त्याला झप झप त्याच्या दिशेने येत असलेला पहातात. जवळ आल्यावर तो धृष्टद्युम्नाच्या दिशेने त्याची धारदार समशेर फेकतो. पांचाल पुत्र त्याची गदा उचलतो व त्या समशेरीला बाजूला करतो. त्यानंतर त्या साम्यमणीच्या मुलाच्या डोक्यावर त्याच गदेने वार करून त्याच्या मस्तकाचा चुराडा करतो. ते केल्याने धृष्टद्युम्नाला मोठा आनंद होतो. साम्यमणीचा मपलगा मेल्यामुळें एकच गदारोळ होतो. साम्यमणी त्याचा मुलगा मेला हे समजल्याने चवताळतो. तो पांचाल पुत्रावर जोराने हल्ला करतो. त्यांच्यात धुमश्चक्री युद्ध होते. त्यात सल्यसुद्धा सामील होतो. धृष्टद्युम्नाच्या छातीवर वार करतो. पुन्हा तेथे लढाई होत रहाते.

युद्धाचा तिसरा दिवस भाग सत्तावन्न संपला.

# युद्धाचा तिसरा दिवस

## भाग अठ्ठावन्नावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, माझ्या मते नियती तुमच्या प्रयत्नापेक्षा जास्त परिणाम कारक असते. अरे संजया, तू सारखा सांगत आहेस कीं, माझे सैनिक पांडवांकडून मारले जात आहेत व पांडवांचे सैन्य त्यामानाने कमी मारले जात आहे. तुला ते सांगतांना फार आनंद होत असेल असें मला समजते. तू दाखवतोस कीं, माझ्या योद्ध्यात लढण्याची हिम्मत कमी आहे, तरी ते त्यांच्या परीने लढत आहेत विजय मिळवण्यासाठी. तू सारखा सांगतोस कीं, पांडवांना जय मिळत आहे व माझ्या कौरवांचा पराजय होत आहे. दुर्योधनाच्या चुकीच्या निर्णायाचे भयंकर परिणाम तू मला सांगत आहेस. मला ते सगले ऐकून असें वाटते की, पांडवांना कमजोर करणे अशक्य आहे.

संजय पुढे त्यांना सांगतो, फार मोठे पाप तेथे घडत होते, त्याची माहिती आता तुम्हाला मी सांगतो. असंख्य माणसांचा व हत्तींचे संहार होत आहेत त्या रणभूमीत. सल्याने धृष्टद्युम्नाला जखमी केल्यानंतर तो मद्रदेशाच्या राजाला मारतो. त्यानंतर तो पांताल पुत्र सल्याचा पूर्णपणे अडकवून टाकतो. ते द्वंद्व फार काळ चालले नाही परंतु, न थकता ते लढत होते. सल्य धृष्टद्युम्नाचे धनुष्य मोडून टाकतो. त्यानंतर तो बाणांचा बर्षाव सुरू करतो त्यामुळें धृष्टद्युम्न मोठ्या अडचणीत जातो, त्यावेळी अभिमन्यू त्याच्या मदतीला धावून जातो. तो मद्रदेशाच्या राजावर हल्ला करतो. मद्रदेशाचा राजा अरतयानी म्हणजेच सल्य त्याच्या बाणांच्या आवाक्यात आल्यावर त्याला आव्हान देतो, त्याला घायाळ करतो. त्यावेळी तुमच्या सैन्यातील राजे अर्जुनाच्या मुलाला आवरण्यासाठी पुन्हा आघाडी तयार करतात त्यात दुर्योधन, विकर्ण, दुःशासन, विविंसती, दुर्मर्शन, दुशाल, चित्रसेन, दुर्मुख, सत्यव्रत, पुरुमित्र होते. ते सल्याला संरक्षण देण्यासाठी आले होते. ते भिमाला समजते, तो त्वरितपणे धृष्टद्युम्न, द्रौपदीची पांच मुलं, नकूल व सहदेव असे घेऊन अभिमन्यूच्या मदतीला जातात. ते तुझ्या सैन्यावर जोराचा हल्ला करतात. एकमेकाच्या जीवावर उठल्यासारखे ते लढत होते. ते लढत असतांना त्या दोनही बाजूंचे राजे त्यांच्या मदतीला आले व एक धुमश्र्चक्री युद्ध सुरू झाले. तुझा मुलगा दुर्योधन धृष्टद्युम्नाच्या छातीत बाण मारतो. त्याप्रमाणें त्याचे सगळे त्याच्या अंगात अनेक बाण मारत असतात. त्याच वेळी तो प्रिशताचा पुत्र तुझ्या योद्ध्याना अनेक बाण मारत असतो व त्यामुळे ते जखमी होत होते. अभिमन्यू सत्यव्रताला व पुरुमित्राला जखमी करतो. भिमसेन दुर्योधनाकडे लक्ष देऊन असतो. त्याची गदा घेऊन तो दुर्योधनावर चाल करतो परंतु, दुर्योधन तेथून पलायन करतो. तुझा मुलगा मगधाच्या राजाला त्याचे मोठे सैन्य घेऊन पांडवांवर चाल करण्याचा आदेश देतो. त्यानंतर संधी साधून तो भिमावर वार करण्याच्या इराद्याने त्याच्या जवळ जाऊ लागतो. मगधाच्या लष्कराचे हत्ती त्यांच्या दिशेने येत आहेत ते पाहून रागाच्या भरात भिमसेन त्याच्या रथातून उटी मारून उतरतो गदा त्याच्या

हातातच असते. मोठ्याने ओरडून तो हत्तींवर हल्ला करतो. भिमसेन त्या हत्तींना ठार मारावयाला सुरूवात करतो. घाबरून गेलेले हत्ती सतेंम उभे रहातात. ते पाहिल्यावर पांडवांचे योद्धे भिमाच्या मदतीसाठी पुढे होतात. त्यात द्रौपदीची मुलं, नकूल, सहदेव, अभिमन्यू, धृष्टद्युम्न होते. ते बाणाने हत्तीच्या माहूताला ठार मारत जातात. वर्मी घाव घालून ते हत्तींचे गंडस्थळ फोटत होते. हत्ती त्यामुळें मरून कोसळत होते. मगधाचा राजा हत्तीवर बसलेला अभिमन्यूकडे हत्ती वळवतो. अभिमन्यू मगधच्या राजाचा वध करतो एका बाणाने. हत्तीच्या गराड्यात घुसलेला भिमसेन त्या हत्तीना मारू लागतो. कोणाचे दात तोडत, कोणाच्या सोंडी कापून असा तो त्या हत्तींचा नाश करत असतो. मेलेल्या प्रचंड आकाराच्या हत्तींच्या प्रेतामुळे ते रणांगण भरून गेले होते. कांहीं हत्ती वृकोदराला पाहूनच घाबरून पळून जात होते. साक्षात यमाचा अवतार असें भिमाचे स्वरुप झाले होते. गुराखी जसे काठीने त्यांची गुरं पळवतात तसे भिम हत्तीवा त्याच्या गदेने पळवत होता. त्या पळणाऱ्या हत्तींच्या पायाखाली कौरवांचे कित्येक मरत होते. त्या चौफेर पळणाऱ्या हत्तींकडे पहात हसत भिम शंकरासारखा त्या रणांगणात उभा होता.

युद्धाचा तिसरा दिवस भाग अठ्ठावन्नावा संपला.

# युद्धाचा तिसरा दिवस

## भाग एकोणसाठावा

संजय पुढे सांगतो, दुर्योधन पहातो कीं, त्याचे हत्तीदल भिम संपूर्णपणे नष्ट करत आहे तेव्हां तुझा मुलगा त्याच्या सगळया सैन्याला आज्ञा करतो कीं, ते भिमाचा नाश करतील. भिम मोठ्या आवाजात रणगर्जना करत फिरत होता. त्याच्यावर ते सैन्य चाल करून जाते. त्याला आवरणे देवांनासुद्धा अशक्य होते. उसळलेल्या सागरासारखे भिमाचे ते वागणे होते. तुझ्या आज्ञेमुळें कौरवांचे सैन्य ज्यात असंख्य रथ होते, घोडेस्वार होते, पायदळ होते, ते रणवाद्ये वाजवून त्यांचा जोर वाढवण्याचा प्रयत्न करत भिमाकडे निघतात. त्या धुमाकुळीमुळे कुरुक्षेत्री धुळीचे वादळ उठते. भिम न डरता त्यांच्यापुढे उभा होता. त्याच्या हातात गदा होती. त्या लढ्यात त्याचे साथी, धृष्टद्युम्न, शिखंडी, द्रौपदीची मुलं, अभिमन्यू व इतर त्याच्याबरोबर लढण्यासाठी उभे होते. भिम संतापाने लालबुंद झालेला त्याची पोलादी गदा घेऊन कौरवांच्या सैन्यावर धावून गेला. त्याने त्याच्या गदेच्या प्रहाराने त्याच्या पुढे जे आले त्यांचा चुराडा करण्यास सुरूवात केली. साक्षात यमाचा अवतार भिमसेनाने धारण केला होता. रथी, घोडेस्वार, पायदळाचे सैनिक अशा सगळयांना तो झोडून काढत होता. तो पिनाकधारी रुद्र आहे कीं, काय असे पहाणाऱ्याना वाटत होते. युगांताच्यावेळी जसे व्हावे तसे तेथे घडत होते. ते पाहून कौरवांचे सैन्य गर्भगळीत झाले. कौरवांच्या गटात दुःखाची छाया पसरली. ते पाहून भिष्म त्याच्या कडे सरकला. भिम त्याला पाहून संतापाने त्याच्या कडे धावून जाऊ लागला. दोघे मोठ्याने ओरडत होते. त्यावेळी सिनीचा नातु सत्यकी भिष्मावर नेम धरतो. त्यावेळी राक्षस अलमवुष त्याच्यावर दहा बाण मारतो. त्याची चाल रोखण्यासाठी बाकीचे कौरव बाणांचा पाऊस पाडतात. तरी त्याचे पुढे जाणे थांबत नाही. सगळे कौरव चिंता करत असतांना सोमदत्ताचा मुलगा भुरिश्रव मोठ्या जोमांने सत्यकीवर चालून जातो. त्याच्या हातात धनुष्य असते.

युद्धाचा तिसरी दिवस भाग एकोणसाठावा संपला.

# युद्धाचा तिसरा दिवस

## भाग साठावा

संजय पुढे सांगत असतो, भुरिश्रव रागाने सत्यकीचा नऊ बाण मारून जखमी करतो. त्याच वेळी सत्यकीसुद्धा त्या कौरवाला नऊ बाण मारून घायाळ करतो. त्यानंतर दुर्योधन त्याच्या भावांना घेऊन भुरिश्रवाच्या संरक्षणासाठी पुढे जातो. त्याच वेळी पांडव सत्यकीच्या संरक्षणासाठी पुढे सरसावतात. भिम त्याची गदा उंच उचलून तुझ्या मुलांवर धावून जातो. तुझा मुलगा भिमाला बाण मारतो. त्याला जखमा होतात परंतु, त्याने वृकोदराच्या वागण्यात तीळमात्रही फरक पडत नाही. भिम त्याच्या प्रचंड रथात चढतो व त्याच्या सारथ्याला, अशोकाला आज्ञा करतो, "मला ते मारण्यासाठी येत आहेत तेव्हां मींच त्या सगळया कौरवांना तुझ्या समक्ष मारून टाकणार आहे. म्हणून तू माझा रथ त्यांच्यामध्ये घाल". असें बोलल्यानंतर वृकोदर तुमच्या मलांवर बाणांचा वर्षाव करू लागतो. दुर्योधनाच्या छाताडात त्याचे बाण घूसतात. दुर्योधन सुद्धा बाण मारतो त्यातील कांहीं अशोकाला लागतात. दुर्योधन त्याच्या बाणांने भिमाची त्याच्या धनुष्यावरील पकड तोडतो व ते धनुष्य खाली पडते. भिमाला आवडत नाही कीं तुझ्या मुलांने त्याच्या सारथ्यावर बाण मारले. तो संतापलेला पांडव मोठे जास्त मजबूत धनुष्य घेतो व एक वर्मी घाव बाणाने घालतो तुझ्या मुलावर. दुर्योधनसुद्धा दोन मोठे बाण भिमाच्या छातीत मारतो. त्या वर्मी लागलेल्या आघातामुळें भिमाला भोवळ येते व तो रथाच्या टपावर निवांत पडतो. भिम अशारितीने बेहोष झालेला पाहून अभिमन्यू त्याच्या दिशेने जातो. तो तुझ्या मुलावर जोराचे मोठे बाण मारतो. थोड्याच वेळात वृकोदर शुद्धीवर येतो. पुन्हा लढण्यास तयार होतो व तो दुर्योधनाला पंचवीस बाणांने जेरीस आणतो. त्यानंतर तो पांडव सल्यावर तितकेच बाण मारतो. त्या मारामुळें सल्य युद्धातून निघून जातो. त्यानंतर तुझे चौदा पुत्र ज्यांची नांव अशी आहेत, सेनापती, सुशेना, जलासंध, सुलोचन, उग्र, भिमरथ, भिम, वीरबाहू, औलूव, दुर्मुख, दुश्प्रदर्शन, विवित्सू, विकट, सना असें भिमावर चाल करून जातात. त्यांच्या हल्ल्याने भिमाला बऱ्याच जखमा होतात. तरीसुद्धा भिम तुझ्या मुलांवर तुटून पडतो व सेनापतीचे मुंडके तलवारीने कापून टाकतो. जलासंधाला सुद्धा घायाळ करतो. ते करत असतांना भिम जोराजोराने हसत असतो. त्यानंतर भिम सुशेनाला ठार मारतो. त्यानंतर तुधा मुलगा उग्र जो फेटा घालतो त्याला यमाकडे पाठवतो. विवत्सूला बाणांने ठार मारतो. त्यानंतर वीरवाहूला मारतो. हसत हसत भिम तुझ्या भिम व भिरथाला ठार मारतो. त्यानंतर भिम मोठी लढाई करतो व सुलोचनाला ठार मारतो. भिमाची ती हिम्मत पाहून तुझी उरलेल मुलं त्या तेथून पळून जातात.

भिष्म त्याच्या सैन्यातील शूरयोद्ध्याना आवाहन करतो कीं, ह्या भिमाला कांहींही करून आपण आवरले पाहिजे नाहीतर तो सगळे कौरव मारून टाकील. ते ऐकून भागीदत्त त्याच्या मदांध

हत्तीला घेऊन भिमावर चाल करतो. तो त्याच्या बाणांनी भिमाला अशाप्रकारे घेरले होते कीं, तो कोणाला दिसत नव्हता. ते पांडवांच्या सैन्याला आवडले नाही व ते भागादत्तावर बाणांचा वर्षाव करू लागतात. त्यांच्या बाणांनी तो मधांद हत्ती आणखीन चवताळतो. भागादत्त रक्ताने माखलेला होता. बाणांने जखमा झालेला भागादत्ताचा हत्ती पिसाळल्यासारखा चौफेर उधळत धावू लागला. त्याच्या पायाखाली कित्येक मेले त्याची गणती नाही. त्याला आवरणे अशक्य होते. भागादत्त भिमावर दोन बाण मारतो. त्यामुळें भिमाला भोवळ येते व तो रथात कोसळतो. भिम अशाप्रकारे कोसळल्याने उत्तेजित झालेला भागादत्त युद्ध जिंकले अशी जोरांने गर्जना करतो. भिमाला बेहोष झालेला पाहिल्याने त्याचा राक्षस पुत्र घटोत्कच चिडतो व एकदम अदृष्य होतो. तो त्याच्या मायावी सिद्धीने तेथे असलेल्यांच्या मनात भिती उत्पन्न करतो. त्याशिवाय एक भयंकर रुप धारण करतो. तो ऐरावतावर बसला आहे असें दृष्य तो त्याच्या सिद्धीने तेथे दाखवतो. त्याच्या मागून इतर मोठे स्वर्गीय हत्ती अंजन, वामन, महापद्म त्याच्या मागून जात आहेत असे दृष्य त्याने तेथे उभे केले. त्यांच्यावर राक्षस बसले आहेत असे दिसत होते. त्यानंतर तो त्याच्या मायावी हत्तीने लढण्याचे आवाहन करतो, ते चार सुळे असलेले भयंकर दिसणारे हत्ती भागादत्ताच्या हत्तीशी झुंजू लागतात. आधीच जबर जखमी झालेला तो भागीदत्ताचा हत्ती जोरांने ओरडू लागतो.

भिष्म ते पाहून तुझ्या सेनानींना सांगतो, भागादत्त भिमाच्या मुलाच्या राक्षसी काव्यात अडकला आहे. त्या युद्धात तो निश्चितपणे मारला जाईल असे दिसते. ते पाहून पांडव खूष झालेले दिसत होते. म्हणून भिष्म त्यांना बोलतो कीं, आपण सगळे त्याला वाचवण्यासाठी गेले पाहिजे. भिष्म सगळया त्याच्या योद्ध्याना तसे आवाहन करत असतो परंतु, ते राक्षस फारच भयंकर आणि अवाढव्य आकाराचे होते. ते आवाहन ऐकल्यावर द्रोणाचार्य पुढाकार घेतात. युद्ध जास्त भयंकर झालेले असते. त्यानंतर सगळे कौरवांचे राजे भागादत्तला वाचवण्यासाठी तेथे निघतात. भिमाला मदत करण्यासाठी व द्रोणांला अडवण्यासाठी पांडवांच्या कित्येक पलटणी त्या दिशेने सरकू लागतात. ते पाहून भिष्म द्रोणाला बोलतात, "मला आज त्या हिडीबाच्या मुलाशी लढावे असे वाटत नाही. कारण तो स्वतः शक्तीमान असून त्याला पांडवांचा आधारसुद्धा भक्कम आहे. इंद्रसुद्धा त्याला अशा परिस्थितीत हरवू शकणार नाही. तो एक राक्षस असून मोठा संहारक आहे. आज आपल्यातील बरेच पांचालांच्या व पांडवांच्या कारवायांमुळें मारले गेले आहेत. आज पांडवांशी नवीन लढाई करण्यात अर्थ दिसत नाही. सूर्यसुद्धा मावळताकडे झुकत आहे तेव्हां आज आपण आपली सेना मागे घ्यावी हे चांगले. उद्या ह्या शत्रूबरोबर योग्य व्युह रचून आपण जास्त चांगल्याप्रकारे लढू शकू. घटोत्कचाला घाबरलेले कौरवांचे सैन्य दिवस संपत आला आहे हे निमित्त करून युद्धातू काढता पाय घेतात. पांडव जिंकल्याच्या जल्लोषात आनंद जोर जोराने ओरडून व्यक्त करत असतात. रणभेदी वाद्ये वाजवू लागतात. अशारितीने त्या तिसऱ्या दिवशीचे युद्ध थांबते. हरल्याच्या नामुष्कीने मान खाली घालून कौरवांचे योद्धे त्यांच्या तळाकडे निघतात.

जिकल्याचा आनंद असला तरी जबर जखमा झालेले पांडव त्यांच्या तळाकडे जाऊ लागतात. तो दिवस भिम व त्याचा मुलगा घटोत्कच ह्यांचा होता. दुर्योधन अतिदुःखी अंतःकरणाने कारण, त्याचे बंधू मोठ्या संख्येने त्या दिवशी मारले गेले होते. तो रडू आवरू शकत नव्हता. आपण काय योजले व काय होत आहे, ह्याच्या विचारात तो त्याच्या तंबूकडे जात होता. नियमानुसार सगळी व्यवस्था केल्यावर दुर्योधन त्याच्या प्रिय बंधूंच्या आठवणीत एकांतात शांतपणे बसतो. तिसरा दिवस असा संपला.

युद्धाचा तिसरा दिवस भाग साठावा संपला.

# वासुदेवाची स्तुती

## भाग एकसष्ठावा

धृतराष्ट्र संजयाला विचारतो, पांडवांचे ते असाधारण सामर्थ्य ऐकून मी फार घाबरलो आहे. माझ्या मुलांची हत्या ज्या प्रकारे भिम करत होता तेसुद्धा मला अस्वस्थ करत आहे. मला विदूराचे शब्द आठवतात. माझे हृदय त्यामुळे जळत आहे. जे घडत आहे ती नियती आहे असे समजून त्यात समाधान मानावयाचे. पांडवांचे योद्धे भिष्माच्या सैन्याचा फडशा पाडत आहेत. कोणता वर त्यांना मिळाला आहे, कोणती अस्त्र ते वापरत आहेत, ज्यांच्यामुळें ते देवांसारखे अजिंक्य झाले आहेत. मला हे सहन होत नाही अरे संजया कीं माझे सैन्य पुन्हा पुन्हा पांडवांकडून हार खात आहे, त्यांचा संहार होत आहे. मलाच कां ही देवी शिक्षा होत आहे ते तू सांग. मला सगळे सांग ते काय कारम आहे ज्यामुळें ते पंडुचे मुलगे जिंकत आहेत व माझे पराजीत होत आहेत. मला कांहींच समजेनासे झाले आहे. मला असे वाटते कीं मी एक विशाल सागर माझ्या दोन हाताने पोहत पार करण्याचा प्रयास करत आहे. माझ्या मुलांवर एक मोठे संकट आलेले आहे. मला ठाऊक आहे कीं, तो भिम माझी सगळी मुलां ठार मारणार आहे. मला असा कोणीही जेता दिसत नाही जो माझ्या मुलांना ह्या संकटापासून वाचवू शकेल. अरे संजया मला समजून चुकले आहे कीं, माझी सगळी मुलं ह्या युद्धात ठार होणार आहेत. मला तुझ्याकडून समजून घ्यावयाचे आहे कीं, हे असे माझ्याबाबतच कां होत आहे. तू खूप सूज्ञ आहेस, म्हणून तूच मला ते सांगू शकशिल. मला सांग जेव्हा दुर्योधन पहातो कीं त्याचे सैन्य माघार घेत आहे तेव्हां त्याने काय केले"? भिष्म,द्रोण, कृप, शकूनी, जयद्रथ, अश्वत्थामा, विकर्ण असे सगळे योद्धे काय करत होते.

संजय सांगतो, लक्ष देऊन नीट ऐका राजे, मी जे सांगतो ते ऐकल्यावर ते तुमच्या काळजात गेले तरच कांही अर्थबोध तुम्हाला होणार आहे. पांडवांनी कोणताही चमत्कार केलेला नाही. ते सामर्त्यवान आहेत हे निश्चित, ते खऱ्या क्षत्रियांसारखे प्रामाणिक युद्ध करत आहेत. त्यांची प्रत्येक कृती नैतिकतेच्या नियमात बसणारी आहे. जेथे सच्चाई आहे तेथे विजय जातो त्या नियमानुसार हे सगळे घडत आहे. त्यांच्या सच्चाईमुळें जे पुण्य त्यांनी प्राप्त केले आहे ते त्यांना सदैव जय देत आहे. तुमची मुलं सत्तेच्या मस्तीत किती पाप करत होते ते तुम्हा जाणता अहात. त्यांचे क्रौर्य, बेईमानीपणा, कपटकारस्थानं, द्वेष बुद्धी, ह्या दुर्गुणामुळें ते आज हरत आहेत. विनाकारण तुमची मुलं पांडवांचा उपमर्द करत होती, त्यांचा मत्सर करत होती, त्यांना ठार मारण्यासाठी कित्येक योजना आखत होती, त्या सगळ्या काळ्या कामाचे फल आपण आज पहात अहात. जेव्हां तुम्हाला सगळे आपले हितचिंतक सांगत होते तेव्हां आपण दैव असे सांगून त्यांचा सल्ला नाकारत होते त्याचे हे फळ आहे. तुम्हाला वाटचत होते कोठे तरी तुमच्या मनात कीं, तुमची मुलं पांडवांना हरवतील कारण भिष्म, द्रोश, कृप असे महारथी त्यांच्या सेवेत आहेत, पण ते खोटे ठरत आहे हे

आपण पहात अहात. हितचिंतकांचा अव्हेर करून तुम्ही स्वार्थी दोस्तांच्या सल्ल्याला जास्त महत्व देत होता त्याचा परिणाम काय झाला ते पहात अहात. युद्ध उलटत आहे ते पाहून दुर्योधन भिष्माना काय विचारतो ते तुम्हाला सांगतो ते नीट ऐका. दुर्योधन त्यांना विचारतो, "द्रोण, आपण स्वतः, सल्य, कृप, हृदिकाचा मुलगा कृतवर्मन, कंबोजचा राजा सुदक्षिणा, भुरिश्रव, विकर्ण, भागादत्त, हे सगळे महारथी आपल्याकडे आहेत, ते उच्चकुलिन आहेत, युद्धात प्राणपणाने लढणारे आहेत, ते माझ्या मते सगळया जगाला पुरून उरणारे आहेत, सगळे पांडव एकत्र आले तरी ते तुम्हाला हरवू शकणार नाहीत, तरी माझ्या मनात एक शंका येते कीं, त्याचे कारण सांगा, असें असूनही हे पांडव आम्हाला म्हणजे तुम्हाला कसे पुन्हा पुन्हा हरवू शकतात"?

तो प्रश्न ऐकल्यावर भिष्म त्याला सांगतात कीं, "अरे राजा, दुर्योधना, मी काय सांगतो ते नीट ऐक, मी तुला नेहमी जे करावयाला सांगतो ते तू कधीच त्या प्रमाणे करत नाहीस. मी तुला सांगत होतो कीं, पांडवांशी समझौता कर. पण तू ते करावयाला तयार नव्हतास. माझा सल्ला तुम्हा दोघांच्या भल्याचा होता व त्यात इतर बऱ्याच लोकांचे सुद्धा भले होणार होते पण तू ऐकतच नव्हतास. तुम्ही सलोख्याने एकत्र राहिला असता तर तुम्ही सगळया जगावर राज्य केले असते. त्यात तुमचे, तुमच्या प्रजेचे, तुमच्या सगळया मित्रांचे व आप्तांचे चांगले होणार होते पण तुझा अहंकार नडला. तुला असे सांगण्यात माझा सगळा वेळ वाया गेला, इतर सुद्धा तेंच सांगत होते. तुझ्या मनात त्यांच्या बद्दल कां द्वेष आहे तेंच समजत नाही. त्या नादात तू व तुझे बंधू त्यांच्या वाईटासाठी कारवाया करत होता, ते मात्र तुमचा द्वेष न करता चांगल्या मार्गाने सहनशिलतेने आपले काम करत होते. त्यामुळे आज ते अजिंक्य ठरत आहेत. पंडुच्या मुलांना कृष्णाचे संरक्षण आहे, ज्यांत तो आहे त्यांना जगातील कोणीही पराजीत करू शकणार नाही ते त्रिवार सत्य आहे. भले तू ते मान अगर नको मानूस. अरे दुर्योधना, आता मी सांगतो एक प्राचीन कथा, एकदा सगळे दिव्य ऋषी ब्रह्मा बरोबर गंधमादन पर्वतावर कोणाची तरी प्रतिक्षा करत होते. ब्रह्मदेव त्यांच्या आसनावर बसलेले होते तेव्हां, त्याना एक दिव्य तेजस्वी रथ आकाशातून येतांना दिसला. तो कोणाचा रथ आहे ते त्यांच्या ध्यानसिद्धीने अजमावल्यावर ते त्यांचे दोन हात जोडून मोठ्या आनंदाने त्या दिव्य विभूतीला प्रणाम करतात. त्यानंतर ते ऋषी आणि इतर स्वर्गीय लोक आदरपूर्वक उठून उभे रहातात. सगळे त्या रथातील विभूतीचे एकटक दर्शन घेण्यासाठी उत्सुक असतात. त्यांच्यातील सर्वोच्च असलेले ब्रह्मदेव, जे ह्या विश्वाचे निर्माते आहेत, ज्यांचे अध्यात्मिक सामर्थ्य अजोड आहे, ते त्या रथातील विभूतीकडे पहात त्यांची स्तुती बोलतात, "आपण ह्या विश्वाची विभूती अहात, आपण ब्या विश्वाचे धनी अहात, आपल्या सामर्थ्याने हे विश्व भारलेले आहे, आपल्या मर्जीने हे विश्व चालत आहे, आपण वासुदेव अहात, म्हणून मी आपल्या आश्रयाला राहू इच्छितो. आपण योग आणि दैविकता अहात, आपला विजय हो कारण त्यातच ह्या सृष्टीचे हित असते. युगपुरूषा तुझा नित्य विजय हो. तुमच्या नाभितून आलेल्या कमळातून मी उत्पन्न

झालो आपले नेत्र विशाल आहेत, भविष्यातील सगळे विजय आपल्या संस्कारातून उत्पन्न होणार आहेत. आपण सगळया सूर्यांचे सूर्य अहात, आपण सगळया उत्तम गुणांचे भांडार अहात, सगळया चांगल्या गोष्टींना आधार देणाऱ्या आपला सदैव विजय हो. आपण नारायण अहात. आपल्याला सर्वार्थाने समजणे केवळ अशक्य असते. आपण सांरंग (कृष्णाचे धनुष्य) धारी अहात. आपले सदैव विजय होत रहाणार, आपण ह्या विश्वाचे रुप धारण करून अहात. आपण स्वर्ग आणि नरक दोनही अहात, जगातील चांगल्यांच्या भल्यासाठी आपले कर्तृत्व उपयोगी येते. आपण सर्व शक्तीमान अहात. आपणच शेष अहात, आपणच वराह आणि कासव आणि सर्वप्रथम अहात. कुरळे केस असलेले आपण सदैव विजयी असणार. आपणच दिशा, आकाश, तेज अहात, आपण अनंत अहात, आपण नश्वर अहात, आपण व्यक्त आणि अव्यक्त असे दोनही अहात. आपणच इंद्रियदमन अहात, आपण अगाध अहात, आपणच यश आणि अपयश अहात, आपणच आपल्याला ओळखू शकता, आपणच कला, विज्ञान अहात. आपल्या कृपेनेच सगळे कांहीं होत असते. आपल्याला ब्रह्म म्हणतात. आपण सगळया चराचरांचे उगमस्थान अहात. आपण बुद्धी अहात, आपणच योग अहात, आपणच सगळया गोष्टींचे कारण अहात, आपणच नैतिकता (चांगुलपणा) अहात, आपणच गुह्य ज्ञान अहात, आपण सर्वज्ञ अहात, आपणच आपल्या निर्मितीचे कारण अहात, आपण सर्व उत्पन्न करता व नष्ट सुद्धा करता, आपण विचार अहात व आपणच रचना अहात, आपण अमृताचे उगमस्थान अहात, आपण युगांचे उगमस्थान आणि लयस्थान सुद्धा अहात. आपण भाग्य विधाता अहात, आपण स्वयंभू अहात, आपण अस्तित्व अहात. आपण अतिप्राचीन अहात व आधुनिकसुद्धा अहात. पृथ्वीमाता तुमचे दोन पाय आहेत, दिशा तुमचे हात आहेत, स्वर्ग तुमचा माथा आहे, देवता तुमचे इतर अवयव आहेत, सूर्य व चंद्र तुमचे नेत्र आहेत. वैराग्य वृत्ती, सत्याची चाड, नैतिकता आणि व्रतस्थता ही तुमचे बलस्थानं आहेत. अग्नी तुझी उर्जा आहे, वायू तुझा श्वास आहे, वरुण (पाणी) तुझा घाम आहे, अश्विनद्वय तुझे कान आहेत, सरस्वती तुझी जीभ (जबान) आहे, वेद तुझे ज्ञान आहेत अशा तुझ्यावर हे विश्र्व विसंबून असते. अहो नारायणा, तुझ्या आवाक्याची कांहींच कल्पना आम्हाला येत नाही. तुझे सामर्थ्य, तुझे बळ, तुझी हिम्मत कोणालाही समजत नाहीत. अशा विष्णू, आम्ही तुझी भक्ती करत असतो. आम्ही तुझ्या कृपेची अभिलाषा धरून तुला स्मरत असतो. अहो देवाधीदेव, सगळे ऋषी, गंधर्व, यक्ष, आणि राक्षस, पनंग, पिशाच्च, माणसें, पशु, पक्षी, मासें व सगळे चराचर सजीव ज्यांना मी तुझ्या सिद्धीने निर्माण केले, ते सगळे तुझ्या कृपेचे अभिलाषी करतात. तुझ्या कृपेमुळें पृथ्वी पापरहीत होते. असा तू, यदू कुळात ह्यावेळी अवतार घेणार आहेस, जगात चांगुलपणा, माणूसकी व भूतदया वाढवण्यासाठी तू येत आहेस. दितीच्या पापकर्मी मुलांचे निर्दाळण करण्यासाठी तू येत आहेस. ती तुझा लिला आणि मायासुद्धा आहे. तुझ्या कृपेने मी तुझी स्तुती करत आहे. तू तुझ्या मर्जीने शंकरसनाचा (बळराम) जन्माला घातलेस. जो तुझीचअंश आहे. अरे कृष्णा तू तुझ्यातून प्रद्युम्नाला जन्माला घातलेस, त्यातून अनिरुद्ध जन्मला, जो विष्णू म्हणून सगळीकडे जाणला जातो. त्यातून ब्रह्म उत्पन्न झाले आहे. त्या

सगळयांमध्ये तूंच अंशांने उपस्थित असतोस. तू अशारितीने अंशात्म रुपाने माणसांत जन्म घेत असतोस. असुरांचा नाश करण्यासाठी व जगात आनंद वाढवण्यासाठी तू ते सगळे करत असतोस. ते करून तू तुझी ख्याती वाढवत असतोस. अशाप्रकारे तू योग पुन्हा प्रस्थापित करत असतोस माणसांच्या समाजात. तुझ्यावर भक्ती करणाऱ्यांना तू आशिर्वाद देतोस व त्यांचे जीवन संपन्न करतोस. सगळे ब्राह्मण द्विज तुझी याचना करत असतात ते ह्यांच साठी. तुला आरंभ, मध्य आणि अंत नसतो म्हणून तू अंतिम योग आहेस.

वासुदेवाची स्तुती भाग एकसष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग बासष्ठावा

भिष्म पुढे दुर्योधनाला सांगतात, "ती स्तुती ऐकल्यानंतर ती विभूती, जो जगाचा देव आहे, ब्रह्माला मृदू व गोड आवाजात बोलतो, अरे ब्रह्मा, योगाने मी तुझे इप्सित समजलो आहे. तू जसे व्हावे असें समजतोस तसेंच होईल. ते बोलून तो अदृष्य झाला. त्यानंतर देव, गंधर्व, ऋषी, नवल करत ब्रह्माला विचारतात, "अहो ब्रह्मदेव हे कोण होते? त्याची आपण पुजा केली, त्याची स्तुती केली ते कोण होते"? आम्हाला सांगा. ब्रह्मदेव त्यांना सांगतात, अहो ब्राह्मणानो, गंधर्वानो, देवांनो ते "तत्" होते. ते सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे. ते अनादीअनंत असे तत्त्व आहे. ते सर्वोच्च आहे. ते सगळयांच्या मध्ये असते. मी त्या "तत्" शी बोलत होतो. ते देवादिदेव असें आहे. मी जगाच्या परमेश्र्वराशी संवाद साधत होतो. विश्र्वाच्या भल्यासाठी मी त्यांच्याशी बोलत होतो. ते तत्त्व असुरांच्या नाशासाठी माणसात जन्म घेणार आहेत असें ते सांगत होते. ते दैत्य व राक्षस जे फार भयंकर आहेत त्यांचा संहार ह्या युद्धात होत आहे. ते दैत्य व दानव सुद्धा मानव रुपात अवतरले होते त्यामुळे त्यांचा नाश करण्यासाठी कृष्णावतार झाला आहे. त्याला मदत करण्यासाठी त्याचा साथीदार नर सुद्धा मानव अवतारात आलेला आहे व तोंच आहे अर्जुन. ते दोघे फार प्राचीन ऋषी नर व नारायण असें आहेत. त्यांना कोणीही पराभूत करू शकणार नाही. ते दोघे जेव्हां पृथ्वीवर मानव रुपात जन्म घेतात, ते कोणालाही ओळखता येत नाहीत. मी ब्रह्म ज्याच्यातून उत्पन्न झालो तोंच वासुदेव आहे. तोंच तो जो पांचजन्य शंखु वाजवतो, सुदर्शन चक्र धारण करतो, एका हातात गदा धारण करतो, तोंच तो सर्वश्रेष्ठ परमेश्र्वर आहे. सर्व देवतांत तो उच्च आहे. तोंच अंतिम गुह्यज्ञान आहे. तोंच गुणीजनांचा आधार आहे, तोंच अंतिम ब्रह्म आहे. तो नश्र्वर, अव्यक्त, अनंत आहे ज्याला कांहीं ज्ञानी "पुरूष", असें म्हणतात. तो अतुलनीय आहे. प्राचीन ऋषी त्याचीच स्तुती करत असतात. असा हा वासुदेव सामान्य माणूस समजून त्याच्याशी वागणारे मूर्ख असतात. असुर तशी चूक करतात व ते मारले जातात. जो वासुदेवाला समजत नाही तो सदैव अंधारात चाचपडत असतो. तो महान योगी जगाच्या कल्याणासाठी मानव अवतार धारण करतो वेळोवेळी जेव्हां पापाचा घडा भरतो. तो त्याच्या खऱ्या भक्तांचे सगळे कल्याण करत असतो. सगळया शहाण्या लोकांनी वासुदेवाचे चिंतन करावयाचे असते कारण तोंच मार्ग दाखवतो ज्यामुळें माणसाचे अंतिम ध्येय, मोक्ष, साध्य होते".

भिष्म पुढे दुर्योधनाला सांगत असतात, "ब्रह्माने असें त्या जमलेल्या ऋषीवर्यांना व देवतांना सांगितले. त्यानंतर ते दैवी लोक निघून गेले आपापल्या ठिकाणी. ब्रह्मदेवांने जे सांगितले ते तेथे जमलेल्या गंधर्व, अप्सरा, मुनी, साध्य ऐकतात व वासुदेवांची स्तुती करत आपल्या स्वर्गात जातात. ते सांगितले जात असतांना मी सुद्धा तेथे उपस्थित होतो व ते ब्रह्माचे विधान ऐकले. मी

भार्गवाकडून सुद्धा हेंच ऐकले आहे. मार्कंडेय ऋषी जे ह्या विश्वाचे साक्षीदार आहेत, व्यास, नारद असें सगळे तेंच सांगत आहेत. म्हणून अशा वासुदेवाची सगळयांनी पुजा केली पाहिजे. त्याला आव्हान देणारा, त्याची प्रतारणा करणारा हे असुर समजले जातात. ज्यांचा ह्या युद्धात विधीनियमानुसार नाश होणे ठरलेले आहे. तुला आठवत असेल कित्येत ऋषी तुला वारंवार सांगत होते कीं, तू कृष्णाच्या विरूद्ध लढण्याचा विचारसुद्धा करू नये पण तू ऐकत नव्हतास. तुझ्यातील मूर्खपणामुळें तू तो सल्ला मानत नव्हतास म्हणून मी तुला एक नीच राक्षस समजत आहे. तू तुझ्या अहंकारामुळे गोविंदाचा उपमर्द करत असतोस. धनंजय हांच नर ऋषी आहे ते तुझ्या भ्रष्ट बुद्धिला समजत नाही. कोणता शहाणा सूज्ञ इसम त्या दोघांचा विनाकारण अपमान करील"?

"कृष्ण पूर्णावतार आहे दुर्योधना, म्हणून ते विशेष महत्वाचे आहे. तोंच यश आहे, तोंच जय आहे व तोंच विजय देणारा आहे. तो सगळ्या सृष्टीचा चालक आहे. त्याच्यात सगळे उत्तम गुण आहेत त्याच वेळी अज्ञानरुपी अंधारसुद्धा तोंच आहे. तोंच सर्व इच्छांचे मूळ आहे, तोंच चांगुलपणा आहे, तोंच माणूसकी आणि भूतदया सुद्धा आहे. त्याचा बिनशर्त आधार पांडवांना आहे, तो त्यांचे संरक्षण करत असतो, तो अनंत देव आहे, तोंच पुण्यप्रभाव आहे, अशा बद्दल तू मला विचारत आहेस, मी तुला काय सांगणार"? "अरे कौरवा, विजय फक्त त्यांचाच होणार हे आधीच ठरलेले आहे, त्यात मी काय करू शकतो"? तू मला विचारलेस म्हणून मी जे सत्य आहे ते सांगितले आहे. त्याचीच पुजा आपापल्या कुवतीनुसार चारही वर्णाचे लोक करत असतात व त्याप्रमाणे त्यांना फल प्राप्ती होत असते. द्वापार युगाच्या अंत काळी व कलीयुगाच्या प्रारंभी त्याची भक्ती करतील ते त्या युगाच्या तापदायक परिस्थितीवर मात करू शकतील.

युद्धाचा चौथा दिवस भाग बासष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस : भाग त्रेसष्ठावा

दुर्योधन भिष्माला बोलतो, सगळे जग वासुदेवाला परमेश्वर समजतात. मला सांगा, त्याचे मूळ कोणते?

भिष्म सांगतात, "वासुदेव हा अंतीम अस्तित्व आहे, त्याच्या पेक्षा वर कोणीही नाही, कोणालाही त्याचे मूळ माहीत नाही. मार्कंडेय गोविंदाबद्दल बोलतात, तो अतिसंदर व सर्वगुणसंपन्न आहे. त्याचे वर्णन करता येत नाही. त्यांने त्याच्या विचारांतून पाणी, हवा आणि पृथ्वी उत्पन्न केली आहे. त्याने निर्माण केलेल्या पाण्यावर तो पहुडला व विचारांने फक्त बाकीचे उत्पन्न करत गेला. मार्कंडेय ऋषी त्या किमयेचे एकमेव साक्षीदार आहेत, म्हणून ते जे सांगतात ते स्वीकारले पाहिजे. वासुदेवाने त्याच्या मुखातून अग्नी उत्पन्न केला, श्वासातून हवा तयार केली, त्याने त्याच्या मुखातून वेद गायीले व वाणी निर्माण केली. त्याने प्रथम जग निर्माण केले त्यानंतर ऋषी व देव त्यानंतर मृत्यू देव यम तयार केला. यमातून जन्म व वाढ आणि शेवट तयार केले. तोंच वर देतो व शापसुद्धा देतो. वर्तमान, भविष्य व भूत त्याने तयार केले. त्याने शंकरशनाला घडवले जो पहिला मनुष्य होता. त्यांना दैवी नाग अनंत तयार केला. जो पृथ्वीला धरून ठेवत आहे. त्याने ध्यान साधना प्रथम शिकवली. त्यातून अध्यात्म विद्या सुरू झाली. त्याच्या कानातील मळातून एक असुर तयार झाला ज्याचे नांव होते मधू, तो दोषातून उत्पन्न झाला होता. फार भयंकर होता. मधू वासुदेवालाच खतम करण्याचा प्रयत्न करू लागला तेव्हां त्याला वासुदेवाने नष्ट केले म्हणून त्याचे नांव माधव झाले. सगळे देव, मानव, दानव आणि ऋषी त्याला जनार्दन म्हणून लागले. तोंच पृथ्वीला वाचवण्यासाठी महान वराह झाला त्यानंतर असुरांचा पराभव करण्यासाठी सिंह झाला आणि वामन झाला दैत्यांचे नियंत्रण करण्यासाठी हे होत होते. तो सगळया चराचरांचे उगम स्थान आहे. असें सांगतात कीं, त्याने त्याच्या मुखातून ब्राह्मण, हातातून क्षत्रिय, मांडीतून वैश्य आणि पायांतून शुद्र तयार केले. जे लोक संयमाने जगतात, वासनांच्या आहारी जात नाहीत, ध्यान साधना सदैव करतात, ते केशवाला प्रसन्न करू शकतात. ऋषी त्याला हृषिकेश म्हणतात त्याचा अर्थ इंद्रीयांवर संयम असलेला. त्याला जगद्गुरू, पितामाता अशा विविध उपाधीने गौरवतात त्याचे भक्त. प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्यांना तो देव प्रसन्न होतो व त्या भक्ताची चांगली इच्छा पूर्ण करतो. ज्याच्यावर तो प्रसन्न होतो ते सुखाने त्यांचे जीवन घालवतात. कृष्ण त्याच्या भक्तांना कधीच धोका देत नाही. युधिष्ठीर व ते त्याचे बंधू केशवाची सतत पुजा करत असतात, त्यामुळे त्यांचा पराजय तू, एक असुर कसा करू शकेल"?

युद्धाचा चौथा दिवस भाग त्रेसष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग चौसष्ठावा

भिष्म पुढे सांगतात, साक्षात ब्रह्माने जे कवन गाईले ते मी तुला ऐकवत आहे ते ऐक. ते फार प्राचीन काळी दैवी ब्राह्मण, नारदाने माणसाला सांगितले. ते सगळे साध्य, ऋषी, मुनी स्मरतात. मार्कंडेय सांगतात कीं, तो भूत, वर्तमान आणि भविष्य असे सगळे आहे. तो यज्ञ आणि यज्ञाचा यज्ञ सुद्धा आहे. तो संयम आहे, वैराग्य आहे, ऋषी भृगु सांगतात की, तो देवांचा देव आहे. त्यालाच विष्णू म्हणतात. द्वैपायन सांगतात की, तो वासुदेव वसुंचा आहे. शक्राची व्यवस्था करणारा आहे. अतिप्राचीन काळी ऋषी त्याला दक्ष म्हणून ओळखत होते. अंगीरस ज्यांनी अथर्ववेद दिला ते सांगतात कीं, तो जगाचा निर्माता आहे. देवल सांगतात, कीं, त्याच्या मनात सगळे विश्व आहे व ते तेथेच कार्यरत असते. वामनावतारात तो बळीराजाचे सगळे राज्य ताब्यात घेतो व त्याच्या उत्तम गुणाची तारिफ करण्यासाठी पाताळात त्याचा द्वारपाल बनून रहातोस. त्याचे डोके स्वर्ग आहे, हातपाय पृथ्वी आहे, त्याच्या पोटात तिन्ही जगं आहेत. तोंच सत् आणि असत् असतो.

राजर्षी सांगतात, जे मनाचे नियंत्रण करून आपल्या कर्तव्यात कमी करत नाहीत, त्यांना मधू आधार देतो. कारण, असे लोक त्याला हे विश्व चालवण्यासाठी उपयोगी असतात. सनत्कुमार व इतर ऋषी केशवाबद्दल सांगतात, केशवाकडे सतत ध्यान असणारा धन्य होतो. अरे दुर्योधना, मी तुला केशवाबद्दल जे मला माहित आहे ते सगळे सांगितले.

संजय पुढे सांगतो, केशवाची ती पवित्र गोष्ट ऐकल्यावर तुमचा मुलगा, कृष्णाबद्दल आणि पांडवांबद्दल चांगल्या भावना दाखवू लागला. भिष्म पुन्हा तुमच्या मुलाला बोलतात, तुला मी नर व नारायणांची खरी माहीती सांगितली आहे. त्यामुळें तू कां त्यांना पराजीत करू शकणार नाहीस तसेंच त्यांना तुझी सेना ठार मारू शकणार सुद्धा नाही ते समजले असेल. कृष्णाच्या मनात पांडवांबद्दल अपार प्रेम आहे. म्हणून त्यांच्या बरोबर समझौता करणेच श्रेयस्कर होते. तुझ्या विकृत वासनांना काबूत ठेवून तू ते करू शकलास तर अजून वेळ गेलेली नाही. पृथ्वीचे राज्य तुम्ही दोघे मिळून उपभोगू शकाल. परंतु, तू जर तुझा हट्ट चालूच ठेवलास तर तू व तुझे सगळे बरबाद बोणार हे ठरलेले आहे.

ते ऐकून दुर्योधन गप्प राहिला होता. त्यानंतर तो त्याच्या तंबूत गेला. तेथे तो ब्रह्माची प्रार्थना करू लागला. त्यानंतर तो आपल्या शय्येवर निजला.

युद्धाचा चौथा दिवस भाग चौसष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

# भाग पासष्ठावा

संजय पुढे सांगतो, रात्र संपल्यावर सूर्य उगवण्याच्या सुमारास दोनही सैन्ये पुन्हा लढण्याच्या तयारीने एकमेकांकडे सरकू लागले. तुमच्या वाईट प्रवृत्तीनुसार ते निरर्थक युद्ध सुरू झाले. भिष्माने मकर नांवाचे व्युह रचले होते. पांडवानीसुद्धा त्यांचा व्युह रचला होता. भिष्म पांडवांच्या सैन्यावर त्याची फौज घेऊन जोरात हल्ला करतो. पांडव सैन्य नावांचा व्युह रचतात. त्या व्युहात भिमसेन पुढाकार घेतो. दुसरा असतो शिखंडी व धृष्टद्युम्न. त्या व्युहाचा मुख्य असतो सत्यकी. त्याच्या मानेच्या जागी अर्जुन असतो. त्याच्या डाव्या बाजूला द्रुपदाचे मुलगे असतात. त्यांना त्यांचे अक्षौहिणी सैन्य साथ देत असते. त्यांच्या मागे अभिमन्यू असतो. त्याच्या शेवटी युधिष्ठीर त्याची फौज घेऊन असतो. त्यालानत्याचे बंधू मदत करत असतात. भिम मकरात घुसतो मोठ्या जोरांने. भिष्माला जाऊन भिडतो. त्याच्या वर बाणांचा मारा करू लागतो. भिष्मसुद्धात्याचे बाण मारत असतो. त्या लढाईत पांडवांचे सैन्य गुंतलेले असतांना धनंजय भिष्मावर चाल करून जातो. त्याला भिष्म प्रत्युत्तर देतो. अर्जुन ते वार परतवतो. दुर्योधन त्याच्या सैन्याचा होत असलेला विध्वंस पहात असतो व त्याला आदल्या दिवशी त्याच्या भावांचा जो नाश झाला ते आठवते, त्यामुळे चिंतेत तो द्रोणांना भेटतो, त्यांना तो बोलतो, आपण माझे हितचिंतक अहात, तुमच्या व भिष्माच्या बळावर मी पांडवांचे सैन्य मारू शकू असे समजत होतो. परंतु. तसे होत नाही असें मला दिसत आहे. ते ऐकल्यावर द्रोण पांडवांच्या फौजांत सत्यकीच्या समक्ष घुसतो. सत्यकी त्यांना अडवतो व मग त्या दोघांत एक भीषण युद्ध सुरू होते. द्रोण सत्यकीला दहा बाण मारतो. त्याचा खांदा दुखवला जातो. त्याला संरक्षण देण्यासाठी भिम पुढे सरसावतो. भिमसेन द्रोणांना बरेच बाण मारतो. त्या नंतर भिष्म, सल्य व द्रोण असें तिघे भिमावर चाल करतात. त्यावेळी अभिमन्यू तेथे येतो. त्याला साथ देत द्रैपदीची मुलं असतात ते त्या वीरांवर बाणांचा जोराचा मारा करतात. त्या धमालीत शिखंडी तेथे घुसतो व भिष्मावर चाल करतो. शिखंडी त्याच्या बाणांच्या भडीमाराने भिष्म व द्रोण ह्याना अडकवतो. भिष्म मात्र त्याच्यावर एकही बाण मारत नाही. ते पाहून दुर्योधन द्रोणांना शिखंडीला अडकवण्याचा प्रयत्न करण्यांस सांगतो. द्रोण त्यांच्यामध्ये शिरतात. शिखंडी मात्र न डगमगता त्याचे शस्त्रसंधान तसेंच चालू ठेवतो. ते पाहून तुमचा मुलगा मोठी सेना घेऊन भिष्माना संरक्षण देण्यासाठी जातो. पांडव ते पाहून त्या मोठ्या फौजेवर जबर हल्ला करतात एक भयंकर युद्ध सुरू होते.

युद्धाचा चौथा दिवस भाग पासष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग सहासष्ठावा

संजय पुढे सांगतो, त्या लढाईत शंतनुचा पुत्र जोरात लढतो. भिमसेना पासून कौरवांना संरक्ष देण्यासाठी ते पराकाष्ठा करतात. त्यात अनेक शूरवीर योद्धे मारले जातात. त्या लढाईचा आवाज स्वर्गापर्यंत पोहोचतो. ते योद्धे एकमेकांची मुंडकी उडवत होते. रणांगणात असंख्य डोकी पडलेली होती. अनेकांचे शिरस्त्राण, फेटे इतस्ततः पडलेले होते. त्याबरोबर पुरूषांचे दागिनेसुद्धा विखूरलेले होते त्या योद्ध्यांचे जे मारले गेले होते. तुटलेले हात, पाय आणि रक्ताने माखलेली धडं सगळीकडे दिसत होती. ते दृष्य विदारक होते. त्या बरोबर हत्तींचे अवयव, घोड्यांचे अवयव सगळीकडे विखुरलेले दिसत होते. चौफेर शस्त्रांच्या खडखडाटाचा आवाज ऐकू येत होता. त्या पांडव कौरव युद्धात रक्ताचे पाट वहात होते. एवढे होऊनही कोणी हार मानायसा तयार नव्हते. बाणांमुळें जबर जखमी झालेले हत्ती जोरा जोराने चित्कार करत इतस्ततः धावत होते. सगळे योद्धे शत्रूपक्षाच्या योद्ध्याला मारण्यासाठी धावत होते. मिळेल त्या शस्त्राने ते प्रतिपक्षाच्या वीराचा वध करत होते. माणसे मरून खाली पडत होती. जखमी घोडे बिथरल्यासारखे पळत होते. भिष्म आणि भिमाच्या युद्धात फार मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी झालेली दिसत होती. कांहीं वीर शस्त्र टाकून हातापायांनेच एकमेकांना मारून टाकण्याचा प्रयत्न करत होते. रथी त्यांचे रथ मोडल्यामुळें हातात तलवारी घेऊन जमिनीवर उभे राहून लढत होते. त्यात दुर्योधन भिष्माच्या नेतृत्वाखाली कलिंग देशाची सेना घेऊन पांडवांवर चाल करून जातो. भिमाच्या नेतृत्वात पांडवांचे सैनिक कौरवांच्या सैन्यावर हल्ला करतात.

युद्धाचा चौथा दिवस भाग सहासष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग सदुसष्ठावा

संजय पुढे सांगतो. भिम व त्याचे इतर भाऊ भिष्माच्या वर चाल करून जात आहेत, धनंजय त्याचे गांडीव सरसावून भिष्मावर चाल करून जातो. त्याचा ध्वज पाहून सगळया कौरवांचे धाबे दणाणतात. त्या ध्वजाची रचना दैवी होती. त्यात विविध रंग वापरलेले होते. त्या ध्वजाच्या स्तंभाला वाटेतील वृक्ष अडवू शकत नव्हते. तो ध्वच आणि त्याचा स्तंभ दोनही मायावी होते. अर्जुन पुढे जात होता त्या लढवय्यांच्या मधून. तो पुढे सरकत असतांना तुमचे योद्धे मारत जात होता. त्यामुळें सगळे मोठ्यानी ओरडत होते. अर्जुनसुद्धा गर्दना करत होता. त्याचे ओरडणे इंद्राच्या ओरडण्यासारखे होते. तो जेव्हां हातावर हात मारत होता त्याचा आवाजसुद्धा खूप मोठा येत असें. अर्जुन सतत त्याच्या भोवती बाणांचा वर्षाव करत होता. त्याच्या बाणांमुळें सगळया दिशा भरलेल्या होत्या. अशाप्रकारे तो अखेरीस भिष्माचार्यांच्या समीप येऊन ठेपतो. अर्जुनाच्या त्या बाणांच्या वर्षावामुळें तुझे सैन्य व तुझे मुलगे बेभान झाले होते. त्यांचे घोडे मेले होते, शस्त्रास्त्र संपली होती व रथ निकामी झाले होते, त्यामुळे तुझे सैन्य युद्धाला कंटाळलेले होते. त्याना कांहीं समजत नव्हते, कांहीं सुचत नव्हते व भिष्माच्या संरक्षणाखाली जात होते. अर्जुनाच्या बाणांच्या मारामुळे तुझे सैन्य जेथे आहे तेथे मरून पडत होते. गांडीवाचा टणत्कार सर्वकडे ऐकू जात होता. तुझ्या लष्करात प्रचंड घबराट पसरली होती.

त्यानंतर तुझ्या मुलाच्या आदेशानुसार कंबोज जातीचे उत्तम घोडे असलेली गोपयान लोकांची फौज त्यांना मदत म्हणून मद्रदेशाचे (सल्याचे) सैनिक आमि त्याबरोबर सौवरांचे सैन्य, त्याबरोबर त्रिगर्ताची फौज आणि कलिंग देशाचे सैनिक अशी सगळी पांडवांना घेरण्यासाठी निघाली. त्यांच्या प्रमुखपदी दुःशासन होता. त्याला मदत म्हणून जयद्रथ व इतर कौरवांचे दोस्त राजे होते. ते पांडवांवर चाल करून जातात. जेव्हां पांडवांनी शकूनीला घेरले होते. पांडव तुझ्या सैन्यांचा विध्वंस करू लागतात. त्या रणधुमाळीत कोणी कांहीं स्पष्टपणे पाहू शकत नव्हते. भिष्म अर्जुनाशा लढत होता. अवंतीचा राजा काशीच्या राजाशी लढत होता, सिंधचा राजा भिमाशी लढत होता. युधिष्ठीर त्याच्या मुलाबरोबर सल्याशी लढत होता. विकर्ण सहदेवाशी लढत होता, चित्रसेन शिखंडीशी, मत्स्य देशी विरट दुर्योधन व शकुनीशी लढत होते. द्रुपद, सत्यकी व चेकीतन द्रोणांशी लढत होते. त्यात द्रोणांना त्यांचा पुत्र अश्र्वत्थामा मदत करत होता. कृप आणि कृतवर्मन धृष्टद्युम्नाशी लढत होते. त्या युद्धात रणभूमीवर मेलेल्या घोड्यांची प्रेतं पडलेली दिसत होती. जरी आकाशात ढगं नव्हती तरी वीजा चमकत होत्या. आकाशातून धुमकेतू पडावेत असे वातावरण झाले होते. आकाशातून पडणाऱ्या त्या धुरळयामुळें सैनिक लढू शकत नव्हते. तशा परिस्थितीत सैनिक हवालदिल झालेले दिसत होते. रथांचे मोडलेले भाग, चाकं, आंस असें भाग सर्वकडे

विखुरलेले दिसत होते. रथावरील खाली पडलेले ध्वजस्तंभ वेडेवाकडे पडल्याने त्यातून जाणे रथांना व माणसांना केवळ अशक्य झाले होते. धावणाऱ्या हत्तीच्या पायाखाली चुरडलेले तुझे सेनिक सर्वत्र दिसत होते. मेलेल्या हत्तींची शरीरं पडलेली होती. त्यावरील अंबाऱ्या कोसळलेल्या होत्या त्यात अडकलेले जखमी सैनिक दिसत होते. केळ हत्तीच्या वजनाने मेलेले सैनिकांची सख्या कित्येक शेकड्याने होती. त्या युद्धभूमीत सगळी कडे असेंच दृष्य दिसत होते.

युद्धाचा चौथा दिवस भाग सदुसष्ठावा संपला.

## युद्धाचा चौथा दिवस

## भाग अडुसष्ठावा

संजय पुढे सांगत असतो, शिखंडी विराटा बरोबर भिष्मावर चाल करतात. धनंजय द्रोण विकर्ण व कृपांबरोबर लढत होता. पश्चिकेडील राजे तुझ्या बाजूचे ज्यांमध्ये सिंधचा राजा प्रमुख होता भिमावर आक्रमण करत असतात. त्याना दुर्योधनाची व दुःशासनाची सेना मदत करते. शकूनी व त्याचा पराक्रमी मुलगा उलूक युधिष्ठीरावर चाल करतात. माद्रीची मुलं त्रिगर्ताच्या सैन्याशी मुकाबला करत असतात. सत्यकी, चेकितन आणि अभिमन्यू केकया व सल्यावर वार करतात. धृष्टकेतू, घटोत्कच तुझ्या रथदलावर मारा करतात. धृष्टद्युम्न द्रोणाचार्यांशी लढत होता. अशारितीने तुझे व पंडुचे एकमेकाशी प्राणपणाने लढत होते युद्ध जिंकण्यासाठी. आता दुपारची वेळ आली आहे व दोनही बाजूचे एकमेकांचे जीव घेण्यासाठी लढत होते. वाघाच्या चामड्याने सजवलेले रथ सगळीकडे दिसत आहेत,स त्यामुळे त्या रणांगणाला विशेष शोभा आली आहे. सैनिक जोराजोरांने ओरडून एकमेकांना प्रोत्साहन देत आहेत. श्रींजय व कौरव ह्यांतील लढाई फारच भयंकर झाला. सूर्याच्या उन्हात तलवारी, बाण भाले त्यांच्या सोन्याच्या धारींमुळें चमकत होते. भिष्म भिमसेनाला शह देण्याचा प्रयत्न करत होते. त्यांच्या सोन्याच्या बाणानें भिमाला इजा झाली होती परंतु, भिम एक सर्पाचा बाण भिष्मावर मारतो. त्याबरोबर भिष्म भिमाचे धनुष्य तोडून टाकतो. ते होत असतांना सत्यकी भिमाच्या मदतीसाठी येतो. भिष्म सत्यकीच्या सारथ्याला ठार मारतो एका बाणाने. सत्यकीच्या रथाचे घोडे गोंधळून जातात, सत्यकीचा रथ वेडावाकडा जाऊ लागतो. सत्यकीचा रथ अशाप्रकारे जाऊ लागल्यामुळे सगळीकडे पांडवांच्या गटातील लोक हळहळ व्यक्त करत असतात. तो रथ थांबवण्यासाठी इतर सैनिक प्रयत्न करत असतात. त्यानंतर भिष्म पांडवांच्या सैन्याचा संहार सुरू करतो. त्यानंतर द्रोणसुद्धा त्यात सामील होतात व आणखीन एक युद्ध प्रारंभ होते.

युद्धाचा चौथा दिवस भाग अडुसष्ठावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग एकोण सत्तरावा

संजय पुढे सांगत असतो, राजा विराट भिष्मावर बाणांचा वर्षाव करून त्यांना जखमी करतो. भिष्म विराटाचे घोडे जखमी करतो. अश्वत्थामा अर्जुनाच्या छातीत दोन बाण असें मारतो किं ते वर्मी लागल्यामुळें अर्जुन थोड्या वेळासाठी शांत होतो. तरी तो नंतर अश्वत्थामाचे धनुष्य मोडून टाकतो. त्याशिवाय चार बाण त्याच्या छातीत मारतो. त्या प्रतिवारामुळें संतापलेला अश्वत्थामा नवीन धनुष्य घेऊन फाल्गुनीच्यावर बाणांचा वर्षाव करतो. त्यात तो वासुदेवावरसुद्धा मारा करतो. त्यामुळे चिडलेले अर्जुन व कृष्णा एकमेकाकडे पहातात व त्यानंतर एक मोठा श्वास घेऊन कांहीं अश्वत्थामाचा वध करण्यासाठी एक बाण गांडीवाला तो लावतो. त्या प्रकारे तो द्रोणाचार्यांच्या मुलाला अनेक जागी जखमा करतो. त्याचे रक्त भळभळा वाहू लागते. अश्वत्थामासुद्धा कांहीं कमी नसतो, तो अर्जुनाला तसेंच बाण मारत असतो. अश्वत्थामाचे काम भिष्माला संरक्षण देण्याचे होते ते तो प्रामाणिकपणे करत होता. त्याच्या पित्याकडून घेतलेली धनुर्विद्या तो उत्तमरित्या वापरत होता. त्याने त्या दोन कृष्णांना चांगलाच विरोध केलेला पाहून कुरुचे लोक त्याची वहावा करत असतात. अर्जुन विचार करत असतो, हा माझा बावपणाचा मित्र आहे, माझ्या गुरूचा पुत्र आहे, त्याशिवाय ब्राह्मण आहे, म्हणून त्याला जीवे मारणे योग्य होणार नाही असा करत अश्वत्थामाला न मारण्याचे ठरवतो. त्यानंतर विभत्सू त्याच्या गांडीवातून तुझ्या म्हणजे दुर्योधनाच्या सैन्यावर मारा सुरू करतो. फार मोठा नरसंहार होतो.

दुर्योधन भिमाला बाण मारून जखमा करतो. त्याचे बाण गरुड पंखी होते. त्यामुळे चिडलेला भिम एक मजबूत बाण त्याच्यावर फेकतो ज्यामुळें लक्ष्य ठार झालेच पाहिजे, त्याचे मंतरलेले बाण तुमच्या मुलाच्या छातीत घूसतात. त्यामुळें तो ते सहन करू शकत नाही. चवताळलेल्या सापासारखा तुझा मुलगा भिमावर आणखीन बाण फेकतो. एक देव व दुसरा दानव लढत आहेत असें वाटत होते. दुसरीकडे अभिमन्यू चित्रसेनाला व पुरुमित्राला बाण मारून जेरीस आणत असतो. ते असें लढत होते जणूकाय रणभूमीवर ते नांचत आहेत. त्यात सत्यव्रत पुरुमित्राला सामील होतो व तोसुद्धा अभिमन्यूला बाण मारू लागतो. अभिमन्यू सत्यवर्ताला बाण मारत असतो. रक्ताने माखलेला अभिमन्यू चित्रसेनाचे धनुष्य तोडून टाकतो. अशारितीने ते सगळे एकमेकांशी लढत होते. ते सगळे त्यांच्या रक्तात नाहत होते. तुमच्या सैनिकांनी अभिमन्यूला जागोजागी जखमी केले होते. तुझे योद्धे त्या एकट्या पांडवाला वेढा घालून त्याच्याशी लढत होते परंतु, तो हार मानावयाला तयार नव्हता. जसा तो लढत होता तो अधिकाधिक तेजस्वी दिसत होता. अभिमन्यू लक्ष्मणाला सहा बाण मारतो. त्याचा रथसुद्धा मोडतो. दुर्योधनाचे चारही घोडे

तो मारून टाकतो. त्यामुळें संतापलेला तुझा मुलगा अभिमन्यूवर एक शर फेकतो. अभिमन्यू तो उडवून लावतो. दुर्योधन व अभिमन्यू एकमेकांचे जीव घेण्यासाठी जणू लढत असतात. दुसरीकडे श्रींजय रथ, घोडे, शस्त्रं घालवलेला कौरवांची हातांनी लढत होता. सगळी पृथ्वी मेलेल्या माणसांनी व जनावरांनी अशी भरलेली होती कीं, जमीन दिसत नव्हती.

युद्धाचा चौथा दिवस भाग एकोणसत्तरावा संपला.

# युद्धाचा चौथा दिवस

## भाग सत्तरावा

संजय पुढे सांगतो, तो पांडवांचा अजिंक्य सरसेनापती सत्यकी मोठ्या शौर्याने चौफेर बाणांचा वर्षाव असा करत होता कीं, त्याच्या भोवती एक धुकं तयार झाले होते. ते पाहून दुर्योधन दहा हजाराचे सैन्य त्याच्यावर सोडतो. सत्यकी त्याच्या दैवी अशस्त्राने त्या सगळय सैनिकांना यमाकडे धाडतो. त्यानंतर तो योद्धा भुरिश्रवाला भिडतो. कुरु सैन्याचा विध्वंस युयुधनाने केलेला पाहून सत्यकी तेथे वळतो. त्या तुझ्या लष्करावर बाणांचा वर्षाव करू लागतो. त्यामारामुळें हैराण झालेले तुमचे सैन्य पळून जाते. ते पाहून महाबली युयुधन भुरिश्रवाला भिडतो. त्याच्या ध्वजावर सापाचे चिन्ह होते. त्याला युयुधन बोलतो, अरे कौरवा, आपण चांगले योद्धे अहात. आमच्या विरुद्ध लढत अहात, म्हणजे एकेका बरोबर किंवा एकत्रितपणे सगळयांबरोबर, आम्हाला पराजित करून, मोठे श्रेय मिळवू पहात अहा, तर तुम्हाला हरवण्यात मला आनंद होणार आहे. ते ऐकून भुरिश्रव त्याला उत्तर देतो, तू योग्यतेच बोलत आहेस. जर तुझी इच्छा असेल तर तसे होऊ दे. त्यानंतर तो एकमेकांशी लढू लागतात. ती लढाई भयंकर होती. मुसळधार पावसासारखे बाण फेकले जात होते. युयुधन कौरवांचे शर व बाण वाटेतच तोडून टाकत होता. तरी सोमदत्ताचा मुलगा युयुधनाचे डोके उडवतो. सत्यकी ते पाहून भुरिश्रवार चाल करून जातो. त्यानंतर त्यांच्यात द्वंद्व सुरू होते. त्यात दोघेही एकमेकांचे तिरकमटे तोडून टाकतात. आपला मुलगा अशारितीने युद्धात मारला गेलेला पाहून सत्यकी जोराने गर्जना करतो. त्यांच्या लढाई होते. त्यात त्या दोघांचे घोडे मेल्यानंतर ते जमिनीवर उतरतात. दोघे मोठ्या तलवारी घेऊन लढू लागतात. त्यावेळी भिमसेन सत्यकीच्या मदतीला जातो. भिम त्याला त्याच्या रथात घेतो. त्याबरोबर तुझा मुलगा भुरिश्रवाला त्याच्या रथात घेतो. त्यांचे द्वंद्व तसे चालू रहाते. ते होत असतांना सूर्य मावळतीकडे झुकत होता.

धनंजय त्या दिवसात पंचवीस हजार कौरवांचे सैनिक ठार मारतो. ते सगळे दुर्योधनाना अर्जुनावर धाडले होते परंतु, ते त्याच्या जवळ येण्या आधीच मारले जातात. त्यानंतर मत्स्य व केकेय लढवय्ये युद्धकलेत प्रवीण असे, पार्थावर चालून जातात. त्याच वेळी सूर्य क्षितिजा खाली गेलेला होता. त्यानंतर ते थकलेले दोनही बाजूचे लढवय्ये व त्यांचे पशु असें सगळे त्या दिवसाचे युद्ध संपण्याची वाट पहात असतात. त्यावेळी भिष्म त्याचे सैन्य मागे बोलावण्यासाठीचे इशारे नगाऱ्यातून देण्यास सांगतो. दोनही बाजूचे लष्कर आपापल्या तळाकडे निघतात. त्या सगळया योद्ध्यांच्या चेहऱ्यावर आपापले आप्त मेल्यामुळें दुःखाची छटा दिसत होती.

युद्धशास्त्राच्या नियमानुसार ते पांडव, कौरव आणि श्रींजय विश्रांतीसाठी त्यांच्या तंबूत जातात.

**- भिष्म पर्व भाग दुसरा संपला –**

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७६ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळया नितीशास्त्र शिकवणाऱ्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी

निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईंदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबऱ्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉंटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकऱ्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चांने शेतकऱ्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे, माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळिराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन

करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बऱ्याच गटांना आवडत नाही. बऱ्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता, जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर

म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकाऱ्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

ashokkothare@yahoo.co.in

**ई साहित्य प्रतिष्ठान -**

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्याकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

ई साहित्यची पुस्तके www.esahity.com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा.

लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद